सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

GOVERNMENT OF MAHARASHTRA

सामान्य प्रशासन विभाग

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम

THE MAHARASHTRA GENERAL PROVIDENT FUND RULES

(दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ पर्यंत सुधारलेले)

(Corrected upto 14th February, 2017)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांच्याकडून भारतात मुद्रित व संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित.

२०१७

[किंमत ४०.०० रुपये]

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम
THE MAHARASHTRA GENERAL PROVIDENT FUND RULES

(दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ पर्यंत सुधारलेले)

(Corrected upto 14th February, 2017)

(1) Amended by Government Notification, General Administration Department. No. PFR 2005/493/ CR 63/05/13-A, dated : 31st October, 2005.

(१) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीएफआर २००५/४९३/प्र. क्र. ६३/०५/१३-अ, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ अन्वये सुधारित.

(2) Amended by Government Notification, General Administration Department. No. GPF-1009/CR 53/2009/ 13-A, dated : 19th December, 2015.

(२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक जीपीएफ-१००९/सीआर ५३/२००९/१३-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१५ अन्वये सुधारित.

NOTIFICATION

General Administration Department,

Mantralaya, Mumbai-400 032

Dated the 20-5-98.

Constitution of India

No. PFR-1092/CR 54/93/XIII-A.—

In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India and of all other powers enabling him in that behalf, and in supersession of all the existing rules, orders issued in this behalf, the Governor of Maharashtra hereby makes the following rules, regulating the General Provident Fund relating to Government servants under the Government of Maharashtra, Namely.—

1. Short Title.—(a) These rules may be called the Maharashtra General Provident Fund Rules, 1998.

(b) They shall come into force on the date of their publication in the official gazette.

2. Defination.—In these rules,

(1) "Accounts Officer" means.—

(a) In relation to Government servants in Group 'D' service, the Heads of their Office ;

(b) In relation to the Government servants, in other Groups of Services, the Branch Officer in-charge of the Provident Fund Section in the Office of the Accountant General, State of Maharashtra;

(2) [1]"Emoluments" means pay drawn in the prescribed pay band plus the applicable grade pay, leave salary and includes subsistence allowance as defined in the Maharashtra Civil Services (General Conditions of Services) Rules, 1981 including Dearness pay allowance and any remuneration in the nature of pay received in respect of Foreign Services ;

(3) Family means.—

(a) In the case of male subscriber, the wife or wives, parents, children, minor brothers, unmarried sisters, deceased son's widows and children and where no parents of the subscriber are alive, paternal grand parents :

Provided that if the subscriber proves that his wife has been judicially separated from him or has ceased under the customary law of the community to which she belongs to be entitled to mainteance, she shall henceforth be deemed to be no longer a member of the subscriber's family in matters to which these rules relate, unless the subscriber subsequently intimates, in writing to the Accounts Officer that she shall continue to be so regarded.

(b) In case of female subscriber, the husband, parents, children, minor brothers, unmarried sisters, deceased son's widows and childern and where no parents of the subscriber are alive paternal grand parents ;

Provided that if the subsciber by notice in writing expressed her desire to exclude her husband from her family, the husband shall henceforth be deemed to be no longer a member of the subscriber's family in matters to which these rules relate, unless the subscriber subsequently cancels such notice in writing ;

Note : " Children" means the legitimate children and includes adopted children where adoption is recognised by the personal law governing the subscriber.

---

[1] Clause (2) was Substituted by G.N. GAD, dated 19-12-2015, Rule 2.

अधिसूचना

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई—४०० ०३२
दिनांक : २०-५-१९९८

भारताचे संविधान

क्रमांक-पीएफआर-१०९२/सीआर-५४-९३-तेरा-अ.—

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकानुसार प्रदान करण्यात आलेले अधिकार आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास शक्य असलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व यासंदर्भात सध्या अस्तित्वात असलेले नियम, आदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या सरकारी कर्मचा-यांच्या संबंधातील भविष्य निर्वाह निधी नियमित करणारे नियम करीत आहेत, ते असे :—

१. **संक्षिप्त नाव** (अ) या नियमांना "महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८" असे म्हणता येईल.

(ब) हे नियम त्यांच्या शासकीय राजपत्रातील प्रसिद्धीच्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.—** या नियमांत,

(१) "लेखा अधिकारी" म्हणजे.—

(अ) "ड" गटाच्या सेवेत असलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या संबंधात त्यांच्या कार्यालयाचे प्रमुख.

(ब) इतर गटांच्या सेवांमध्ये असलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या संबंधात, महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयातील भविष्य निर्वाह निधी कक्षाचा (सेक्शन) प्रभारी शाखा (ब्रँच) अधिकारी होय.

(२) [१]"वित्तलब्धी" म्हणजे, विहीत वेतनश्रेणीतील वेतन अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतन, अधिक रजावेतन आणि त्यामध्ये, महागाई वेतन आणि स्वीयेतर सेवेच्या संबंधात मिळालेल्या वेतनाच्या स्वरुपातील कोणत्याही पारिश्रमिकासह, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे निर्वाह भत्त्याचा अंतर्भाव होतो.

(३) **"कुटुंब"** म्हणजे.—

(अ) पुरुष वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराची बायको किंवा बायका, आईबाप, मुले, अज्ञान भाऊ, अविवाहित बहिणी, मयत मुलांच्या विधवा व मुले आणि वर्गणीदाराचे आईबाप हयात नसतील त्याबाबतीत पैतृक आजी आजोबा :

परंतु, जर वर्गणीदार, त्याची पत्नी न्यायिकरित्या त्याच्या पासून विभक्त झाली आहे किंवा ती ज्या जातीची आहे त्या जातीच्या रुढिगत विधीनुसार तिने निर्वाहाचा हक्क गमावलेला असेल असे सिद्ध करुन दाखवील तर, हे नियम ज्या बाबतीत लागू होता, त्या बाबतीत ती व्यक्ती, त्याच्या कुटुंबातील सदस्य समजण्यात यावी, असे लेखा अधिका-यास लेखी कळवील, तर ती व्यक्ती वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यात येईल.

(ब) स्त्री वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराचा पती, आईबाप, मुले, अज्ञान भाऊ, अविवाहित बहिणी, मृत मुलांच्या विधवा व मुले आणि वर्गणीदाराचे आईबाप हयात नसतील त्याबाबतीत पैतृक आजी आजोबा :

परंतु जर त्या वर्गणीदाराने लेखी सूचनेद्वारे तिच्या पतीला तिच्या कुटुंबातून वगळण्यात यावे अशी इच्छा व्यक्त केली असेल, आणि त्या वर्गणीदाराने अशी लेखी सूचना रद्द केलेली नसेल तर, हे नियम ज्या बाबींच्या संबंधात लागू असतील त्या बाबींपुरते त्यास यापुढे वर्गणीदाराच्या कुटुंबाचा सदस्य समजण्यात येणार नाही.

टीप.— "मुले" म्हणजे औरस संतती व वर्गणीदारास लागू असलेल्या व्यक्तीगत कायद्यानुसार दत्तक ग्रहणास मान्यता मिळालेली असेल त्या बाबतीत दत्तक मुलांचा त्यात समावेश होतो.

---

१. शा. अधि., सा.प्र.वि. दिनांक १९-१२-२०१५, मधील नियम क्र. २ अन्वये मूळ खंड (२) ऐवजी खंड (२) हा दाखल करण्यात आला.

(4) " Fund " or the, "Provident Fund" means—the Maharashtra General Provident Fund constituted under the provisions of clause (*d*) of section 2 of the Act ;

(5) " Leave " means—and includes the kinds of leave, as defined in the Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981 ;

(6) " Year " means—the financial year ;

(7) " Foreign Service " means—the service for which a Government servant received his pay with the sanction of Government from any source other than the consolidated Fund of India or of a State or of an Union Territory ;

(8) " Government " means—the Government of Maharashtra ;

(9) " Heads of Departments " means—the Officers mentioned and includes in Appendix-II of the Maharashtra Civil Services (General Conditions of Services) Rules, 1981, as amended from time to time ;

(10) Group 'D' Service—Group 'D' service means the service classified as Group 'D' under Government Resolution, General Administration Department, NO. SRV-1088/CR-13/88/XII, dated the 29th July, 1993, and includes such other unclassified non-gazetted posts, maximum of the scale of which is Rupees 1150 or less ;

(11) "Leave Salary"–means the monthly salary paid by the Government to a Government Servant on leave ;

(12) Words and expression used in these rules shall have the meaning assigned to them in the Provident Funds Act (Act 19 of 1925) or in the Maharashtra Civil Services (General Conditions of Services) Rules 1981.

3. Constitution of Fund.—The fund shall be maintained in India in rupees shall be credited to the General Provident Fund of any such sums the payment of which has not been taken within six months after they become payable, under these rules shall be transferred to "Deposits" at the end of the year and treated according to the rules relating to deposits.

Government servants entitled to subscribe to the fund.

4. Conditions of Eligibility.—

(1) Subject to the provisions of sub-rule (2), all temporary Government servants after the continuous service of one year, all re-employed pensioners and all permanant Government Servants, shall subscriber to the fund :

Provided that no such Government servant who has been required or permitted to subscribe to a Contributory Provident Fund, shall be eligible to subscribe or continue to subscribe to the Fund :

Provided Further that a temporary Government Servant borne on an establishment or a factory to which the provisions of Employees Provident Fund Scheme, 1952 framed under the Employees Provident Fund and Miscellaneous Provisions Act (19 of 1952) applies but for the exemption granted under section 17 of the said Act, shall subscribe to the General Provident Fund, if he has completed six months continuous service or has actually worked for not less than 120 days during a period of six months in such as establishment or factory or in any other establishment or factory to which the said Act applies, under the same employer or partly under one and partly under the other establishment as the case may be ;

(४) “ निधी ” किंवा “भविष्य निर्वाह निधी” म्हणजे या अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ड) च्या तरतुदीन्वये घटित करण्यात आलेला महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी.

(५) “ रजा ” म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे रजा व त्यामध्ये अनेक प्रकारच्या रजांचा समावेश होतो.

(६) “ वर्ष ” म्हणजे वित्तीय वर्ष,

(७) “ स्वीयेतर ” सेवा म्हणजे ज्या सेवेसाठी शासकीय कर्मचा-याला भारताच्या किंवा एखाद्या राज्याच्या किंवा एखाद्या संघराज्यक्षेत्राच्या एकत्रित निधी व्यतिरिक्त कोणत्याही इतर साधनांद्वारे शासनाच्या मंजुरीने, त्यांचे वेतन मिळते ती सेवा,

(८) “ शासन ” म्हणजे महाराष्ट्र शासन,

(९) “ विभाग प्रमुख ” म्हणजे, वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ यांच्या परिशिष्ट-दोन मध्ये नमूद केलेल्या अधिकारांचा समावेश असलेले अधिकारी,

(१०) गट “ ड ” सेवा—“ ड ” गटातील सेवा म्हणजे, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०८८-सीआर-१३-८८-बारा, दिनांक २९ जुलै, १९९३, अन्वये गट “ ड ” म्हणून वर्गीकृत केलेल्या सेवा तसेच त्यामध्ये रुपये १,१५० किंवा कमी एवढे जास्तीत जास्त वेतनमान असलेल्या इतर अवर्गीकृत अराजपत्रित पदांवरील सेवांचा अंतर्भाव होतो.

(११) **रजावेतन.—** “ रजावेतन ” म्हणजे रजेवर असलेल्या एखाद्या शासकीय कर्मचा-याला शासनाकडून देण्यात आलेले मासिक वेतन.

(१२) या नियमात वापरण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना भविष्य निर्वाह निधी अधिनियम (१९२५ चा अधिनियम क्र.१९) किंवा महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ यामध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच त्यांचे अर्थ असतील.

३. निधीची रचना.— भविष्य निर्वाह निधी भारतात रुपयांमध्ये ठेवण्यात येईल व या नियमान्वये त्याचे प्रदान देय झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत न घेतल्यास, अशी कोणतीही प्रदाने सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात येतील आणि ती प्रदाने वर्ष अखेरीस ठेवीमध्ये रुपांतरित करण्यात येतील व ठेवींच्या संबंधातील नियमांनुसार त्यांचा व्यवहार करण्यात येईल.

शासकीय कर्मचारी निधीचे वर्गणीदार होण्यास हक्कदार असतील.

४. पात्रतेच्या शर्ती.— (१) पोट-नियम (२) च्या तरतुदींना अधीन राहून एक वर्षाची अखंड सेवा पूर्ण केलेले सर्व अस्थाई शासकीय कर्मचारी, पुन्हा सेवेत घेतलेले सर्व निवृत्तीवेतनधारी, आणि सर्व स्थायी शासकीय कर्मचारी हे निधीचे वर्गणीदार असतील :

परंतु ज्या कोणत्याही शासकीय कर्मचा-यास अंशदायी भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होणे आवश्यक असेल किंवा तशी त्यास परवानगी दिली असेल, तो सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होण्यास किंवा निधीचा वर्गणीदार म्हणून चालू राहण्यास पात्र असणार नाही :

आणखी असे की, अथवा उक्त अधिनियमाच्या कलम १७ अन्वये सूट देण्यात आलेली नसेल, तर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२ (१९५२ चा १९) या अन्वये तयार केलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, योजना, १९५२ च्या तरतुदी ज्या संस्थेला किंवा कारखान्याला लागू होत असतील अशा संस्थेमधील किंवा कारखान्यातील अस्थायी शासकीय कर्मचा-यांची सहा महिन्यांची अखंड सेवा अशा संस्थेमध्ये किंवा कारखान्यामध्ये अथवा उक्त अधिनियम लागू होत असेल अशा कोणत्याही इतर संस्थेमध्ये किंवा कारखान्यामध्ये अथवा काही अंशी एका संस्थेत आणि प्रकरणपरत्वे, इतर संस्थेत त्याच नियोक्त्याच्या नियंत्रणाखाली पूर्ण झालेली असेल अथवा त्याने तेथे सहा महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीतील १२० दिवसांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीसाठी प्रत्यक्ष काम केले असेल, तर त्याला सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमध्ये अंशदान द्यावे लागेल.

(2) A temporary Government servant who has been appointed on a regular vacancy and is likely to continue for more than a year may even before he completes one year of continous service subscribe to the fund.

[1](3) These rules shall not apply to the Government Servants who are recruited on or after the 1st November 2005.

Explanation.—(1) " Continuous Service " shall have the same meaning assigned to it in the Employee's Provident Fund Scheme, 1952, and the period of work for 120 days shall be calculated in the manner specified in the said scheme and shall be certified by the employer.

(2) The apprentices and the probationers shall be treated as temporary Government servants.

(3) On transer to a post under State Government from service under Central Government or from a local authority his services shall be treated as continuous service, for the purpose of these rules, for eligibility to subscribe to the General Provident Fund in terms of rule 4 and the person concerned shall be permitted to subscriber immediatly on his joining the new post, and the amount standing to his credit shall be transferred according to the provisions of rule 32. The responsibility to ensure that the Government servants who are compulsorily required to join the fund from the date prescribed in the sub-rule (*2*) or of these rules actually subscribes, and is admitted, to the fund, shall rest on the respective Heads of Offices. All Government servants who are eligible to subscribe to the fund under sub-rule (1) of rule 4 shall join the fund.

Note (1).—Each Head of Office shall send a statement, to the Accountant General concerned in the prescribed form on the 15th of every month indicating the particulars of such Government Servants (both gazetted or non-gazetted) in their office and are required to compulsorily subscribe to the Provident Fund.

Note (2).—The Accountant General shall return one copy of the said form indicating the account numbers alloted to each of the Government servants included in that statement.

Note (3).—The above procedure is *mutatis mutandis* applicable employees in Group (D) service whose provident fund accounts are kept by Heads of Departments and Z. P., respectively.

Note (4).—The statement inform to be filled in by the department of prospective subscribers to the General Provident Fund should be sent by Heads of Offices to the Accountant General. The statement should be sent three months in advance of the month in which the new subscribers are proposed to be admitted to the fund.

5. Nomination.–

(1) The subscriber shall, at the time of joining the fund, send to the Head of the Office, a nomination conforring on one or more persons the right to receive the amount that may stand to his credit in the fund in the event of his or her death, before that amount become payable, or having become payable, have not been paid :

Provided that where subscriber is minor, he shall be required to make the nomination only on his attaining the age of majority :

Provided further that a subscriber who has a family at the time of making nomination shall make such nomination only in favour of a member or members of his family :

Provided also that the nomination made by the subscriber in respect of any other provident fund to which he was subscriber before joining the fund shall, if the amount to his credit in such other provident fund has been transferred to his credit in the Fund, be deemed to be a nomination duly made under this rule until he makes nomination in accordance with this rule.

(2) If a subcriber nominates more than one person under Sub-rule (*1*) he shall specify in the nomination form the amount or share payable to each of the nominees in such a manner that it will cover the whole amount that may stand to his credit in the fund at any time.

---

1. Sub-rule (3) was inserted by G. N. GAD dated 31-10-2005, Rule (2).

(२) ज्याची नियमित रिक्त पदावर नियुक्ती झाली आहे आणि एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी ती चालू राहण्याची शक्यता आहे अशा तात्पुरत्या शासकीय कर्मचा-याला एक वर्षाची अखंडीत सेवा पूर्ण होण्यापूर्वी निधीची वर्गणी भरता येईल.

[१](३) हे नियम १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या शासकीय कर्मचा-यांना लागू होणार नाहीत.

स्पष्टीकरण.— (१) "अखंडीत सेवा" या संज्ञेला कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना, १९५२ मध्ये जो अर्थ दिलेला आहे तोच अर्थ असेल, व १२० दिवसांच्या कार्यकालाची गणना उक्त योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने करण्यात येईल, आणि त्याप्रमाणे नियोक्त्याकडून प्रमाणित करण्यात येईल.

(२) शिकाऊ उमेदवार आणि परिवीक्षाधीन उमेदवार यांना अस्थायी शासकीय कर्मचारी समजण्यात येईल.

(३) केंद्र सरकारच्या सेवेतून किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून राज्य शासनाच्या सेवेतील पदावर बदली झाल्यावर त्याची ती सेवा या नियमाच्या प्रयोजनार्थ नियम ४ च्या संदर्भात (सर्वसाधारण) भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणी भरण्यास पात्र होण्यासाठी अखंडीत सेवा समजण्यात येईल आणि संबंधित व्यक्तीस ती नव्या पदावर रूजू झाल्यावर लगेचच वर्गणीदार होण्यास अनुमती देण्यात येईल व तीच्या खाती जमा असलेली रक्कम, नियम ३२ च्या अनुसार नव्या पदासाठी, नियम ३२ च्या तरतुदीनुसार हस्तांतरित करण्यात येईल.

या नियमातील पोट-नियम (२) मध्ये विहित केलेल्या तारखेपासून ज्या शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत त्याने निधीचे वर्गणीदार होणे सक्तीचे असेल, तो प्रत्यक्ष वर्गणी भरीत आहे आणि त्याला निश्चित सामील करून घेण्यात आले आहे, याची खात्री करून घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखावर राहील.

नियम ४ च्या पोट-नियम (१) अन्वये निधीचे वर्गणीदार होण्यास पात्र असतील असे सर्व शासकीय कर्मचारी निधीमध्ये सामील होतील.

टीप-१.-प्रत्येक कार्यालयाचा प्रमुख त्याच्या कार्यालयातील भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होणे सक्तीचे असेल अशा शासकीय कर्मचा-यांचा (राजपत्रित व अराजपत्रित अशा दोन्ही) तपशील दर्शविणारे विहित नमुन्यातील विवरणपत्र, संबंधित महालेखापाल यांना, प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेला पाठविल.

टीप-२.-महालेखापाल, त्या विवरणपत्रात समावेश असलेल्या प्रत्येक शासकीय कर्मचा-यांना नेमून दिलेला खातेक्रमांक दर्शविणा-या उक्त नमुन्याची एक प्रत परत करेल.

टीप-३.-ज्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेखे अनुक्रमे विभागप्रमुख व जिल्हा परिषदा यांनी ठेवलेले असतील अशा "ड" गट सेवांमधील कर्मचा-यांना वरील कार्यपध्दती योग्य त्या फेरफारांसह लागू होईल.

टीप-४.- भावी वर्गणीदारांचे विवरणपत्र विभागाने भरुन महालेखापाल यांना कळवावे, भविष्य निर्वाह निधीमध्ये नवीन वर्गणीदार ज्या महिन्यात दाखल करून घेण्याचे प्रस्तावित केले असेल, त्या महिन्याच्या तीन महिने अगोदर हे विवरणपत्र पाठविले पाहिजे.

५. नामनिर्देशन.—

(१) प्रत्येक वर्गणीदार, निधीचा वर्गणीदार होण्याच्या वेळी निधीमध्ये त्याच्या नावे जमा होईल अशी रक्कम त्याला देय होण्यापूर्वी किंवा ती देय झाली असूनही देण्यात आलेली नसेल, अशा वेळी त्याचा मृत्यू झाल्यास, ही रक्कम मिळण्याचा हक्क एक किंवा अधिक व्यक्तींना प्रदान करणारे नामनिर्देशन कार्यालय प्रमुखांकडे पाठवील :

परंतु वर्गणीदार जर अज्ञान असेल, तर तो सज्ञान झाल्यानंतरच त्याने असे नामनिर्देशन करणे आवश्यक असेल :

आणखी असे की, नामनिर्देशन करतेवेळी जर वर्गणीदाराला स्वतःचे कुटुंब असेल, तर अशा बाबतीत तो केवळ त्याच्या कुटुंबातील सदस्याच्या किंवा सदस्यांच्या नावेच नामनिर्देशन करील.

तसेच, वर्गणीदार भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होण्यापूर्वी त्याने इतर कोणत्याही भविष्य निर्वाह निधीसाठी करुन दिलेले नामनिर्देशन हे जर पूर्वीच्या निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली रक्कम अशा दुस-या निधीत हस्तांतरित करण्यात आली असेल तर, या नियमानुसार ते नामनिर्देशन करे पर्यंत या नियमाखाली यथोचितरित्या करण्यात आलेले नामनिर्देशन असल्याचे समजण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये वर्गणीदाराने एकापेक्षा अधिक व्यक्तीचे नामनिर्देशन केले तर कोणत्याही वेळी निधीमध्ये त्याच्या खात्यावर जमा असलेल्या सर्व रकमेचा समावेश होईल अशाप्रकारे, तो प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेली रक्कम किंवा हिस्सा नामनिर्देशन नमुन्यात विनिर्दिष्ट करेल.

---

१. शा. अधि. साप्रवि, दि. ३१-१०-२००५ मधील नियम क्र. २ अन्वये, पोट-नियम (३) समाविष्ट करण्यात आला.

(3) Every nomination shall be made in form set forth in the First Schedule.

(4) A subscriber may at any time cancel the nomination by sending notice in writing to the Accounts Officer. The Subscriber shall alongwith such notice or separately send a fresh nomination in accordance with the provisions of this rule.

(5) In a nomination the Subscriber may provide—

(a) That in the event of any specified nominee, his pre-deceasing the subscriber, the right confored upon that nominee shall pass to such other person or persons as may be specified in the nomination :

Where the Subscriber conferred such right on more than one person under this clause, he shall specify the amount or share payable to each of such persons in such a manner as to cover the whole of the amount payable to the nominee.

(b) that the nomination shall become invalid in the event of the happening of contingency provided therein. If at the time of making the nomination the subscriber has no Family, he shall state in the nomination that it shall become invalid in the event of his subsequently acquiring a family : provided further that if at the time of making nomination the subscriber has only one member in the family, he shall provide in the nomination that the right conferred upon the alternate nominee under clause (*a*) shall become invalid in the event of his subsequently acquiring other member or members in his family.

(c) that immediately on death of a nominee in respect of whom no special provision has been made in the nomination under clause (*a*) of sub-rule (*5*) or on occurance of any event by reasons of which the nomination becomes invalid in persuance of clause (*b*) of sub-rule (*5*) or proviso thereto, the subscriber shall send to the Accounts Officer a notice in writing cancelling nomination together with a fresh nomination made in accordance with the provisions of this rule.

(d) that every nomination made and every notice of cancellation given by a subscriber shall, to the extent that it is valid, take effect on the date from which it is received by the Accounts Officer.

Note (1).—In this rule, unless the context otherwise required the expression ' person ' or ' persons ' shall include a company or Association or body of individuals whether incorporated or not. It shall also include a fund such as the Chief Minister's Relief Fund or any other charitable trust whether public or private and registered under the Bombay Public Trusts Act, 1950 (Bom. XXIX of 1950) or Fund, to which nomination may be made through the Secretary or other Executive of the said funds or Trust Authorised to receive payments.

Note (2).—If a Subscriber has no family, or has no other person, excepting the nominee constituting his family as defined in the rules, the person to whom the right of nominee should pass names in the last column can, be any person other than a member of his family.

Note (3).—A Subscriber may change a nomination made while in service, after his retirement so long as the amount remains unpaid : provided that the said nomination is made and notified in accordance with the provisions of the rules.

Note (4).—If the claim of the nominee is challenged in the Court of Law, and if the Court decrees that payment should be made to persons other than nominee(s), before actual payment has been made to the nominee(s), the orders of the Court shall have to be complied with.

(३) प्रत्येक नामनिर्देशन, पहिल्या अनुसूचीत देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये करण्यात येईल.

(४) वर्गणीदारास कोणत्याही वेळी लेखा अधिका-याला लेखी नोटीस देवून नामनिर्देशन रद्द करता येईल. वर्गणीदार या नियमाच्या तरतुदींनुसार नवीन नामनिर्देशन अशा नोटिसीसोबत किंवा स्वतंत्रपणे पाठवील.

(५) वर्गणीदारास नामनिर्देशनात अशी तरतूद करता येईल की,

(अ) कोणतीही विनिर्दिष्ट नामनिर्देशीत व्यक्ती, वर्गणीदाराच्या आधी मृत्यू पावल्याच्या परिस्थितीत त्या नामनिर्देशित व्यक्तीला प्रदान करण्यात आलेल्या हक्क नामनिर्देशनपत्रात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यात येईल :

परंतु, जर वर्गणीदाराच्या कुटुंबात इतर सदस्य असतील तर अशा इतर व्यक्ती अशा सदस्य असेल किंवा सदस्य असतील.

या खंडान्वये वर्गणीदाराने एकापेक्षा जास्त व्यक्तींना असे हक्क प्रदान केले असतील त्याबाबतीत तो नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेल्या संपूर्ण रकमेचा विनियोग होईल, अशाप्रकारे प्रत्येक व्यक्तीला देय असलेली रक्कम किंवा हिस्सा विनिर्दिष्ट करील.

(ब) नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेली आकस्मिक घटना घडून आली तर ते नामनिर्देशन विधिअग्राह्य होईल. नामनिर्देशन करण्याच्या वेळी वर्गणीदाराचे स्वतःचे कुटुंब नसेल तर, नंतर कुटुंब प्राप्त केल्यानंतर ते नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल असे तो त्या नामनिर्देशनात नमूद करील : आणखी असे की, असे नामनिर्देशन करतांना वर्गणीदाराच्या कुटुंबात फक्त एकच व्यक्ती असेल तर, खंड (अ) खाली पर्यायी व्यक्तीला प्रदान करण्यात आलेला हक्क त्याच्या कुटुंबात नंतर आलेला सदस्य किंवा आलेले सदस्य यामुळे तो विधिअग्राह्य ठरेल अशी तो नामनिर्देशनात तरतूद करील.

(क) ज्या नामनिर्देशित व्यक्तीच्या बाबतीत पोट-नियम (५) च्या खंड (अ) अन्वये नामनिर्देशनपत्रात कोणतीही विशेष तरतूद केलेली नसेल अशा नामनिर्देशित व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्वरित किंवा पोट-नियम (५) च्या खंड (ब) अनुसार किंवा त्यातील तरतुदींनुसार ज्यामुळे नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल अशी एखादी घटना घडेल तर वर्गणीदार, लेखाधिका-याला या नियमाच्या तरतुदींनुसार केलेल्या नवीन नामनिर्देशनासह, नामनिर्देशन रद्द करणारी लेखी नोटीस पाठविल.

(ड) वर्गणीदाराने केलेले प्रत्येक नामनिर्देशन आणि जे रद्द करण्यासाठी त्याने दिलेली प्रत्येक नोटीस, ही विधिग्राह्य असेल त्या मर्यादेपर्यंत लेखा अधिका-याला ती ज्या दिनांकास मिळेल त्या दिनांकापासून परिणामक्षम राहील.

टीप-१.-या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर " एक व्यक्ती " किंवा " अनेक व्यक्ती " ह्या शब्दप्रयोगात कंपनी किंवा सहा व्यक्तींची संस्था, मग ती विधी संस्थापित असो किंवा नसो, याचा समावेश असेल. यामध्ये मुख्यमंत्री सहाय्य निधी किंवा, मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० (१९५० चा मुंबई एकोणतीस) अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या व खाजगी किंवा सार्वजनिक अशा कोणत्याही इतर धर्मादाय विश्वस्त संस्थेचा किंवा उक्त निधींच्या सचिवांमार्फत किंवा कार्यकारी अधिका-यामार्फत ज्याचे नामनिर्देशन करता येईल अशा निधीचा किंवा प्रदाने स्वीकारण्यास प्राधिकृत केलेल्या न्यासाचा समावेश असेल.

टीप-२.-वर्गणीदारास कोणतेही कुटुंब नसेल किंवा या नियमामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे त्याचे कुटुंब बनणा-या नामनिर्देशित व्यक्तीखेरीज इतर कोणतीही व्यक्ती नसेल तर नामनिर्देशित व्यक्तीचा अधिकार शेवटच्या स्तंभात नाव असलेली जी व्यक्ती ही त्याच्या कुटुंबाच्या सदस्याव्यतिरिक्त कोणतीही इतर व्यक्ती असेल त्या व्यक्तीकडे असेल.

टीप-३.-वर्गणीदाराला, त्याच्या सेवानिवृत्तीनंतर, जोपर्यंत रक्कम चुकती केलेली नसेल तोपर्यंत तो सेवेत असतांना केलेले नामनिर्देशन बदलता येईल : परंतु या नियमांच्या तरतुदीनुसार उक्त नामनिर्देशन तयार केलेले व अधिसूचित केलेले असले पाहिजे.

टीप-४.-नामनिर्देशित व्यक्तीच्या दाव्याला जर न्यायालयात आव्हान दिले आणि जर ही रक्कम नामनिर्देशित व्यक्ती व्यतिरिक्त इतर व्यक्तींना द्यावी असा न्यायालयाने हुकूम दिला तर नामनिर्देशित व्यक्तीला/व्यक्तींना प्रत्यक्ष रक्कम देण्यापूर्वी न्यायालयाच्या आदेशांचे अनुपालन करावे लागेल.

6. Subscriber's Accounts.—(1) The account shall be opened in the name of each subscriber, in which shall be shown.–

(i) his subscription ;

(ii) interest as provided by rule 12 ;

(iii) bonus, amount of arrears of pay and allowances credited to his account under general or special orders of Government ; and

(iv) advances and withdrawals from the fund.

(2) The Accounts Officer shall as far as possible send the statement of accounts in the prescribed forms to each subscriber by the end of September of the next financial year.

7. Conditions and Rates of Subscription.—(1) A subscriber shall subscribe monthly to the fund except during the period when he is under suspension :

Provided that, a subscriber may at his option not to subscribe during leave which either does not carry any leave salary or carries leave salary equal to or less than half-pay or half-average-pay :

Provided further that, a subscriber on reinstatement after the period of his suspension shall be allowed the option of paying in one lump sum or in instalments any sum not exceeding the maximum amount of arrear subscriptions payable for that period.

Note (1).—The holder of seasonal post in an establishment need not subscribe to the fund during the period of his unemployment.

Note (2).—A subscriber need not subscribe during a period treated as 'dies-non' that is broken period connecting the two regular periods of service which does not count for any purpose, such as pay, increment, pension, *etc.*

Note (3).—If a subscriber is admitted to the fund at a later date he may be allowed the option of paying the arrears of subscription in one lump sum or in instalments.

(2) The subscriber shall intimate his election not to subscribe during the leave referred to in the first proviso to sub-rule (*1*) in the following manner.–

(a) if he is an Officer who draws his own pay bills by making no deductions of account of subscription in his first pay bill to draw after proceeding on leave ;

(b) if he is not an Officer who draws his own pay bills by written communication to the Head of his Office before he proceeds on leave.

Explanation :–

(i) The subscriber will have to make due and timely intimation. Failure to make such intimation shall be deemed to constitute election to subscribers.

(ii) The option of the subscriber intimated under his sub-rule shall be final.

(3) A subscriber who has under rule 29, withdrawn the amount standing to his credit in the fund, shall not subscribe to the fund after the said withdrawal unless and until he returns to duty.

(4) Notwithstanding anything contatained in sub-rule (*1*) a subscribed shall not subscribe to the fund during the last three months prior to his retirement on superannuation.

६. वर्गणीदारांचे लेखे :

(१) प्रत्येक वर्गणीदाराच्या नावे खाते उघडण्यात येईल व त्यात.—

(एक) त्याच्या वर्गणीची रक्कम ;

(दोन) नियम १२ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्यावरील व्याज ;

(तीन) बोनस, शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये त्याच्या खात्यावर जमा केलेली वेतनाच्या आणि भत्त्यांच्या थकबाकीची रक्कम ; आणि

(चार) निधीमधून घेतलेली अग्रीमे व काढलेल्या रकमा दाखविण्यात येतील.

(२) लेखा अधिकारी, त्याला शक्य होईल तेथवर, प्रत्येक वर्गणीदाराला विहित नमुन्यातील लेखा विवरणपत्र पुढील वित्तीय वर्षाच्या सप्टेंबर अखेरीस पाठवील.

७. वर्गणीच्या शर्ती आणि दर .—

(१) वर्गणीदार, तो निलंबित असतांनाचा कालावधी खेरीज करून दरमहा निधीमध्ये अंशदान देईल :

परंतु, वर्गणीदार रजेवर असेल आणि त्याला रजावेतन मिळणार नसेल किंवा जे रजावेतन मिळणार असेल ते अर्धवेतनाइतके किंवा अर्ध सरासरी वेतनाइतके किंवा त्याहून कमी असेल तर रजेच्या काळात वर्गणी देणे हे त्याच्या स्वेच्छाधीन राहील : आणखी असे की, वर्गणीदार त्यांच्या निलंबनाच्या कालावधीनंतर तो पुनःस्थापित झाल्यावर, त्या कालावधीत देय असलेल्या वर्गणीच्या थकबाकीची अधिकतम रक्कम एकरकमी किंवा हप्त्याने देण्याची त्याला मुभा असेल.

टीप–(१).–आस्थापनेतील हंगामी सेवेतील कर्मचा-याला त्याच्या बेकारीच्या कालावधीतील निधीची वर्गणी भरणे आवश्यक असणार नाही.

टीप–(२).-वर्गणीदाराने, वेतन, वेतनवाढ, निवृत्तीवेतन इत्यादींसारख्या कोणत्याही प्रयोजनाकरिता मोजण्यात न येणा-या अशा, सेवेचे दोन नियमित कालावधी जोडणा-या खंडित कालावधीत म्हणजेच “डाअेस-नॉन” या कालावधीत वर्गणी देण्याची आवश्यकता नसेल.

टीप-(३).-जर वर्गणीदार निधीत सामील झाला तर त्याला वर्गणीच्या थकबाकीची रक्कम एका रकमेने किंवा हप्त्याने पुढील तारखेला भरण्यास अनुमती देण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) च्या पहिल्या परंतुकात निर्देशित करण्यात आलेल्या रजेच्या कालावधीतील वर्गणी न भरण्याबाबत आपला निर्णय वर्गणीदार खालीलप्रमाणे कळवील.–

(अ) जर तो स्वतःचे वेतनदेयक स्वतःच तयार करणारा अधिकारी असेल तर तो रजेवर गेल्यानंतर त्याने तयार केलेल्या पहिल्या देयकात वर्गणीची वजात करणार नाही;

(ब) जर तो स्वतःचे वेतन देयक स्वतःच तयार करणारा अधिकारी नसेल तर रजेवर ज्याण्यापूर्वी कार्यालय प्रमुखाला तो तशी लेखी सूचना देईल.

स्पष्टीकरण.–(एक) वर्गणीदाराला यथोचित व योग्य वेळी सूचना द्यावी लागेल. अशी सूचना देण्यात आली नाही तर त्याने वर्गणी भरण्याचा निर्णय घेतला आहे असे समजण्यात येईल.

(दोन) या पोट-नियमाखाली वर्गणीदाराने कळविलेला विकल्प अंतिम असेल.

(३) नियम २९ अन्वये ज्या वर्गणीदाराने भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा असलेली रक्कम काढून घेतली असेल तो वर्गणीदार पुन्हा कामावर रुजू झाल्याखेरीज व रुजू होत नाही तोपर्यंत भविष्य निर्वाह निधी वर्गणी भरणार नाही.

(४) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी वर्गणीदार, त्याच्या नियत सेवावधीनंतर त्याच्या निवृत्तीच्या शेवटच्या तीन महिन्यापूर्वी निधीमध्ये वर्गणी भरणार नाही.

8. Rates of Subscriptions.—(1) The amount of subscription shall be fixed by the subscriber himself subject to the following conditions, namely.–

(a) It shall be expressed in whole rupees ;

(b) it may be any sum so expressed not less than 6 percent of his emoluments and not more than his total emoluments :

Provided that, a subscriber who has previously been subscribing to a Government Contributory Provident Fund at the higher rate of 10 percent it may be any sum, so expressed not less than 10 percent of his emoluments and not more than his total emoluments.

(c) when a Government servant elects to subscribe at a minimum rate of 6 percent or 10 percent as the case may be, the fraction of rupee will be rounded to the next whole rupee.

(2) For the purpose of sub-rule (*1*), the emoluments of a subscriber shall be–

(a) in the case of a subscriber who was in Government service on the 31st March of the preceding year, the emoluments to which he was entitled on that date ;

(b) in the case of a subscriber who was on leave on the said date and elected not to subscribe during such leave or was under suspension on the said date, his emoluments shall be the emoluments to which he was entitled on the 1st day after his return to the duty ;

(c) in the case of a Subscriber who was on deputation out of India on the said date or was on leave on the said date and continues to be on leave and has elected to subscriber during such leave, his emoluments shall be the emoluments to which he would have been entitled had he been on duty in India ;

(d) in the case of a subscriber who was not in Government service on the 31st March of the preceding year, the emoluments to which he was entitled on the date he joins the fund.

(3) The subscriber shall intimate the fixation of the amount of his monthly subscription in each year in the following manner.—

(a) if he was on duty on 31st March of the preceding year by the deduction which he makes in this behalf from his pay bill for that month;

(b) if he was on leave on 31st March of the preceding year and elected not to subscribe during such leave, or was under suspension on that date, by the deduction which he makes in this behalf from his first pay bill after he returns to the duty;

(c) if he has entered Government service for the first time during the year, by the deduction which he makes in this behalf, from his pay bill for the month during which he joins the fund ;

(d) if he was on Leave on 31st March of the preceding year, and continues to be on leave and has elected to subscribe during such leave, by the deduction which he causes to be made in this behalf from his salary bill for that month ;

(e) if he was on foreign service on the 31st March of the preceding year, by the amount credited by him into the Treasury on account of subscription for the month of April in the current year.

(4) The amount of subscription so fixed may be—

(a) reduced once at any time during the course of the year;

(b) enhanced twice during the course of the year; or

(c) reduced and enhanced as aforesaid : Provided that, when the amount of subscription is so reduced, it shall not be less than the minimum subscription prescribed in sub-rule (*1*) ;

८. वर्गणीचे दर.–

(१) वर्गणीची रक्कम, खालील शर्तीच्या अधीन राहून वर्गणीदार स्वतः निश्चित करेल. त्या शर्ती अशा.—

(अ) ती रक्कम पूर्ण रुपयांत दर्शविलेली असेल.

(ब) अशा रितीने दर्शविलेली कोणतीही रक्कम त्याच्या वित्तलब्धीच्या ६ टक्के रकमेपेक्षा कमी नसेल आणि त्याच्या एकूण वित्तलब्धीपेक्षा जास्त नसेल :

परंतु, वर्गणीदार, जो यापुर्वीच शासकीय अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये १० टक्क्यांच्या उच्चतर दराने वर्गणी भरीत असेल अशा रीतीने दर्शविलेली रक्कम कितीही असली तरी, त्याच्या वित्तलब्धीच्या १० टक्क्यांपेक्षा कमी नसेल आणि त्याच्या एकूण वित्तलब्धीपेक्षा जास्त नसेल.

(क) शासकीय कर्मचारी जेव्हा कमीतकमी ६ टक्के दराने किंवा यथास्थिती १० टक्के दराने वर्गणी भरण्याचा निर्णय घेईल तेव्हा रुपयाचा अपूर्णांक पुढील पूर्ण रुपयात करण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) च्या प्रयोजनार्थ वर्गणीदाराची वित्तलब्धी पुढील प्रमाणे असेल :—

(अ) निकटपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी शासकीय सेवेत असणा-या वर्गणीदाराच्या बाबतीत त्या तारखेला त्यास जी वित्तलब्धी मिळण्याचा हक्क असेल ती वित्तलब्धी.

(ब) उक्त तारखेला जो रजेवर असेल व या रजेच्या कालावधीत वर्गणी न भरण्याचा निर्णय ज्याने घेतलेला आहे किंवा उक्त तारखेस जो निलंबनाधीन असेल त्या वर्गणीदाराच्या बाबतीत तो कामावर रुजू झाल्यानंतर पहिल्या दिवशी त्यास जी वित्तलब्धी मिळण्याचा हक्क असेल ती वित्तलब्धी.

(क) उक्त दिनांकास जो भारताच्या बाहेर प्रतिनियुक्तीवर असेल किंवा उक्त दिनांकास रजेवर गेला असेल व ज्याची रजा पुढे चालू असेल आणि त्याने अशा रजेच्या कालावधी दरम्यान वर्गणी भरण्याचा निर्णय घेतलेला असेल, अशा वर्गणीदाराच्या बाबतीत तो भारतात सेवेत असता तर जी वित्तलब्धी मिळण्याचा त्याला हक्क असता ती वित्तलब्धी.

(ड) लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी जो वर्गणीदार शासकीय सेवेत नव्हता त्याच्या बाबतीत, तो ज्या तारखेस निधीचा वर्गणीदार होईल त्या तारखेस त्याला जी वित्तलब्धी मिळण्याचा हक्क असेल ती वित्तलब्धी.

(३) वर्गणीदार प्रत्येक वर्षातील त्याच्या मासिक वर्गणीची रक्कम निश्चित करण्याची सूचना खालील रीतीने देईल.—

(अ) जर तो, लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी कामावर असेल तर तो त्या महिन्याच्या त्याच्या वेतन देयकामधून यासाठी जी वजात करील ती रक्कम ;

(ब) जर तो, लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी रजेवर असेल आणि या रजेच्या कालावधीत वर्गणी न देण्याचा त्याने निर्णय घेतलेला असेल किंवा त्या तारखेस तो निलंबनाधीन असेल तर कामावर रुजू झाल्यानंतर त्याच्या वेतन देयकात यासाठी तो जी वजात करील ती रक्कम ;

(क) जर त्या वर्षी शासकीय सेवेत तो प्रथमच प्रवेश करीत असेल तर तो निधीचा ज्या महिन्यात वर्गणीदार होईल त्या महिन्यात त्याच्या वेतन देयकात यासाठी जी वजात करील ती रक्कम ;

(ड) जर तो लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी रजेवर असेल आणि त्याची रजा चालू असेल आणि त्याने या रजेच्या कालावधीत वर्गणी देण्याचा निर्णय घेतला असेल तर त्या महिन्याच्या वेतन देयकात त्याने याबाबतीत जी वजात करावयास लावली असेल ती रक्कम ;

(इ) जर लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी तो स्वीयेतर सेवेत असेल तर चालू वर्षातील एप्रिल महिन्याची वर्गणी म्हणून कोषागारामध्ये त्याने जमा केलेली रक्कम.

(४) **अशाप्रकारे निश्चित केलेली वर्गणीची रक्कम.–**

(अ) वर्षामध्ये कोणत्याही वेळी एकदाच कमी करता येईल.

(ब) वर्षामध्ये दोनदा वाढविता येईल, किंवा

(क) वरीलप्रमाणे कमी करता येईल आणि वाढविता येईल :

परंतु, अशा प्रकारे कमी केलेली वर्गणीची रक्कम ही पोट-नियम (१) मध्ये विहित केलेल्या किमान वर्गणीपेक्षा कमी असणार नाही :

Provided further that, if the subscriber is on leave without pay or leave on half-pay or half-average-pay for a part of a calender month and he has elected not to subscribe during such leave the amount of subscription payable shall be proportionate to the number of days spent on duty including leave, if any, other than those referred to above.

9. Application of rules to Government servants transferred to foreign service.—When the subscriber is transferred to foreign service or sent on deputation out of India he shall remain subject to the rules of the Fund, in the same manner as if he was not so transferred or sent on deputation.

10. Arrears of pay and allowance to be credited to the Fund.—Notwithstanding anything contained in these rules the arrears of pay and allowance which may accrue, at any time, to a subscriber as a result of the general revision of pay or the rates of allowances shall, if the State Government so directs, be credited to his account in the Fund.

11. Realisation of Subscription.—(1) When emoluments are drawn from a Government Treasury in India or from an Authorised Office of Disbursement outside India, recovery of subscription on acount of these emoluments and of the principal and interest of advance shall be made from the emoluments themselves.

(2) When emoluments are drawn from any other source, the subscriber shall forward his monthly dues to the Accounts Officer by means of Cross Cheque or Demand Draft drawn in favour of the Accounts Officer or credited into the Government account under the Major Head [1]"8009—State Provident Fund" with a memo of Chalan in form MTR-6-A as provided *vide* rule 112 of the Maharashtra Treasury rules, 1968 before 5th of every month and shall send to the Accounts Officer a copy of General Provident Fund Schedule marked distinctly as "Advanced Schedule" showing the details of deductions/recoveries which is remitted into the Government Account along with copy of Chalan duly authenticated :

Provided that, in case of a subscriber on depution to a Body, Corporation, Board, owned or controlled by Government. The subscription shall be recovered and forwarded to the accounts officer by such Body, Corporation or Board.

(3) If a subscriber fails to subscribe with effect from the date on which he is required to join the fund or is in default in any month or months during the course of a year otherwise than as provided in rule 7, the total amount due to the fund on account of arrears of subscription shall, with interest thereon at the rate provided in rule 12 forthwith be paid by the subscriber to the fund or in default be ordered by the Accounts Officer to be recovered by deductions from the emoluments of the subscriber by instalments or otherwise, as may be directed by the authority competent to sanction an advance for the grant of which the special reasons are required under clause (c) of sub-rule (*1*) of rule 13 :

Provided that the subscribers whose deposits in the fund carry no interest shall not be required to pay any interest.

12. Interest.—(1) Subject to the provisions of sub-rule (*5*) Government shall pay to the credit of the account of a subscriber interest at such rate as may be determined for each year according to the method of calculation prescribed from time to time by the Government of Maharashtra :

Provided that, if the rate of interest determined for a year is less than four percent, all existing subscriber's fund in the year preceding that for which the rate has for the first time been fixed at less than four percent shall be allowed interest at 4 percent :

---

[1] These figures and words were substituted for the figures and words "8005-State Provident Fund", by G.N. GAD, dated 19-12-2015, Rule 3.

आणखी असे की, जर वर्गणीदार कोणत्याही कॅलेंडर महिन्याच्या काही दिवसांसाठी अवैतनिक किंवा अर्धवैतनिक अथवा अर्ध सरासरी वेतनावरील रजेवर असेल आणि अशा रजेच्या कालावधीत वर्गणी न भरण्याचा पर्याय त्याने स्वीकारला असेल तर, देय असलेली वर्गणीची रक्कम ही, वर निर्दिष्ट केलेल्या रजांव्यतिरिक्त असल्यास इतर कोणतीही रजा धरून त्याने काम केलेल्या दिवसांच्या प्रमाणानुसार होणारी रक्कम असेल.

९. स्वीयेतर सेवेत बदली झालेल्या शासकीय कर्मचा-याला नियम लागू करणे :

जेव्हा एखाद्या वर्गणीदाराची स्वीयेतर सेवेत बदली केली असेल किंवा त्यास प्रतिनियुक्तीवर भारताच्या बाहेर पाठविले असेल, तेव्हा जणू काही त्याची बदली झालेली नव्हती किंवा त्याला प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेले नव्हते, असे समजून त्याला भविष्य निर्वाह निधीचे नियम लागू असतील.

१०. वेतन व भत्त्याच्या थकबाकीची रक्कम निधीमध्ये जमा करणे :

या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, वेतन किंवा भत्त्याच्या दरात सामान्यतः सुधारणा करण्यात आल्याने वेतन आणि महागाई यांची कोणत्याही वेळी वर्गणीदाराच्या नावे जमा होणारी थकबाकी राज्य शासनाने तसा आदेश दिल्यास निधीमध्ये त्याच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

११. वर्गणीची वसुली :

(१) भारतातील सरकारी कोषागारातून किंवा भारताबाहेरील प्राधिकृत संवितरण कार्यालयातून जेव्हा वित्तलब्धीची रक्कम काढण्यात येते तेव्हा या वित्तलब्धीनुसार द्यावयाची वर्गणी आणि मूळ रक्कम व आगाऊ रकमेवरील व्याज यांची वसुली त्याच्या प्रत्यक्ष वित्तलब्धीमधूनच करण्यात येईल.

(२) जेव्हा वित्तलब्धी इतर कोणत्याही मार्गाने काढण्यात आल्या असतील तेव्हा वर्गणीदार स्वतःची मासिक देय रक्कम प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी, " महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ " च्या नियम ११२ मधील तरतुदीनुसार एखाद्या ज्ञापनासहित किंवा नमुना म.को.नि.-६ अ (एम.टी.आर. ६-ए) मधील चलनासहित रोखीत धनादेशाव्दारे किंवा लेखा अधिका-याच्या नावे दर्शनी धनाकर्ष काढून (डिमांड ड्राफ्टव्दारे) किंवा[१] " ८००९-राज्य भविष्य निर्वाह निधी " या प्रधान शिर्षकाखाली शासनाच्या खात्यात जमा करेल आणि शासनाच्या खात्यात भरणा केलेल्या वजाती वसुली यांचा तपशील दर्शविणारी " आगाऊ अनुसूची " असे सुस्पष्टपणे चिन्हीत केलेली सर्वसारधारण भविष्य निर्वाह निधीच्या अनुसूचीची प्रत यथोचितरित्या अधिप्रमाणित केलेल्या चलनाच्या प्रतीसह लेखा अधिका-याकडे पाठवील :

परंतु शासनाच्या मालकीची किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेली एखादी संस्था, महामंडळ किंवा मंडळ यांच्याकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या वर्गणीदारांच्या बाबतीत ती वर्गणी अशा संस्थेकडून, महामंडळाकडून किंवा मंडळाकडून वसूल करण्यात येईल व ती लेखा अधिका-याकडे पाठविण्यात येईल.

(३) जर एखाद्या व्यक्तीने ती ज्या दिवसापासून निधीची वर्गणीदार होणे आवश्यक आहे त्या दिवसापासून वर्गणी भरली नसेल किंवा नियम-७ मध्ये तरतूद केली आहे त्याखेरीज अन्यथा वर्षभरात कोणत्याही महिन्याची किंवा महिन्यांची वर्गणी देण्यात कसूर केली असेल तर वर्गणीची थकबाकी म्हणून निधीत जमा करावयाची एकूण रक्कम, नियम १२ मध्ये उपबंधित केलेल्या दराने त्यावरील व्याजसहित निधीमध्ये तात्काळ जमा करावी लागेल किंवा असे न केल्यास, ही रक्कम वर्गणीदाराला मिळणा-या वित्तलब्धीमधून नियम १३ च्या पोट-नियम (एक), खंड (क) अन्वये जी आगाऊ रक्कम देण्यासाठी विशेष कारणांची आवश्यकता आहे अशी अगाऊ रक्कम मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याकडून निर्देश देण्यात येईल त्याप्रमाणे हप्त्याहप्त्याने किंवा इतर प्रकारे वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधील वजातीद्वारे वसूल केली जावी, असा आदेश लेखा अधिका-यास देता येईल :

परंतु, ज्या वर्गणीदाराच्या निधीमधील ठेवीबंद व्याज देण्यात येत नसेल त्याने असे व्याज भरणे आवश्यक असणार नाही.

१२. व्याज.— (१) पोट-नियम (५) च्या तरतुदींना अधीन राहून महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या हिशोबाच्या पद्धतीप्रमाणे प्रत्येक वर्षी निश्चित करण्यात येईल अशा दराने, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेवर शासन व्याज देईल :

परंतु जर एखाद्या वर्षासाठी व्याजाचा दर ४ टक्क्यांपेक्षा कमी निश्चित करण्यात आला असेल तर ज्या वर्षात ४ टक्क्यांपेक्षा कमी व्याजाचा दर प्रथमच निश्चित करण्यात आला असेल, त्या वर्षाच्या मागील वर्षामध्ये वर्गणीदारांच्या सर्व विद्यमान निधीवर ४ टक्के दराने व्याज देण्यात येईल :

---

[१] शा. अधि. साप्रवि दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ३ अन्वये, ८००५-राज्य भविष्य निर्वाह निधी या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

Provided further that, subscriber who was previously subscribing to any other Provident Fund of another Government and whose subscriptions with interest thereon have been transferred to his credit in the fund under rule 32 shall also be allowed interest at 4 percent if he had been receiving that rate of interest under the rules of such other provident fund under the provisions similar to that of the first proviso to this rule.

(2) Interest shall be credited with effect from the last day in each year in the following manner :—

(*i*) on the amount at the credit of the subscriber for the last day the preceding year, less any sum withdrawn during the current year interest for 12 months.

(*ii*) on sums withdrawn during the current year interest from the beginning of the current year up to the last day of the month preceding the month of withdrawl.

(iii) on all sums credited to the subscriber's account after the last day of preceding year interest from the date of deposit up to the end of current year.

(*iv*) the total amount of interest shall be rounded to the nearest whole rupee, 50 paise to be rounded up to the next higher rupee :

Provided that when the amount standing to the credit of the subscriber has become payable, interest shall thereupon be credited under this sub-rule in respect of only the period from the beginning of the current year or from the date of deposit as the case may be, up to the date on which the amount standing at the credit of subscriber becomes payable.

(3) In this rule, the date of deposit shall, in case of recovery from emoluments, be deemed to the first day of the month in which it is recovered, and in the case of an amount forwarded by the subscriber, shall be deemed to be the first day of the month of receipt, if it is received by the Accounts Officer before the 5^{th} day of that month, but if it is received on or after the 5^{th} day of that month, 1^{st} day of the next succeeding month :

Provided that where the emoluments for the month are drawn and disbursed on the last working day or last but one working day of the same month, the date of deposit shall in the case of recovery of his subscription be the 1st day of the succeeding month :

Provided further that where there has been delay in the drawal of pay or leave salary and allowances of a subscriber and consequently in the recovery of his subscription towards the fund, the interest of such subscription shall be payable from the month in which the pay or leave salary of the subscriber was due under the rules irrespective of the month in which it was actually drawn :

Provided also that in the case of amount forwarded in accordance with the provision of sub-rule (*2*) of rule 11, the date of deposit shall be deemed to be the first day of the month if it is received from the Accounts Officer before the 15^{th} day of that month.

(4) In addition to any amount to be paid under Rules 28,29 or 30, interest thereon upto the end of the month, in which the payment is made or upto the end of the 6th month after the month in which such amount becomes payable, whichever of this period is less, shall be payable to the person to whom such amount is to be paid :

Provided also that where the Accounts Officer has intimated to that person or his agents the date on which he is prepared to make payment in cash or has posted a cheque in payment to that person interest shall be payable only upto the end of the month preceding the date so intimated or the date of posting the cheque as the case may be :

परंतु, आणखी असे की, दुस-या शासनाच्या इतर कोणत्याही भविष्य निर्वाह निधीचा जो यापूर्वी वर्गणीदार होता आणि ज्याची वर्गणी त्यावरील व्याजासहित नियम ३२ अन्वये त्याच्या खाती निधीमध्ये हस्तांतरित करण्यात आली असेल, अशा वर्गणीदाराला जर, या नियमांच्या पहिल्या परंतुकाच्या तरतुदीप्रमाणेच अशा इतर भविष्य निर्वाह निधीच्या नियमानुसार त्यास त्या दराने व्याज मिळत असेल, तर त्या वर्गणीदारालादेखील ४ टक्क्याने व्याज देता येईल.

(२) **प्रत्येक वर्षातील शेवटच्या दिवसापासून व्याज खालीलप्रमाणे जमा केले जाईल.—**

(एक) चालू वर्षात काढून घेतलेल्या रकमा वजा करून मागील वर्षाच्या शेवटच्या दिवशी वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेवर बारा महिन्याचे व्याज.

(दोन) चालू वर्षात काढून घेतलेल्या रकमेवर चालू वर्षाच्या सुरवातीपासून ज्या महिन्यात रक्कम काढून घेतली होती, त्याच्या मागील महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंतचे व्याज.

(तीन) मागील वर्षातील शेवटच्या दिवसानंतर वर्गणीदाराच्या खाती जमा करण्यात आलेल्या सर्व रकमांवर, त्या ठेवण्याच्या दिनांकापासून ते चालू वर्षाच्या अखेरीपर्यंतचे व्याज.

(चार) व्याजाची एकूण रक्कम नजिकच्या संपूर्ण रुपयात रूपांतरीत केली जाईल, पन्नास पैसे ही रक्कम पुढील पूर्ण रुपया असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, ज्या वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम देय होत असेल तेव्हा, यथास्थिती, चालू वर्षाच्या सुरवातीपासून किंवा ती रक्कम जमा झाल्याच्या दिनांकापासून, त्याच्या खाती जमा असलेली रक्कम देय होणार असेल तर त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी या पोट-नियमाखाली त्या रकमेवरील व्याज त्याच्या खाती जमा केले जाईल.

(३) या नियमात, वितलब्धीमधून करण्यात आलेल्या वसुलीच्या बाबतीत, वसुली ज्या महिन्यात करण्यात आली असेल त्या महिन्याचा पहिला दिवस हा ठेवीचा दिनांक असल्याचे समजण्यात येईल. आणि वर्गणीदाराने अग्रेषित केलेल्या रकमेच्या बाबतीत त्या महिन्याच्या पाच तारखेच्या आत लेखा अधिका-याला ती रक्कम पोहचली असेल तर ती प्राप्त झालेल्या महिन्याचा पहिला दिवस आणि त्या महिन्याच्या ५ तारखेस किंवा त्यानंतर ही रक्कम पोहचली असेल तर लगतनंतरच्या महिन्याचा पहिला दिवस हा ठेवीचा दिनांक असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, त्या महिन्याची वित्तलब्धी, त्याच महिन्यातील शेवटच्या कामाच्या दिवशी किंवा शेवटून दुस-या कामाच्या दिवशी काढण्यात येत असेल व वाटली जात असेल तर वर्गणीच्या वसुलीच्या बाबतीत ठेवीचा दिनांक हा लगतनंतरच्या महिन्याचा पहिला दिवस असेल :

आणखी असे की जेथे वर्गणीदाराचे वेतन किंवा रजावेतन आणि भत्ते काढण्यात विलंब झाला असेल आणि परिणामी निधीच्या वर्गणीची वसुली करण्यात विलंब झाला असेल तर कोणत्या महिन्यात ते दिले गेले हे लक्षात न घेता, वर्गणीदाराचे वेतन किंवा रजावेतन ज्या महिन्यात देय असेल त्या महिन्यापासून अशा वर्गणीवरील व्याज देय होईल,

तसेच नियम ११ च्या पोट-नियम (२) च्या परंतुकानुसार, अग्रेषित करण्यात आलेल्या रकमेच्या बाबतीत ही रक्कम लेखाधिका-याकडून महिन्याच्या पंधरा तारखेपूर्वी प्राप्त झाली असेल तर त्या महिन्याचा पहिला दिवस ठेवीचा दिनांक समजण्यात येईल.

(४) नियम २८, २९ किंवा ३० खाली देण्यात येणा-या रकमेव्यतिरिक्त ज्या महिन्यात ही रक्कम दिली गेली त्या महिन्याच्या आधीच्या महिन्या अखेरपर्यंत किंवा ज्या महिन्यात देय होईल त्या महिन्यानंतरच्या सहाव्या महिन्याच्या अखेरपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कोणत्याही कालावधीसाठी अशा रकमेवरील व्याज ज्या व्यक्तीला अशी रक्कम द्यावयाची असेल त्या व्यक्तीला देय होईल :

परंतु, लेखा अधिका-याने त्या व्यक्तीला किंवा तिच्या प्रतिनिधीला ज्या तारखेस ही रक्कम रोख देण्याचे तिला कळविले असेल किंवा या रकमेचा धनादेश ज्या तारखेस त्या व्यक्तीकडे टपालाने पाठविला असेल त्या बाबतीत असे कळविण्यात आल्याच्या किंवा यथास्थिती, धनादेश पाठविण्यात आल्याच्या तारखेच्या आधीच्या महिन्याच्या अखेरीपर्यंतच केवळ व्याज देय होईल.

Provided also that if the balance amount in the provident Fund Account of the subscriber is authorised by the Accounts Officer, but is actually paid after a period of one month to the subscriber or his heirs, as the case may be, through the Office where the subscriber was last working, the interest on the amount mentioned in this clause shall be calculated upto the date on which the amount is actually paid to the subscriber or his heirs, as the case may be, in accordance with the provisions laid down in this clause :

Provided also that where a subscriber on deputation to a body or corporation owned or controlled by the Government or autonomous organisation under the society's Registration Act, 1860 (21 of 1860) is subsequently absorbed in such Body/Corporation or Organisation with effect from retrospective date, for the purpose of calculating interest due on the found accumulation of the subscriber the date of issue of the orders regarding absorption shall be deemed to be the date on which the amount to the credit of the subscriber became payable subject however, to the condition that the amount recovered as subscription during the period commencing from the date of absorption and ending with the date of issue of orders of absorption shall be deemed to be subscriptions to the fund only for the purpose of awarding interest under this sub-rule.

[1]*Note*.–(1) Payment of interest on the fund beyond a period of six months may be authorised by,–

(a) The Accounts Officer upto a period of one year,

and

(b) The immediate supervisory Officer to the Accounts Officer (which expression includes Deputy Accountant General or Senior Deputy Accountant General, or the Accountant General, Heads of Offices in the case of Group 'D' Government servants and Chief Executive Officers of the Zilla Parishads in case of Zilla Parishads employees) upto any periods.

After he has personally satisfied himself that the delay in payment was occasioned by the circumstances beyond the control of the subscriber or person to whom such payment was to be made, and in every such case the administrative delay involved in the matter shall be fully investigated and action, if any, required to be taken.

(5) If subscriber holding a temporary post exercise on termination of his appointment, the option allowed by rule 28 of leaving in the fund, the amount accumulated to his credit, interest shall be allowed on that amount for not more than 6 months after the termination of the employee. If he obtains re-employment, under Government, deposits not withdrawn, will commence again to bear interest from the date on which subscriptions are renewed.

(6) Interest shall not be credited to the account of a Mohammedon subscriber if he informs the Accounts Officer that he does not wish to receive it, but if he subsequently ask for interest, it shall be credited with effect from the first day of the year in which he ask for it.

(7) The interest on amounts which under sub-rule (*3*) of rule 11, rule 25 or rule 26 are replaced at the credit of the subscriber in the fund, shall be calculated at such rates as may be successively prescribed under sub-rule (*1*) of this rule and so far as may be in the manner described in this rule.

(8) In case a subscriber is found to have drawn from the fund an amount in excess of the amount standing to his credit on the date of drawal, overdrawn amount, irrespective of whether the overdrawal has occured in respect of the advance or withdrawal or final payment from the Fund, shall be repaid by him with interest thereon, in one lump sum or in default, be ordered to be recovered by deduction in one lump sum, or suitable instalment as may be determined by the Competent Authority, from the emoluments of the subscriber, for the prupose of this sub-rule the rate of interest to be charged on overdrawn amount would be 2 ½ percent over and above, normal rate of provident fund balance under sub-rule (*1*) prevailing on the date of actual withdrawal of the amount, interest realised on the overdrawn amount shall be credited to the Government Account under a separate sub-head. "Interest on overdrawals from the Provident Fund" under the Head " 0049=Interest receipts 04; interest receipts of State/Union Territory Government ; 800 other receipts."

---

[1] This note was substituted by G. N. GAD dated 19-12-2015, Rule 4.

तसेच, वर्गणीदाराच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यामधील शिल्लक रक्कम लेखा अधिका-याने प्राधिकृत केली असेल परंतु ती रक्कम वर्गणीदार जेथे शेवटी कामावर होता त्या कार्यालयामार्फत किंवा यथास्थिती त्याच्या वारसाला एका महिन्याच्या कालावधीनंतर प्रत्यक्षपणे देण्यात आली असेल, तर या खंडात नमूद केलेल्या रकमेवरील व्याज, या खंडात नमूद केलेल्या तरतुदींच्या अनुसार, वर्गणीदारास किंवा यथास्थिती, त्याच्या वारसाला रक्कम ज्या तारखेला प्रत्यक्षपणे देण्यात आली असेल त्या तारखेपर्यंत गणण्यात येईल.

आणखी असे की, शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या मंडळाकडे किंवा महामंडळाकडे किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) खालील एखाद्या स्वायत्त संघटनेमध्ये प्रतिनियुक्तीवर असलेल्या वर्गणीदारास भूतलक्षी तारखेपासून अशा मंडळामध्ये/महामंडळामध्ये किंवा संघटनेमध्ये नंतर सामावून घेण्यात आली असेल त्याबाबतीत, त्या वर्गणीदाराच्या निधीमधील जमा रकमांवर देय होणारे व्याज मोजण्याच्या प्रयोजनार्थ त्याला सामावून घेण्यासंबंधीच्या आदेशाची तारीख ही वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम देय झाल्याची तारीख मानण्यात येईल. तथापि, ती (तारीख) त्याला सामावून घेतल्याच्या तारखेपासून सुरू होणा-या व सामावून घेतल्याच्या आदेशांच्या तारखेपर्यंतच्या कालावधीमध्ये वर्गणी म्हणून वसूल केलेली रक्कम ही, केवळ या पोट-नियमाखाली व्याज देण्याच्या प्रयोजनार्थ, निधीची वर्गणी असल्याचे मानण्यात येईल, या शर्तीच्या अधिन असेल.

[1] **टीप.**—(१) रक्कम प्रदानातील ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीचा विलंब हा, वर्गणीदाराच्या किंवा जिला अशी रक्कम प्रदान करावयाची होती अशा व्यक्तीच्या आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळे झाला असल्याबद्दल व्यक्तिशः खात्री झाल्यानंतर,-

(अ) लेखा अधिकारी एका वर्षाच्या कालावधीपर्यंतच्या निधीवरील व्याज प्रदानास मंजुरी देऊ शकेल,

आणि

(ब) लेखा अधिका-याच्या लगतचा वरिष्ठ पर्यवेक्षीय अधिकारी (यामध्ये, उप महालेखापाल/वरिष्ठ उप महालेखापाल अथवा महालेखापाल, तसेच गट-"ड" मधील शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत कार्यालय प्रमुख आणि जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या बाबतीत जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी) कोणत्याही कालावधीपर्यंतच्या निधीवरील व्याज प्रदानास मंजुरी देऊ शकेल आणि प्रशासकीय विलंब झालेल्या अशा प्रत्येक प्रकरणातील विलंबाबाबत पूर्णपणे चौकशी करण्यात येईल आणि त्या विलंबास जबाबदार असलेल्या कर्मचारी/अधिका-यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

(५) तात्पुरत्या पदावर काम करणा-या वर्गणीदाराने सेवेतून मुक्त झाल्यावर नियम २८ च्या उपबंधानुसार त्याच्या खाती जमा असलेली रक्कम निधीत शिल्लक ठेवण्याचा निर्णय घेतला असेल तर अशा बाबतीत त्या रकमेवर सेवासमाप्तीनंतर सहा महिनेपर्यंत व्याज देण्यात येईल. परंतु शासकीय सेवेत त्याला पुन्हा कामावर घेण्यात आले तर त्याची वर्गणी ज्या तारखेस पुन्हा चालू करण्यात येईल त्या तारखेपासून ज्या ठेवी काढून घेतलेल्या नसतील त्या ठेवींवर व्याज देण्यास प्रारंभ करण्यात येईल.

(६) मुसलमान कर्मचा-यांच्या बाबतीत जर त्याने व्याज घेण्याची आपली इच्छा नाही, असे लेखा अधिका-याला कळविले असेल तर त्याच्या खाती व्याज जमा करण्यात येणार नाही परंतु नंतर जर त्याने व्याजाची मागणी केली असेल, तर ज्या वर्षात अशी विनंती करण्यात आली असेल त्या वर्षातील पहिल्या दिवसापासून त्याच्या खाती व्याज जमा करण्यात येईल.

(७) नियम ११ च्या पोट-नियम (३), नियम २५ किंवा नियम २६ अन्वये ज्या रकमांवरील व्याज वर्गणीदाराच्या निधीमधील खात्यात पुन्हा जमा करण्यात आले असेल त्या रकमांवरील व्याज या नियमांच्या पोट-नियम (१) अन्वये क्रमशः विहित करण्यात येतील अशा दरानी आणि शक्य असेल तेथवर या नियमात वर्णन केलेल्या पध्दतीनुसार निश्चित करण्यात येईल.

(८) वर्गणीदाराने पैसे काढण्याच्या तारखेस त्याच्या खाती जमा असलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम निधीतून काढली असल्याचे आढळून आले असेल तर त्या प्रकरणी, अशी जास्त काढलेली रक्कम ही, निधीतून घेतलेले अग्रिम किंवा काढून घेतलेली रक्कम किंवा अंतिम प्रदान म्हणून काढलेली रक्कम यांच्या बाबतीतील जास्त काढलेली रक्कम यापैकी कोणतीही रक्कम असली तरीही, त्यावरील व्याजासह एका ठोक रकमेत त्याने ती परत केली पाहिजे किंवा तशी त्याने ती परत केली नाही तर, वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून एक ठोक रक्कम किंवा निर्धारित केल्याप्रमाणे योग्य हप्त्यांमध्ये रक्कम वजा करून ती वसूल करण्याचे आदेश सक्षम प्राधिका-यांकडून देण्यात येतील. या पोट-नियमाच्या प्रयोजनार्थ, जादा काढलेल्या रकमेवर, पोट-नियम (१) अन्वये, रक्कम प्रत्यक्ष काढल्याच्या तारखेस असलेल्या भविष्य निर्वाह निधीच्या शिल्लक रकमेवर सर्वसाधारण दरापेक्षा २ $\frac{१}{२}$ टक्के अधिक दराने व्याज आकारण्यात येईल. जास्त काढलेल्या रकमेवरील वसूल केलेले व्याज हे, "००४९, व्याजाच्या जमा रकमा-०४, राज्य/संघराज्य क्षेत्र शासनाकडून मिळालेल्या व्याजाच्या रकमा-८०० इतर जमा रकमा" या शीर्षाखाली "भविष्य निर्वाह निधीतून काढलेल्या जादा रकमांवरील व्याज" या स्वतंत्र उपशीर्षाखाली शासकीय लेख्यात जमा करण्यात येईल.

---

[1] शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ४ अन्वये, मूळ टीप (१) ऐवजी टीप (१) दाखल करण्यात आली.

Explanation.–(1) As a result of revision of pay scales, the arrears of provident fund subscription would become due from the month in which it is payable, in respect of such Government servants as were subscribing to their provident fund accounts at the minimum rate prescribed under the rules. The interest on arrears of subscription shall be payable from the month in which pay under the revised pay rules was due irrespective of the month in which such arrears are actually credited.

(2) As per rule 8(*1*)(*b*), the maximum subscription admissible is not more than the emoluments of subscriber, hence the subscriptions in excess of the maximum permissible subscription will not carry interest.

(3) If a subscriber found absconding, interest shall be allowed upto 6 months from the date of report from the police that the employee has not been traced.

(4) When a subscriber retires on superannuation, the period of 6 months for allowing interest shall exclude the immediate succeeding month.

(5) If the order of payment is issued after the 15th, it will be payable in the next month, and in such cases full interest shall be allowed for the month in which the order is issued.

13. Advances from the Fund.–(1) The appropriate sanctioning authority may sanction the payment to any subscriber advance for a sum not exceeding the amount of three months pay or half the amount standing to his credit in the fund, whichever is less, for any one of the following purposes.–

(*a*) to pay expenses in connection with the illness, confinement or a disability, including where necessary, the travelling expenses of a subscriber and members of his family or any person actually dependent on him ;

(*b*) to meet cost of higher education, including where necessary, travelling expenses of the subscriber and members of his family or any person actually dependent on him in the following cases, namely, (i) for education outside India for Academic, Technical, Professional or Vocational course beyond the High School stage, and (ii) for any medical, engineering or other technical or specified courses in India after completion of the High School studies :

Provided that clause (*b*) shall not apply if the course of study in the course of military education in any Sainik or Military School which commences before completion of the High School studies ;

(*c*) to meet expenses commensurate with the status of subscriber which by customary usage the subscriber has to incur in connection with the betrothals or marriage or of subscriber or of a member of his family or for any person actually dependent on him or other ceremonies ;

(*d*) to meet the cost of legal proceedings instituted by or against for subscriber or any member of his family or any person actually dependent upon him. The advance in this case may be available in addition to any advance admissible for the same purpose from any other Government source ;

(*e*) to meet the cost of the Subscriber's defence where he engages a legal practitioner to defend himself in an enquiry in respect of any alleged official misconduct on his part or any suit instituted against him ;

(*f*) to meet the cost of legal proceedings instituted by private party against the subscriber in respect of the matters connected with the discharge of his official duty ;

स्पष्टीकरण.-(१) या नियमान्वये विहित केलेल्या किमान दराने जे शासकीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणी भरत होते अशा शासकीय कर्मचा-यांच्या संबंधात वेतनमानातील सुधारणेचा परिणाम म्हणून भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीची थकबाकी, ती ज्या महिन्यात देय असेल त्या महिन्यापासून देय (येणे) होईल. वर्गणीच्या थकबाकीवरील व्याज, सुधारित वेतन नियमान्वये ज्या महिन्यात देणे बाकी होते त्या महिन्यात अशी थकबाकी ज्या महिन्यात प्रत्यक्षपणे जमा केली गेली आहे तो महिना लक्षात न घेता त्या महिन्यापासून देय असेल.

(२) नियम ८(१) (ब) नुसार अनुज्ञेय असलेली वर्गणीची कमाल रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीपेक्षा जास्त असणार नाही, म्हणूनच कमाल अनुज्ञेय वर्गणीपेक्षा अधिक असलेल्या वर्गणीच्या रकमेवर व्याज देण्यात येणार नाही.

(३) वर्गणीदार बेपत्ता झालेला आढळल्यास, कर्मचा-याला शोधून काढण्यात आलेले नाही अशा पोलिसांकडून मिळालेल्या अहवालाच्या तारखेपासून ६ महिन्यापर्यंतचे व्याज देण्यात येईल.

(४) जेव्हा वर्गणीदार नियत सेवावधीनंतर निवृत्त झाला असेल तेव्हा व्याज देण्यासाठी ६ महिन्यांच्या कालावधीतून लगतपूर्वीचा महिना वगळण्यात येईल.

(५) जर रक्कम देण्याचा आदेश १५ तारखेनंतर देण्यात आला असेल तर ती रक्कम पुढील महिन्यात देण्यात येईल व अशा प्रकरणांत ज्या महिन्यात रक्कम देण्याचा आदेश देण्यात आला असेल त्या महिन्याचे पूर्ण व्याज देण्यात येईल.

१३. निधीमधून मिळणारी अग्रिमे :

(१) मंजुरी देणारा योग्य प्राधिकारी, कोणत्याही वर्गणीदाराला त्याच्या तीन महिन्याच्या वेतनापेक्षा अधिक नसेल एवढी किंवा निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेल्या रकमेच्या निम्मी रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम खालीलपैकी कोणत्याही एका प्रयोजनार्थ मंजूर करेल.

(अ) आजारपण, प्रसूती किंवा विकलांगता यासंबंधीचा खर्च भागविण्यासाठी, आणि यात आवश्यक असेल तेथे, वर्गणीदार आणि त्याचे कुटुंबीय किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली कोणतीही व्यक्ती यांच्या प्रवास खर्चाचाही अंतर्भाव होईल.

(ब) खाली नमूद केलेल्या प्रकरणात, उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी आणि यात आवश्यक असेल तेथे, वर्गणीदार आणि त्याचे कुटुंबीय आणि प्रत्यक्षात त्याच्यावर अवलंबून असलेली कोणतीही व्यक्ती यांच्या प्रवासाच्या खर्चाचा समावेश असेल (एक) माध्यमिक शाळेच्या टप्प्यानंतर भारताबाहेर विद्याविषयक, तांत्रिक, व्यावसायिक किंवा व्यवसाय शिक्षण पाठ्यक्रमाचा खर्च भागविण्यासाठी, आणि (दोन) उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर भारतातील कोणत्याही वैद्यकीय, अभियांत्रिकी, किंवा इतर तांत्रिक किंवा विनिर्दिष्ट शिक्षणक्रमाचा खर्च भागविण्यासाठी :

परंतु, जर या शिक्षणाचा पाठ्यक्रम हा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण होण्यापूर्वी सुरू होणा-या कोणत्याही सैनिकी किंवा लष्करी शाळेतील सैनिकी शिक्षणाचा पाठ्यक्रम असेल तर खंड " ब " लागू होणार नाही.

(क) वर्गणीदार, त्याच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली एखादी व्यक्ती यांना वाङनिश्चय किंवा विवाह किंवा इतर धार्मिक कार्यासाठी परंपरागत रूढीनुसार, आपल्या दर्जानुसार जो खर्च करणे भाग असेल तो खर्च भागविण्यासाठी.

(ड) वर्गणीदार, किंवा त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली एखादी व्यक्ती यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी या प्रकरणात याच प्रयोजनासाठी इतर कोणत्याही शासकीय मार्गाने अनुज्ञेय असलेल्या अग्रिमाशिवाय हे अग्रिम उपलब्ध करून देण्यात येईल.

(इ) वर्गणीदाराने एखाद्या अभिकथित कार्यालयीन गैरवर्तनाच्या किंवा त्याच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या एखाद्या दाव्याच्या संबंधातील चौकशीमध्ये स्वतःचा बचाव करण्यासाठी विधी व्यावसायिक नेमला असल्यास त्याच्या बचावासाठी झालेला खर्च भागविण्यासाठी.

(फ) आपली पदीय कर्तव्ये पार पाडीत असतांना कोणत्याही बाबींच्या संबंधात एखाद्या खाजगी पक्षकाराने वर्गणीदाराविरुद्ध दाखल केलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी.

(*g*) to meet the cost of a plot for construction of house or of a flat or a residence or to make any payment towards the allotment of a plot or flat by the City and Industrial Development Corporation or the Maharashtra Housing and Area Development Authority or a Co-opeative Society or a private builder or of reconstructing or making additions or alterations or upkeep of a house or a flat in which the subscriber is residing at the place of his duty ;

(*h*) to meet the cost of purchasing a television set or a refrigerator, or a washing machine or a solar cooker.

[1](2) The appropriate sanctioning authority may, in special circumstances, sanction the payment to any subscriber as an advance, a sum not exceeding the amount of three months pay or half the amount standing to his credit in the fund, whichever is more but not more than actual expenses also if it is satisfied that the subscriber concerned requires the advance for reasons other than those mentioned in sub-rule (*1*).

(3) No advance shall be granted to any subscriber under sub-rule (*2*) until the repayment of at least twelve instalments of the previous advance or until the last instalment thereof whichever is earlier is made.

(4) When an advance is sanctioned under sub-rule(*2*), the balance of the previous advance not recovered, shall be added to the advance sanctioned before payment of the last instalment of any previous advance is completed and the instalment for the recovery shall be fixed with reference to the consolidated amount.

(5) After sanctioning the advance, the amount shall be drawn on an authorisation from the Accounts Officer, in case where the application of final payment had been forwarded to the Account Officer under clause 2(*b*) of the Note under sub-rule (*4*) of rule 28.

Note.–(1) The appropriate sanctioning authorities for the purpose of this rule are specified in the second schedule.

Note.–(2) A subscriber shall be permitted to take an advance once in a year under clause (*b*) of sub-rule (*1*) of rule 13 in relaxation of the condition of sub-rule (*3*).

Note.–(3) Productions of documentary evidence for drawal of advance may not be insisted, it would suffice if the employee give sufficient details at the time of application about illness, higher education, house repairs or building and marriage.

Note.–(4) The list of the courses/studies for which advances/withdrawals are permissible, is given in Appendix B.

Note.–(5) Advance may be granted after expenditure is incurred if the application is not submitted unreasonably long after the event.

Note.–(6) No temporary advance should be sanctioned during the last three months of the service.

Note.–(7) The manner of fixing number of instalments for recovery of consolidated amount is explained in the Appendix C.

---

1. These sub-rules were substituted for sub-rules (*2*), (*3*) and (*4*) by G. N. GAD, dated 19-12-2015, Rule 5.

(ग) घराच्या किंवा सदनिकेच्या किंवा एखाद्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी एखाद्या भूखंडाच्या खरेदीचा खर्च भागविण्यासाठी अथवा शहर व औद्योगिक विकास महामंडळातर्फे (सिडकोतर्फे) किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे किंवा एखाद्या सहकारी संस्थेतर्फे किंवा एखाद्या खाजगी गृहशिल्पीकडून एखादा भूखंड किंवा सदनिका मिळविण्यासाठी द्यावयाची रक्कम देण्याकरिता किंवा वर्गणीदार त्याचे कर्तव्य पार पाडीत असतांना जेथे राहत असेल त्या ठिकाणी नवीन बांधकाम करणे किंवा त्यात भर घालणे किंवा त्यात फेरबदल करणे किंवा त्या घराची किंवा सदनिकेची निगा राखणे याचा खर्च भागविण्यासाठी.

(ड) दूरचित्रवाणी संच किंवा प्रशीतक किंवा कपडे धुण्याचे यंत्र किंवा सूर्यचूल (सोलर कुकर) खरेदी करण्यासाठी करण्यात येणारा खर्च भागविण्यासाठी.

[१](२) समुचित मंजुरी प्राधिकारी विशेष परिस्थितीत, जर पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी वर्गणीदाराला अग्रिम मिळणे आवश्यक आहे, अशी त्याची खात्री झाली तर, कोणत्याही वर्गणीदारास तीन महिन्यांच्या वेतनाच्या रकमेपेक्षा अधिक होणार नाही किंवा त्याच्या निधीमध्ये जमा असलेल्या रकमेच्या अर्धी रक्कम यांपैकी जी अधिक असेल परंतु प्रत्यक्ष खर्चापेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम अग्रिम म्हणून मंजूर करू शकेल.

(३) पूर्वी घेतलेल्या अग्रिमाचे किमान बारा हप्ते किंवा त्या अग्रिमाचा शेवटचा हप्ता, यापैकी जो आधी असेल त्याची परतफेड होईपर्यंत कोणत्याही वर्गणीदाराला उप-नियम (२) अन्वये अग्रिम मंजूर करण्यात येणार नाही.

(४) उप-नियम (२) अन्वये अग्रिम मंजूर केले तर, पूर्वीच्या वसूल न झालेल्या अग्रिमाची शिल्लक रक्कम, पूर्वीच्या अग्रिमाच्या शेवटच्या हप्त्याचा भरणा करण्यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमात मिळविण्यात येईल आणि त्याच्यासाठीच्या वसुलीचे हप्ते एकंदर अनुषंगाने निश्चित करण्यात येतील.

(५) अग्रिमाची रक्कम मंजूर करण्यात आल्यानंतर ज्या प्रकरणी अंतिम प्रदानाचे अर्ज नियम २८ च्या पोट-नियम (४) खालील टीप खंड २ (ब) या अन्वये लेखा अधिका-याकडे पाठविण्यात आले असतील अशा प्रकरणी ती रक्कम, लेखा अधिका-याने प्राधिकृत केल्यानंतर काढण्यात येईल.

टीप.–(१) या नियमाच्या प्रयोजनार्थ योग्य मंजुरी प्राधिकारी दुस-या अनुसूचित विनिर्दिष्ट केले आहेत.

टीप.–(२) नियम १३ पोट-नियम (१), खंड (ब) अन्वये पोट-नियम (३) च्या शर्ती शिथील करून, वर्गणीदाराला वर्षातून एकदा अग्रिम घेण्यास मुभा राहील.

टीप.–(३) अग्रिम काढण्यासाठी कागदोपत्री पुरावे सादर करण्याचा आग्रह धरला जाणार नाही, कर्मचा-याने अर्ज करतेवेळी आजारपण, उच्चशिक्षण, घरदुरुस्ती किंवा इमारत बांधणे आणि लग्न याबाबत पुरेसा तपशील दिला तर तो पुरेसा असेल.

टीप.–(४) ज्या पाठ्यक्रमासाठी/अभ्यासक्रमासाठी अग्रिम घेणे/रक्कम काढणे अनुज्ञेय आहे त्या पाठ्यक्रमांची/अभ्यासक्रमांची सूची परिशिष्ट (ब) मध्ये दिली आहे.

टीप.–(५) जर घटनेनंतर अवाजवी उशिरा अर्ज सादर केला नसेल तर खर्च केल्यानंतरही अग्रिम मंजूर करता येईल.

टीप.–(६) सेवेच्या शेवटच्या तीन महिन्यांत कोणतेही तात्पुरते अग्रिम मंजूर केले जाणार नाही.

टीप.–(७) एकत्रित रकमेची वसुली करण्यासाठी हप्त्यांची संख्या निश्चित करण्याची रीत परिशिष्ट " क " मध्ये स्पष्ट करण्यात आली आहे.

---

१. शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ५ अन्वये, मूळ उप-नियम (२), (३) आणि (४) ऐवजी उप-नियम (२), (३) आणि (४) दाखल करण्यात आले.

14. Recovery of Advances.–(1) An advance shall be recovered from the subscriber in such number of equal monthly instalments as the sanctioning authority may direct, but such instalments shall not be less than 12 unless the subscriber so elects and not more than 24. In special cases where the amount of advance exceeds three month's pay of the subscriber under sub-rule (*2*) of rule 13 the sanctioning authority may fix such number of instalments not exceeding 36. A subscriber may, at his option, repay more than one instalment in a month. Each instalment shall be a number of whole rupees, the amount of advance being raised or reduced, if necessary to admit of the fixation of such instalments.

(2) The recovery of an advance shall be made in the manner provided in rule 11 for the recovery of subscriptions, and shall commence with the issue of pay for the month following the month in which the advance is drawn. The recovery shall not be made, except with the subscriber's consent while he is in receipt of subsistance grant or is on leave of ten days or more in any calendar month which either does not carry any leave salary or carries leave salary equal to or less than half-pay or half-average pay, as the case may be. The recovery may be postponed, on the subscriber's written request by the sanctioning authority during the recovery of an advance of pay granted to the subscriber.

(3) If an advance has been granted to a subscriber and drawn by him and the advance is subsequently disallowed before repayment is completed, the whole of the balance of the amount withdrawn shall forthwith be repaid by the subscriber to the fund, or in default be ordered by the Accounts Officer to be recovered by deduction from the emoluments of the subscriber in lump sum or in monthly instalments not exceeding 12 as may be directed by the authority, competent to sanction an advance for the grant of which special reasons are required under sub-rule (*2*) of 13 :

Provided that, before such advance is disallowed the subscriber shall be given an opportunity to explain to the sanctioning authority in writting and within 15 days of the receipt of communication by him, why the repayment shall not be enforced, and if an explanation is submitted by the subscriber within the said period, it shall be referred to the Government for decision ; and if no such explanation within the said period is submitted by him, the repayment of the advance shall be enforced in the manner prescribed in this sub-rule.

(4) recoveries made under this rule shall be credited as they are made to the subscriber's account in the fund.

15. Wrongful use of Advance.–Notwithstanding anything in these rules, if the sanctioning authority has reason to doubt that the money drawn as an advance from the fund under rule 13, has not been utilised for the purpose for which the sanction was given for the drawal of the money, he shall, after communicating to the subscriber the reasons for his doubt, call upon him to explain in writing and within fifteen days of receipt of such communication, whether the advance has been utilised by him for the purpose for which sanction was given to the drawal of money. If the sanctioning authority is not satisfied with the explanation, furnished by the subscriber, the authority shall direct the subscriber to repay the amount of advance to the fund forthwith or, in default, order the amount to be recovered by deduction in one lump sum or in monthly instalments not exceeding twelve from the emoluments of the subscriber even if he is on leave.

Note.–The term emolumnets in this rule does not include subsistance allowance.

१४. अग्रिमाची वसुली :

(१) वर्गणीदाराकडून अग्रिमाची वसुली, मंजुरी प्राधिकारी निदेश देईल तितक्या समान मासिक हप्त्यामध्ये करण्यात येईल, परंतु वर्गणीदारानेच तशी मागणी केलेली नसेल तर अशा हप्त्यांची संख्या बारापेक्षा कमी असणार नाही आणि चोवीस पेक्षा अधिक होणार नाहीत. नियम १३ पोट-नियम (२) खालील अग्रिमाची रक्कम, वर्गणीदाराच्या तीन महिन्यांच्या वेतनापेक्षा अधिक होईल अशा विशेष प्रकरणामध्ये मंजुरी प्राधिकारी अशा हप्त्यांची संख्या ३६ पेक्षा अधिक होणार नाही, अशा प्रकारे निश्चित करू शकेल. वर्गणीदारास आपल्या इच्छेनुसार, महिन्यातून एकापेक्षा अधिक हप्त्यांनी परतफेड करता येईल. प्रत्येक हप्ता संपूर्ण रुपयांत असेल असे हप्ते ठरवता यावे म्हणून प्रसंगी अग्रिमाची रक्कम कमी किंवा जास्त करून घेतली जाईल.

(२) अग्रिमाची वसुली नियम ११ मध्ये वर्गणीच्या वसुलीबाबत तरतूद केलेल्या पद्धतीनुसार केली जाईल आणि ही वसुली, अग्रिम ज्या महिन्यात काढण्यात आले त्यानंतरच्या महिन्याच्या वेतनापासून सुरू केली जाईल. वर्गणीदाराला जेव्हा निर्वाह अनुदान मिळत असेल किंवा तो कोणत्याही कॅलेंडर महिन्यात दहा दिवस किंवा त्याहून अधिक काळ रजेवर असेल आणि त्या कालावधीत रजा वेतन मिळणार नसेल किंवा हे रजा वेतन अर्धवेतनाच्या किंवा अर्धसरासरी वेतनाच्या बरोबर किंवा यथास्थिती त्यापेक्षा कमी असेल तर वर्गणीदाराच्या संमतीशिवाय अग्रिमाची वसुली केली जाणार नाही. अशी वसुली, वर्गणीदाराने लेखी विनंती केल्यास, त्याला देण्यात आलेल्या वेतन अग्रिमाच्या वसुलीच्या कालावधीत मंजुरी प्राधिकारी स्थगित करू शकेल.

(३) जर वर्गणीदाराला मंजूर करण्यात आलेले आणि त्याने प्रत्यक्ष घेतलेले अग्रिम, नंतर त्याची संपूर्ण परतफेड होण्यापूर्वी नामंजूर करण्यात आले असेल तर घेतलेल्या अग्रिमाची संपूर्ण रक्कम किंवा शिल्लक रक्कम वर्गणीदाराला निधीमध्ये तात्काळ भरावी लागेल किंवा, त्यात कसूर झाल्यास नियम १३ च्या पोट-नियम (२) अन्वये विशेष कारणासाठी देण्यात येणा-या अग्रिमास मंजुरी देणा-या सक्षम प्राधिका-याने निर्देशित केल्याप्रमाणे एकरकमी किंवा बारापेक्षा अधिक नाही अशा हप्त्यांमध्ये वर्गणीदाराला वित्तलब्धीमधून वजात करून वसूल करण्यात येईल :

परंतु असे अग्रिम नामंजूर करण्यापूर्वी वर्गणीदाराला तसे कळविण्यात आल्यापासून पंधरा दिवसांच्या आत परतफेडीची सक्तीने वसुली का करण्यात येवू नये या संबंधीचा लेखी खुलासा मंजुरी अधिका-याकडे सादर करण्याची त्यास संधी देण्यात येईल, आणि जर उक्त कालावधीमध्ये वर्गणीदाराकडून स्पष्टीकरण सादर करण्यात आले तर, ते निर्णयाकरिता शासनाकडे पाठविण्यात येईल आणि जर त्याच्याकडून उक्त कालावधीमध्ये असे स्पष्टीकरण सादर करण्यात आले नाही तर, अग्रिमाच्या परतफेडीची, या पोट-नियमामध्ये विहित केलेल्या रीतीने वसुली करण्यात येईल.

(४) या नियमाखाली करण्यात येणारी वसुली ती जसजशी करण्यात येईल त्याप्रमाणे वर्गणीदाराच्या निधीमधील लेख्यात जमा करण्यात येईल.

१५. अग्रिमाचा अयोग्य विनियोग :

या नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियम १३ अन्वये निधीमधून अग्रिम म्हणून काढलेली रक्कम, रक्कम काढण्याची मंजुरी ज्या प्रयोजनाकरिता देण्यात आली होती त्या प्रयोजनासाठी वापरली गेली नाही अशी जर मंजुरी अधिका-याला शंका आली, तर तो त्याला तशी शंका येण्याची कारणे वर्गणीदाराला कळवील व वर्गणीदाराला ती कळविण्यात आल्यापासून पंधरा दिवसाच्या आत, पैसे काढण्याची मंजुरी ज्या प्रयोजनासाठी देण्यात आली होती त्या प्रयोजनाकरिता वर्गणीदाराकडून अग्रिम वापरण्यात आले किंवा कसे याबाबत लेखी स्पष्टीकरणे करण्यास वर्गणीदारास फर्मावतील. जर वर्गणीदाराने केलेल्या स्पष्टीकरणाने मंजुरी प्राधिका-याचे समाधान झाले नाही तर, तो प्राधिकारी वर्गणीदारास अग्रिमाची रक्कम निधीत तात्काळ परत भरण्याचा निदेश देईल किंवा तसे न केल्यास वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून, जरी तो रजेवर असला तरी, एकाच ठोक रकमेत किंवा बारापेक्षा जास्त होणार नाहीत अशा मासिक हप्त्यांनी वजात करून ती रक्कम वसूल करण्याचा आदेश देईल.

टीप.—या नियमातील "वित्तलब्धी" या संज्ञेत निर्वाह भत्त्याचा समावेश होत नाही.

16. Withdrawals from the fund.–Subject to the conditions specified therein the withdrawals may be sanctioned by the authorities competant to sanction an advance for special reasons under sub-rule (*2*) of rule 13 at any time.–

(A) After the completion of twenty years of service (including broken period of service, if any) of a subscriber or within the ten years before the date of his retirement on superannuation, whichever is earlier, from the amount standing to his credit in the fund, for one or more of the following purpose, namely.–

(1) To meet the cost of higher education including where necessary, the travelling expenses of the subscriber and members of his family or any person actually dependent on him in the following cases, namely.–

(*a*) For education outside India for academic, technical, professional or vocational courses beyond the High School stage ; and

(*b*) For any medical, engineering, other technical or specialised courses in India beyond the High School stage or military training in any Sainik or Military School below the High School stage.

(2) To meet the expenditure in connection with the betrothal or marriage of the subscriber or his sons or his dauthters and any other female relation actually dependent on him.

(3) To meet the expenses in connection with the illness, including where necessary travelling expenses of the subscriber and members of his family or any person actually dependent on him.

(B) After completion of ten years of service (including broken periods of service, if any) of a subscriber or within ten years before the date of his retirement on superannuation whichever is earlier, from the amount standing to his credit in the fund for one or more of the following purposes.–

(*i*) building or acquiring a suitable house or ready built-up flat for his residence including the cost of site ;

(*ii*) repaying an outstanding amount on account of loan expressly taken for building or acquiring a suitable house or ready built-up flat for his residence ;

(*iii*) purchasing a house site for building a house thereon for his residence or repaying any outstanding amount of loan expressly taken for this purpose ;

(*iv*) reconstructing or making additions or alterations or up-keep of house or a flat already owned or acquired by a subscriber ;

(*v*) renovating, additions or alterations or up-keep of an ancestral house at a place other than the place of duty or to a house build-up with the assistance of loan from Government at a place other than the place of duty ;

(*vi*) construction a house on site purchased under clause (*iii*).

(C) Within one year before the date of a subscriber's retirement from the amount standing to his credit in the fund for the purpose of acquiring a farm land or business premises or both.

(D) Once during the course of financial year, on account equivalent to one year's subscription paid for by the subscriber towards the Group Insurance Scheme introduced by the State Government under Government Resolution, Finance Department No. DOI-2081-4701-ADM-5, dated 26th April 1982, for its employees on self financing and contributory basis.

(E) After completion of fifteen years of service of a subscriber or five years before the date of retirement on superannuation, whichever is earlier for the purpose of purchasing of a motor car or for repaying Government loan expressly taken for this purpose, subject to the conditions laid down in the note under rule 18.

१६. निधीमधून रक्कम काढणे.–नियम १३, पोट-नियम (२) अन्वये अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असणा-या प्राधिका-यांना विशेष कारणास्तव उक्त नियमात विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीना अधीन राहून पुढीलपैकी कोणत्याही वेळी रक्कम काढण्यास मंजुरी देता येईल.

(अ) एखाद्या वर्गणीदाराची वीस वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर (सेवेत खंड झालेला असल्यास खंडित सेवेचा समावेश करून) अथवा त्याचा नियत सेवावधी पूर्ण होवून तो सेवानिवृत्त होण्यापूर्वी दहा वर्षे, यापैकी जी घटना अगोदरची असेल त्यावेळी, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या निधीच्या रकमेतून पुढीलपैकी एका किंवा अनेक प्रयोजनार्थ, म्हणजेच–

(१) खालील बाबतीत, वर्गणीदार व त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली कोणतीही व्यक्ती यांच्या आवश्यक असेल तेथे प्रवास खर्चासह, उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी जसे–

(अ) माध्यमिक शाळेच्या टप्यानंतरचा शैक्षणिक, तांत्रिक, व्यावसायिक किंवा धंदाविषयक पाठ्यक्रम भारताबाहेर पूर्ण करण्याकरिता आणि

(ब) माध्यामिक शाळेच्या टप्यानंतरचा वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा इतर तांत्रिक किंवा विशेषीकृत पाठ्यक्रम, किंवा माध्यमिक शाळेच्या टप्प्याखालील सैनिकी किंवा लष्करी शाळेतील प्रशिक्षणे पूर्ण करण्याकरिता.

(२) वर्गणीदार अथवा त्याचे मुलगे किंवा मुली अथवा त्यांच्यावर प्रत्यक्षपणे अवलंबून असलेली त्याची स्त्री नातेवाईक यांच्या वाङःनिश्चय किंवा विवाह या संबंधातील खर्च भागविण्याकरिता.

(३) वर्गणीदार आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा प्रत्यक्षपणे त्याच्यावर अवलंबून असलेली अन्य व्यक्ती यांच्या संबंधातील आजारपणाचा आवश्यक असेल तर प्रवास खर्चासह खर्च भागविण्यासाठी.

(ब) वर्गणीदाराची सेवा १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर (सेवेत खंड पडला असल्यास खंडित सेवेचा समावेश करून) किंवा नियत वयोमान झाल्यामुळे तो ज्या तारखेस सेवानिवृत्त होईल, त्या तारखेपूर्वी १० वर्षाच्या कालावधीत यापैकी जी घटना अगोदरची असेल त्यावेळी निधीमध्ये त्याच्या खात्यामध्ये जमा असलेल्या रकमेतून पुढीलपैकी एका किंवा अनेक प्रयोजनार्थः–

(एक) त्याला राहण्यासाठी योग्य असे घर किंवा सदनिका बांधण्यासाठी किंवा घेण्यासाठी, तयार सदनिका घेण्यासाठी यात जागेच्या खर्चाचा समावेश आहे.

(दोन) त्याला राहण्यासाठी योग्य असे घर बांधण्यासाठी किंवा घेण्यासाठी किंवा तयार सदनिका घेण्यासाठी घेतलेले कर्ज असे जेथे स्पष्टपणे म्हटलेले असेल, अशा कर्जाच्या रकमेची परतफेड करण्यासाठी.

(तीन) त्याला राहण्यासाठी घर बांधण्याकरिता, जागा घेण्यासाठी किंवा या प्रयोजनार्थ घेतलेले कर्ज असे जेथे स्पष्टपणे म्हटलेले असेल, अशा कोणत्याही कर्जाची उर्वरित रक्कम फेडण्यासाठी.

(चार) पूर्वीपासूनच वर्गणीदाराच्या मालकीच्या असलेल्या किंवा त्याने घेतलेल्या घराची किंवा सदनिकेची पुनर्रचना करणे किंवा त्यात भर घालणे त्यामध्ये फेरफार करणे किंवा त्याची दुरुस्ती यांसाठी.

(पाच) कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र असलेल्या वडिलोपार्जित घराचे अथवा शासनाकडून कर्ज घेऊन कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र बांधलेल्या घराचे नवीकरण त्यात भर घालणे किंवा त्यात फेरफार करणे अथवा त्याची दुरूस्ती करणे यासाठी.

(सहा) उपखंड (तीन) अन्वये खरेदी केलेल्या जागेवर घर बांधण्यासाठी.

(क) वर्गणीदाराच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वीच्या एक वर्षाच्या कालावधीत त्याच्या नावे निधीमध्ये जमा झालेल्या रकमेतून शेतीसाठी जमीन किंवा व्यवसायाकरिता जागा खरेदी करण्यासाठी किंवा दोन्ही प्रयोजनार्थ.

(ड) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक डीओआय-२०८१/४७०१/ए.डी.एम.-५, दिनांक २६-४-१९८२ अन्वये राज्य शासनाद्वारे त्यांच्या कर्मचा-यांसाठी अंशदाय पद्धतीने आपली आपण वित्त व्यवस्था करण्याच्या स्वरूपात राबविण्यात येणा-या गट विमा योजनेत वर्गणीदाराने भरलेल्या वार्षिक वर्गणीच्या समतुल्य रक्कम वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकदा भरण्यासाठी.

(इ) वर्गणीदाराच्या सेवेची १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर किंवा नियत सेवावधीनंतर सेवानिवृत्त होण्याच्या पाच वर्षे आधी, यापैकी जी अगोदर असेल त्या तारखेस, नियम १८ खालील टिप्पणीत दिलेल्या शर्तीच्या अधीन, मोटार गाडी खरेदी करण्यासाठी किंवा स्पष्टपणे या प्रयोजनासाठी घेतलेल्या शासकीय कर्जाची परतफेड करण्यासाठी.

(F) After completion of fifteen years of service (including broken periods of service, if any) for making deposit for booking a car or for purchase of a motor-cycle or scooter or moped, etc., subject to the conditions laid down in the note under rule 18.

(G) After completion of twenty eight years of service (including broken periods of service, if any) or within three years before the date of retirement on superannuation whichever is earlier, for the purpose of extensive repairs or over-hauling a motor-car, subject to the conditions laid down in the note under rule 18.

[1](H) After completion of five years of service of a subscriber, for purchases of Personal Computer or Tablet Personal Computer, or Laptop with printer.

(I) After completion of ten years of service (including broken period of service, if any) of a subscriber or within the ten years before the date of his retirement on superannnuation, whichever is earlier, from the amount standing to his credit in the fund for meeting the expenses for pilgrimage of the subscriber or members of his family.

Note.–(1) A subscriber who has availed himself of an advance under " Low Income Group Housing Scheme " or advance under rule 134 of the Bombay Financial Rules, 1959 (as amended from time to time) granted for the purpose of building a house, or has been allowed any assistance in this regard from any other Government source, shall be eligible for the grant of final withdrawal under sub-clause (*i*) and (*iii*) for the purpose satisfying therein and also for the purposes of repayment of any loan taken under the aforesaid scheme, subject to the limit specified in the provision to sub-rule (*2*) of rule 20.

If a subscriber has an ancestral house or build-up house at a place other than the place of his duty with the assistance of loan taken from Government he shall be eligible for the grant of final withdrawal under sub-clause (*i*) and (*iii*) and (*iv*) of clause (*B*) for purchase of house site or for construction of another house or for acquiring a ready built-up flat at the place of his duty.

Note.–(2) Withdrawal under clause (*i*) and (*iv*), (*v*) or (*vi*) of clause (*B*) shall be sanctioned only after a subscriber has submitted a plan of house to be constructed or of the additions or alterations to be made, duly approved by the local Municipal Body, of the area where the site or house is situated and only in cases where the plan is actually got to be approved.

Note.–(3) Withdrawal under sub-clauses (*i*) and (*iv*) of clause (*B*) shall also be allowed where house site is in the name of wife or husband, provided she or he is the first nominee to receive provident fund money in the nomination made by the subscriber.

Note.–(4) Only one withdrawal shall be allowed for the same purpose under this rule. But marriage or education of different childern or illness of different cause or further additions or alterations to a house or a flat shall not be treated as the same purpose. Second or subsequent withdrawal under sub-clause (*i*) or (*vi*) of clause (*B*) shall be allowed upto the limit laid down under the rule.

[1]*Note.—(4A)* The amount of withdrawal is limited to Rs. 50,000 for purchase of Personal Computer or Tablet Personal Computer, or Laptop with printer or three-fourths of the amount standing to the credit of the subscriber in the General Provident Fund or, actual cost of the Personal Computer, or Tablet Personal Computer, or Laptop with printer, whichever is less. Only one withdrawal shall be allowed for this purpose under clause (*G*). Withdrawal under this clause shall not be allowed if a computer advance from the sanctioned grant of the Government is being sanctioned.

---

1. Clauses (H) and (I) were inserted by G. N. GAD, dated 19-12-2015, Rule 6(i).

(फ) वर्गणीदाराची सेवा १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर (मध्ये खंड झाला असल्यास खंडीत सेवेचा समावेश करून) नियम १८ खालील टिप्पणीत दिलेल्या शर्तीच्या अधीन राहून, मोटारगाडी नोंदविण्याकरिता रक्कम भरण्यासाठी किंवा मोटारसायकल किंवा स्कुटर किंवा मोपेड इ. खरेदी करण्यासाठी.

(ग) वर्गणीदाराची सेवा अठ्ठावीसवर्षे पूर्ण झाल्यानंतर (मध्ये खंड झाला असल्यास खंडीत सेवेचा समावेश करून) किंवा नियत सेवावधीनंतर सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी तीन वर्षाच्या दरम्यान, यापैकी जे अगोदर असेल तेव्हा नियम १८ खालील टिप्पणीमध्ये दिलेल्या शर्तीच्या अधीन राहून मोटरगाडीची मोठी दुरूस्ती किंवा संधारण (ओव्हर हॉलिंग) करण्याच्या प्रयोजनार्थ.

[१](ह) वर्गणीदाराच्या सेवेची पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर वैयक्तिक संगणक संच (पर्सनल कॉम्प्युटर) किंवा लॅपटॉप किंवा टॅबलेट संगणक प्रिंटर खरेदी करण्याकरिता.

(आय) वर्गणीदाराच्या सेवेची दहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर (मध्ये खंड झाला असल्यास, खंडीत सेवेचा कालावधी समाविष्ट करून) किंवा नियत सेवावधीनुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी दहा वर्षे, यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या निधीच्या रकमेतून वर्गणीदाराच्या किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या धार्मिक यात्रेचा खर्च भागविण्यासाठी.

टीप.–(१) ज्या वर्गणीदाराला "कमी उत्पन्न गट गृह निर्माण योजनेखाली" किंवा मुंबई वित्तीय नियम, १९५९ (वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे) याच्या नियम १३४ अन्वये घरबांधणीसाठी मंजूर केलेले अग्रिम मिळालेले असेल किंवा या बाबतीत त्याला अन्य कोणत्याही प्रकारे शासनाकडून कोणतेही सहाय्य देण्यात आले असेल तर तो वर्गणीदार नियम २० पोट-नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेस अधिन राहून खंड (एक) व (तिन) अन्वये, त्या खंडामध्ये विनिर्दिष्ट प्रयोजनार्थ, तसेच उपरोक्त योजनेखाली घेतलेल्या कोणत्याही कर्जाची परतफेड करण्याच्या प्रयोजनार्थ अंतिमरीत्या रक्कम काढण्यासाठी मंजुरी मिळण्यास पात्र असेल. वर्गणीदाराचे वडिलोपार्जित घर असेल किंवा त्याने शासनाकडून कर्ज घेऊन त्याच्या कामाच्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्यत्र एखादे घर बांधले असेल तर, खंड (ब) चे उपखंड (एक), (तीन) व (चार) अन्वये त्याच्या कामाच्या ठिकाणी घरासाठी जागा खरेदी करण्यासाठी किंवा दुसरे घर बांधणीकरिता अथवा त्याला राहण्यासाठी तयार सदनिका घेण्यासाठी अंतिमरीत्या रक्कम काढण्यासाठी मंजुरी मिळण्यास तो पात्र असेल.

टीप.–(२) वर्गणीदाराने, तो जर घर बांधणार असेल तर त्या घराचा किंवा तो जर आपले घर वाढवून घेणार असेल किंवा त्यात फेरफार करणार असेल तर त्यासंबंधीचा, घर किंवा त्या घराची जागा ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्राच्या स्थानिक नगरपालिकेने येथोचितरीत्या मान्य केलेला नकाशा सादर केल्यानंतर आणि तो नकाशा प्रत्यक्षपणे मान्य असला तरच खंड "ब" च्या उपखंड (एक) आणि (चार), (पाच) किंवा (सहा) अन्वये रक्कम काढण्यास मंजुरी देण्यात येईल.

टीप.–(३) घराची जागा किंवा घर पत्नीच्या अथवा पतीच्या नावे असेल तरीही खंड 'ब' च्या उपखंड (एक) आणि (चार) अन्वये निधीमधून रक्कम काढता येईल, परंतु वर्गणीदाराने केलेल्या नामनिर्देशनामध्ये ती किंवा तो निधीची रक्कम घेणारी पहिली नामनिर्देशीत व्यक्ती असणे आवश्यक आहे.

टीप.–(४) या नियमाखाली एका प्रयोजनासाठी फक्त एकदाच रक्कम घेता येईल. परंतु त्याच्या प्रत्येक मुलाचा विवाह किंवा त्या मुलाचे शिक्षण किंवा निरनिराळ्या वेळी उद्‌भवणारे आजार किंवा त्याचे घर अथवा सदनिका यात आणखी वाढ करणे अथवा त्यात फेरफार करणे या बाबी एकच प्रयोजन असल्याचे समजण्यात येणार नाही. खंड "ब", उपखंड (एक) किंवा (चार) अन्वये या नियमान्वये घालून दिलेल्या मर्यादेपर्यन्त दुस-यांदा किंवा त्यानंतर निधीमधून रक्कम काढता येईल.

[१]**टीप– (४ अ)** वैयक्तिक संगणक संच (पर्सनल कॉम्प्युटर) किंवा लॅपटॉप किंवा टॅबलेट संगणक प्रिंटरसह खरेदी करण्याकरिता कमाल रक्कम रुपये ५०,००० किंवा वर्गणीदाराच्या खाती जमा रकमेच्या तीन चतुर्थांश इतकी रक्कम किंवा वैयक्तिक संगणक संच (पर्सनल कॉम्प्युटर) किंवा लॅपटॉप किंवा टॅबलेट संगणक यांची प्रिंटर प्रत्यक्ष किंमत यांपैकी जी कमी असेल, त्या रकमेइतकी मर्यादित असेल. खंड (ग) अन्वये, या प्रयोजनार्थ संपूर्ण सेवा कालावधीच्या दरम्यान, केवळ एकदाच रक्कम काढण्याची परवानगी असेल. जर शासनाच्या मंजूर अनुदानातून संगणक अग्रिम मंजूर करून घेतले असेल तर त्या खंडांतर्गत रक्कम काढण्यास मुभा असणार नाही.

---

१. शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ६ (एक) अन्वये, खंड (ह) व खंड (आय) हे दाखल करण्यात आले.

Note.—(4B) A subscriber shall be permitted to withdraw the amount equal to actual cost of the expenses for pilgrimage or, one-half of the amount standing to the credit of the subscriber in the General Provident Fund or, six months pay, whichever is less. Only one withdrawal during entire service period shall be allowed for this purpose under clause (I).

Note.—(5) Withdrawal under this rule shall not be sanctioned if an advance under rule 13 is being sanctioned for the same purpose and at the same time.

[2]*Note.—(6)* In case of a subscriber who is an ex-serviceman, the service rendered by him in the armed forces before joining the Government shall be taken into account for counting of twenty years service for the same purpose under clause (A) of this rule.

17. Authority to sanction refundable advance.—(1) Whenever a subscriber is in a position to satisfy the Competent Authority about the amount standing to his credit in the General Provident Fund account with reference to the latest available statement of General Provident Fund Account together with the evidence of subsequent contribution, the Competent Authority may itself sanction a withdrawal within the prescribed limits as in the case of refundable advance. In doing so, the Competent Authority shall take into account any withdrawal or refundable advance already sanctioned by him in favour of subscriber ;

(2) Where, however, the subscriber is not in a position to satisfy the Competent Authority about the amount standing in his credit or where there is any doubt about the admissibility of the withdrawal applied for, a reference may be made to the Accounts Officer by the Competent Authority for ascertaing the amount standing to the credit of the subscriber with a view to enable the Competent Authority to determine the admissibility of the amount of withdrawal ;

(3) The sanction for the withdrawal should prominently indicate the General Provident Fund Account Number and Accounts Officer maintaining the accounts and a copy of the sanction should invariable be endorsed to that Accounts Officer ;

(4) Sanctioning Authority shall be responsible to ensure that an acknowledgement is obtained from the Accounts Officer that the sanction for withdrawal has been noted in the Ledger Account of the subscriber ;

(5) In case, the Accounts Officer reports that the withdrawal as sanctioned is in excess of the amount to the credit of the subscriber or otherwise inadmissible, the sum withdrawal by the subscriber shall forthwith be repaid in one lumpsum by the subscriber to the fund or in default of such repayment, which shall be ordered by the Sanctioning Authority to be recovered from his emoluments either in one lumpsum or in such number of monthly instalments as may be determined by Government.

18. Withdrawals may be in Instalments.—(1) The withdrawal shall be permissible.—

(a) in cases falling under clause *(A)* of rule 16 in suitable instalments to be specified by the subscriber, each one to be sanctioned separately after verifying that the earlier one was fully utilised for the purpose for which it was sanctioned ;

(b) In cases falling under sub-clause (*2*) of clause (*A*) of rule 16 not earlier than three months from the month in which the marriage actually is to take place ;

---

1. These notes (4A)and (4B) were inserted by G.N. GAD, dated 19-12-2015, Rule 6 (ii).
2. This notes (6) was inserted by G.N. GAD, dated 19-12-2015, Rule 6 (iii).

टीप.–(४ ब) वर्गणीदारास, धार्मिक यात्रेच्या प्रत्यक्ष खर्चाइतकी, किंवा सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेच्या निम्मी किंवा वर्गणीदाराचे सहा महिन्यांचे वेतन यांपैकी जी कमी असेल त्या रकमेइतकी, रक्कम काढण्याची मुभा असेल.

खंड (आय) अन्वये, या प्रयोजनार्थ संपूर्ण सेवा कालावधीच्या दरम्यान, केवळ एकदाच रक्कम काढण्याची परवानगी असेल.

टीप.—(५) नियम १३ अन्वये त्याच प्रयोजनार्थ त्याचवेळी अग्रिम मंजूर करण्यात येत असेल तर या नियमाखाली रक्कम काढण्यास मंजुरी देण्यात येणार नाही.

[२]**टीप— (६)** जो वर्गणीदार माजी सैनिक आहे, त्याच्या प्रकरणी, या नियमाच्या खंड (अ) खालील प्रयोजनासाठी वीस वर्षांची सेवा मोजताना, त्याने शासन सेवेत रुजू होण्यापूर्वी, सशस्त्र दलात केलेली सेवा विचारात घेतली जाईल.

१७. परतावायोग्य अग्रिम मंजूर करण्याचा प्राधिकार—

(१) एखादा वर्गणीदार सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी लेख्याच्या अद्ययावत उपलब्ध विवरणाच्या संदर्भात व त्याचप्रमाणे त्यानंतर निधीमध्ये केलेल्या अंशदानाच्या संदर्भात भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याच्या नावे जमा रकमेसंबंधी सक्षम प्राधिका-याची पुराव्यानिशी खात्री करवून देवू शकला तर, सक्षम प्राधिकारी परतावायोग्य अग्रिमाच्या प्रकरणी असल्याप्रमाणे विहित कालमर्यादेत रक्कम काढण्याची परवानगी देवू शकेल. असे करीत असतांना त्याने वर्गणीदारासाठी अगोदरच काही रक्कम काढण्यास मंजुरी दिली असेल किंवा परतावायोग्य अग्रिम मंजूर केले असेल तर तेही विचारात घेईल.

(२) तथापि, वर्गणीदार त्याच्या नावे जमा रकमेच्या संदर्भात सक्षम प्राधिका-याची खात्री करू शकत नसेल तर किंवा जेवढ्या रकमेकरता अर्ज केला असेल ती रक्कम अनुज्ञेय आहे किंवा नाही यासंबंधी कोणतीही शंका असेल तर, काढावयाची किती रक्कम अनुज्ञेय असेल हे ठरविणे सक्षम प्राधिका-यास शक्य व्हावे म्हणून वर्गणीदाराच्या नावे किती रक्कम जमा आहे हे माहिती करून घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी लेखा अधिका-याकडे पत्रव्यवहार करू शकेल.

(३) निधीमधून रक्कम काढण्यास मंजुरी देणा-या आदेशामध्ये सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी लेखा क्रमांक ठळकपणे नमूद करण्यात येईल आणि रक्कम काढण्यास मंजुरी देणा-या आदेशाची एक प्रत न चुकता त्या लेखा अधिका-यास पाठविण्यात येईल.

(४) खातेवहीत वर्गणीदाराच्या लेख्यामध्ये रक्कम काढण्यास मंजुरी देणा-या आदेशाची नोंद करण्यात आली आहे, यासंबंधीची पोच लेखा अधिका-याकडून मिळाल्याची खात्री करून घेण्याची जबाबदारी, मंजुरी प्राधिका-याची असेल.

(५) काढण्यास मंजुरी देण्यात आलेली रक्कम वर्गणीदाराच्या खात्यावर जमा रकमेपेक्षा अधिक आहे किंवा अन्यप्रकारे अग्राह्य आहे, असे लेखाधिकारी कळवील तर, वर्गणीदाराने घेतलेली असेल तेवढी रक्कम तो निधीमध्ये ताबडतोब एक रकमी भरेल आणि अशी रक्कम परत करण्यात त्याने कसूर केल्यास ती रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून एक रकमी अथवा शासनाकडून निश्चित करण्यात येतील अशा मासिक हप्त्यांनी वसूल करण्याबाबतचा आदेश मंजुरी प्राधिका-याकडून देण्यात येईल.

१८. रकमा हप्त्यांनी काढता येणे :

(१) रकमा काढणे पुढीलप्रमाणे अनुज्ञेय असेल.—

(अ) नियम १६ खंड (अ) खाली येणा-या प्रकरणांत, वर्गणीदाराने विनिर्दिष्ट केलेल्या सोयीस्कर हप्त्यांमध्ये दिली जाईल आणि आधीचा हप्ता, ज्या कारणासाठी घेण्यात आला त्याच कारणासाठी त्याचा पुरेपूर उपयोग केला आहे, याची खात्री करून घेतल्यानंतर पुढील हप्ता देण्यात येईल.

(ब) नियम १६ खंड अ, उपखंड (१) खाली येणा-या प्रकरणात, प्रत्यक्ष विवाह होणार असेल त्या महिन्याच्या तीन महिन्यांहून आधी रक्कम देण्यात येवू नये.

---

१. शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ६ (दोन) अन्वये, टीप (४-अ) व टीप (४-ब) समाविष्ट करण्यात आले.

२. शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ६ (तीन) अन्वये, टीप (६) जादा दाखल करण्यात आली.

(c) In cases failing under sub-clause (*iv*) and (*vi*) clause (*B*) of rule 16 in not less than two and more than four equal instalments, each one to be sanctioned separately after verifying the progress of construction work; provided that for purchasing a house including cost of site or for purchasing on ownership basis any flat which is ready for occupation at the time of withdrawal or for repaying any outstanding amount on account of loan expressly taken for any of the said purposes the amount of withdrawal shall be paid in one instalment at the request of subscriber.

(d) In cases falling under sub-clause (*iii*) of clause (*B*) of sub-rules (*3*) of rule 16 once in a year.

Note.—(1) Refundable advance drawn for the same purpose shall be deemed as a final withdrawal for the purpose of clause (*d*).

[1]*Note.—(2)* The subscriber shall be in the Group-A or Group-B services in case of purchase of a motor-car, and in any group of services in case of purchase of a motor-cycle and scooter.

Note.—(3) The amount of withdrawal is limited to Rs. 2,00,000 for purchase of motor-car and Rs. 50,000 for purchase of motor-cycle or scooter or half of the amount standing to the credit of the subscriber in the General Provident Fund or actual cost of the motor-car, or motor-cycle, or scooter, etc. wichever is less.

Note.—(4) Government may allow, in special cases, an advance refundable in not more than 36 instalments in case of Officers who may fall short of minimum service of fifteen years, by a period of not more than 6 month, for the purpose of clauses (*E*) and (*F*) of rule 16.

Note.—(5) An Officer who has been allowed an advance according to Note No. 4 above may be permitted to convert the outstanding balance of the advance into final withdrawal after completion of fifteen years of services.

Note.—(6) Withdrawal under clauses (*E*), (*F*) and (*G*) of rule 16, shall be allowed only on one occasion.

Note.—(7) The amount of withdrawal shall not exceed the amount required for bookinga motor-car/motor-cycle/scooter, etc., fixed by the manufacturer of the vehicle.

Note.—(8) The amount of withdrawal for the extensive repairs or overhauling of cars is limited to Rs. 5,000 or actual amount of repairing/over-hauling, whichever is less.

Note.—(9) The list of recognised Institutions/Courses of studies for which withdrawal is permissible is given in Appendix B.

Note.—(10) The construction of house for which withdrawal is taken shall be commenced within six months from the month in which withdrawal has been taken and shall be completed within a period of one year from the date of commencing the construction. In case of withdrawal for purchase of a ready built house and undisputed title to the house and land shall be secured within 6 months of the withdrawal.

Note.—(11) The purchase of house site under sub-clause (*vi*) of rule 16 shall be made within a period of 3 months of the withdrawal or the withdrawal of the first instalment as the case may be.

Note.—(12) The house or flat proposed to be purchased or constructed from the amount withdrawn as aforesaid shall be situated at the place of duty of the subscriber or at his intended place of residence after retirement.

Note.—(13) Withdrawal shall be permissible for building, acquisition or redemption of one house, only and in those cases only when Government servant does not already own a house at the place referred to in sub-rule (*4*) of rule 18.

---

1. These notes (2) and (3) were substituted for Notes (2) and (3) by G.N. GAD, dated 19-12-2015, Rule 7.

(क) नियम ६, खंड (ब), उपखंड (चार) व (सहा) खाली येणा-या प्रकरणांत दोनपेक्षा कमी नाही आणि चारपेक्षा जास्त नाही अशा समान हप्त्यांत रक्कम देण्यात येईल. प्रत्येक हप्ता बांधकामाची प्रगती पाहून स्वतंत्रपणे मंजूर केला जाईल :

परंतु, जागेची किंमत धरून एखाद्या घराच्या खरेदीसाठी किंवा रक्कम काढतेवेळी ताबा घेण्यास योग्य असलेल्या कोणत्याही फ्लॅटच्या मालकी तत्त्वावर खरेदीसाठी किंवा उक्त प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाच्या उर्वरित रकमेची परतफेड करण्यासाठी काढून घेण्यात येणारी रक्कम वर्गणीदाराच्या विनंतीवरून एका हप्त्यात दिली जाईल.

(ड) ती रक्कम नियम १६, पोट-नियम (३), खंड (ब) च्या उपखंड (तीन) खाली येणा-या प्रकरणात वर्षातून एकदा देण्यात येईल.

टीप.—(१) याच कारणासाठी घेतलेले परतावायोग्य अग्रिम खंड (ड) प्रयोजनार्थ, अंतिमतः काढून घेतले असल्याचे समजण्यात येईल.

[1]**टीप.—(२)** मोटार गाडी खरेदी करण्याच्या बाबतीत, वर्गणीदार हा गट-अ किंवा गट-ब सेवेतील असावा आणि मोटार सायकल आणि स्कूटर खरेदी करण्याच्या बाबतीत कोणत्याही गटाच्या सेवेतील वर्गणीदार पात्र राहील.

टीप.—(३) वर्गणीदाराकडून काढण्यात येणारी रक्कम ही मोटारगाडी खरेदीसाठी रुपये २,००,००० आणि मोटार-सायकल किंवा स्कूटर खरेदीसाठी रुपये ५०,००० किंवा सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेच्या निम्मी किंवा मोटार गाडी, मोटर-सायकल, किंवा स्कूटर यांची प्रत्यक्ष किंमत, यांपैकी जी कमी असेल त्या रकमेइतकी मर्यादित असेल.

टीप.—(४) नियम १६, खंड (इ) व (फ) च्या प्रयोजनार्थ, ज्या अधिका-याच्या सेवेची १५ वर्षे किमान सेवा पूर्ण होण्याकरिता ६ महिन्यांपेक्षा जास्त नसणारा कालावधी कमी पडत असेल त्या अधिका-यांच्या खास प्रकरणी शासन ३६ पेक्षा जास्त होणार नाही, अशा हप्त्यामध्ये परतावायोग्य असलेले अग्रिम घेण्यास मुभा देऊ शकेल.

टीप.—(५) टीप क्र. ४ नुसार ज्या अधिका-याला अग्रिम घेण्यास मुभा दिली असेल, त्याला पंधरा वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर अग्रिमाची अदत्त शिल्लक अंतिमतः काढून घ्यावयाच्या रकमेत रुपांतरित करण्यास अनुमती देण्यात येईल.

टीप.—(६) नियम १६, खंड (इ) व (फ) आणि (ग) अन्वये काढण्यात येणारी रक्कम फक्त एकाच प्रसंगासाठी काढता येईल.

टीप.—(७) काढण्यात येणारी रक्कम ही, मोटारगाडी/मोटारसायकल स्कूटर इ. च्या नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या, वाहनाच्या कारखानदाराने निश्चित केलेल्या रकमेपेक्षा जास्त नसेल.

टीप.—(८) मोटारगाडीची मोठी दुरूस्ती किंवा संधारण (ओव्हर हॉलिंग) यासाठी काढण्यात येणा-या रकमेची मर्यादा रु. ५,०००/- किंवा दुरूस्तीसाठी/संधारणासाठी लागणारी प्रत्यक्ष रक्कम, यापैकी जी कमी असेल, तेवढी असेल.

टीप.—(९) ज्या मान्यताप्राप्त संस्था/शैक्षणिक पाठ्यक्रम यासाठी रकमा काढणे अनुज्ञेय आहे, त्यांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये दिली आहे.

टीप.—(१०) ज्या घराच्या बांधकामासाठी रक्कम काढून घेण्यात येईल त्या घराच्या बांधकामास ती रक्कम काढण्याच्या महिन्यापासून सहा महिन्यांच्या आत सुरूवात करण्यात येईल आणि बांधकाम सुरू केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत ते पूर्ण करण्यात येईल. बांधून तयार घराच्या खरेदीबाबतच्या प्रकरणात, घर आणि जागेसंबंधी निर्विवाद मालकी, रक्कम काढल्यापासून सहा महिन्यांच्या आत मिळवण्यात येईल.

टीप.—(११) नियम १६, उपखंड (सहा) अन्वये घरासाठी जागेची खरेदी, संपूर्ण रक्कम किंवा यथास्थिती रकमेचा पहिला हप्ता घेतल्यानंतर तीन महिन्यांच्या आत करण्यात येईल.

टीप.—(१२) उपरोक्त प्रमाणे काढून घेण्यात आलेल्या रकमेतून खरेदी करण्यात येणारे किंवा बांधण्यात येणारे किंवा नियोजित निवासस्थान किंवा सदनिका वर्गणीदार जेथे कामाला असेल त्या ठिकाणी किंवा त्याच्या निवृत्तीनंतर तो जेथे स्थायिक होऊ इच्छितो अशा ठिकाणी असेल.

टीप.—(१३) रक्कम काढून घेण्याची अनुज्ञा फक्त घराच्या बांधणीसाठी संपादनासाठी किंवा विमोचनासाठी देण्यात येईल आणि ती सुध्दा, सरकारी कर्मचा-याचे नियम १८ च्या पोट-नियम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी अगोदरच घर नसेल केवळ अशाच प्रकरणात देण्यात येईल.

---

१. शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ७ अन्वये मूळ टीप (२) आणि टीप (३) ऐवजी टीप (२) आणि टीप (३) हे दाखल करण्यात आले.

19. Authorisation.—After sanctioning the withdrawal, the amount shall be drawn on an authorisation from the Accounts Officer in cases where application for final payment had been forwarded to the Accounts Officer under clause (*b*) of sub-rule (*4*) of Rule 28.

20. Conditions for withdrawal.—(1) Any sum withdrawn by a subscriber at any one time for one of more purposes specified in rule 16 from the amount standing to his credit in the fund shall not ordinarily exceed 1/2 of the amount of 6 months pay whichever is less. The sanctioning authority may, however, sanction the withdrawal of an amount in excess of this limit upto 3/4 of the balance at his credit in the fund having due regard to:—

(*a*) the objects for which the withdrawal is being made,

(*b*) the status of the subscriber, and

(*c*) the amount to his credit in the fund.

(2) In case the subscriber has availed the facility of advance under the Low Income Group Housing Scheme or an advance under rule 134 read with Rules, contained in appendix 26 of the Bombay Financial Rules 1959, advance under clause (B) of rule 16 shall not exceed the maximum limit prescribed under that scheme of those rules.

(3) A subscriber shall be permitted to make a withdrawal once in a year, under sub-clause (*f*) of clause (*A*) of rule 16.

(4) In cases where the subscriber has to pay any instalment for site of house or flat purchased or house or flat constructed through the city and Industrial Development Corporation or Maharashtra Housing and Area Development Authority or a Co-operative Housing Society, or a private reputed builder he shall be permitted to make withdrawal as and when he is called upon to make payment in any instalment subject to the monetary celling of the advance sanctioned.

21. Utillization of the money by the subscriber :–(1) A subscriber who has been permitted to withdraw the money from the fund under rule 16 shall satisfy the sanctioning authority within a reasonable period as may be specified by that authority that the money has been utilised for the purpose for which it was withdrawn, and if he fails to do so, the work of the sum so withdrawn or so much thereof as has not been applied for the purpose for which it was withdrawn shall forthwith be repaid in one lumpsum by the subscriber to the fund and in default of such payment, it shall be ordered by the sanctioning authority to be recovered from his emoluments either in a lumpsum or in such number of monthly instalments as may be determined by the sanctioning authority :

Provided that before repayment of a withdrawal is enforced under this rule, the subscriber shall be given an apportunity to explain in writing and within 15 days of the receipt of the communication why the repayment should not be enforced, and if the sanctioning authority is not satisfied with the explanation, or no explanation is submitted by the subscriber within the said period of fifteen days, the sanctioning authority shall enforce the repayment in the manner prescribed in this sub-rule.

(2) A subscriber who has been permitted under sub-clauses (*iv*), (*v*) and (*vi*) of clause (*B*) of rule 16 to withdraw the money from the amount standing to his credit in the fund shall not part with the possession of the house built-up or acquired or house site purchased with the money so withdrawn whether by way of sale, mortgage, (others than mortgaged to Governor), gift, exchange or otherwise, without the previous permission of the sanctioning authority.

१९. प्राधिकार पत्र.— रक्कम काढण्यास मंजुरी देण्यात आल्यानंतर, नियम २८ पोट-नियम (४) खंड (ब) अन्वये लेखा अधिका-याकडे अंतिम प्रदानासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत लेखा अधिका-याच्या प्राधिकार पत्रावर रक्कम काढण्यात येईल.

२०. रक्कम काढून घेण्यासाठी शर्ती :

(१) नियम १६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एका किंवा अधिक प्रयोजनासाठी कोणत्याही एका वेळी, वर्गणीदाराच्या खात्यात असलेल्या जमा निधीच्या अर्धी रक्कम किंवा सहा महिन्याचे वेतन, यापैकी जी कमी असेल त्या रकमेपेक्षा अधिक रक्कम सर्वसाधारणपणे काढता येणार नाही. तथापि मंजुरी देणारा प्राधिकारी, खालील बाबी विचारात घेऊन त्याहून अधिक परंतु वर्गणीदाराच्या खाती जमा निधीच्या तीन चतुर्थांश एवढ्या मर्यादेपर्यन्त रक्कम काढून घेण्यास मंजुरी देवू शकेल.

(अ) कोणत्या कारणांसाठी रक्कम काढण्यात येत आहे,

(ब) वर्गणीदाराचा दर्जा आणि,

(क) निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली रक्कम.

(२) वर्गणीदाराने अल्प उत्पन्न गटासाठी असलेल्या गृहनिर्माण योजनेखाली अग्रिम सुविधा घेतली असेल अशा प्रकरणात किंवा मुंबई वित्तीय नियम, १९५९ च्या नियम १३४ आणि परिशिष्ट २६ मध्ये अंतर्भूत नियम या अन्वये घ्यावयाच्या अग्रिम, नियम १६ च्या खंड ब अन्वये घ्यावयाचे अग्रिम, त्या योजनेअन्वये किंवा त्या नियमान्वये विहित कमाल मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.

(३) नियम १६, खंड (अ) उपखंड (एक) अन्वये वर्गणीदारास वर्षातून एकदा निधीमधून रक्कम काढता येईल.

(४) एखाद्या वर्गणीदारास एखादी जागा, किंवा घर किंवा सदनिका खरेदी करण्यासाठी किंवा सिडकोमार्फत किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत अथवा एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत किंवा प्रसिध्द अशा खाजगी ठेकेदारामार्फत बांधण्यात आलेल्या घराकरिता अथवा सदनिकेकरिता कोणताही हप्ता भरावयाचा असेल अशा प्रकरणांत, त्याला जेंव्हा जेंव्हा हप्ते भरण्यास सांगण्यात येईल त्या त्या वेळी, मंजूर रकमेच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, रक्कम काढण्याची परवानगी देण्यात येईल.

२१. वर्गणीदाराकडून होणारा पैशाचा विनियोग :

(१) नियम १६ अन्वये निधीमधून रक्कम काढून घेण्याची अनुज्ञा देण्यात आली आहे असा वर्गणीदार, याबाबत प्राधिकारी विनिर्दिष्ट करील अशा वाजवी मुदतीत, ज्या कारणासाठी ही रक्कम काढून घेण्यात आली त्यासाठीच ती वापरण्यात आली याबाबत मंजुरी अधिका-यांची खात्री पटवून देईल आणि त्याने जर असे करण्यात कसूर केली तर अशा रीतीने काढून घेतलेली संपूर्ण रक्कम किंवा ज्या प्रयोजनाकरिता ही रक्कम काढून घेण्यात आली होती, त्यासाठी उपयोगात न आणलेला अशा रकमेचा भाग, वर्गणीदाराला ताबडतोब एकाच ठोक रकमेत निधीमध्ये परत करण्यात येईल आणि अशा प्रदानाबाबत त्याने कसूर केली तर, मंजुरी देणारा प्राधिकारी ही रक्कम एक रकमी किंवा तो निश्चित करील अशा मासिक हप्त्यांमध्ये वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून वसूल करण्याचा आदेश देईल :

परंतु या नियमान्वये काढून घेतलेल्या रकमेच्या परतफेडीची सक्तीने वसुली करण्यापूर्वी वर्गणीदाराला कळविण्यात आल्यापासून पंधरा दिवसाच्या आत, त्या रकमेची परतफेड करण्यास त्यास का भाग पाडण्यात येवू नये याबद्दल लेखी स्पष्टीकरण करण्याची त्यास संधी देण्यात येईल. आणि मंजुरी प्राधिका-यांचे ह्या स्पष्टीकरणाने समाधान झाले नाही तर, किंवा वर्गणीदाराकडून पंधरा दिवसाच्या उक्त मुदतीत कोणतेही स्पष्टीकरण सादर करण्यात आले नाही तर मंजुरी अधिकारी या पोटनियमामध्ये विहित रीतीने परतफेड करण्यास त्याला भाग पाडेल.

(२) नियम १६, खंड ब, उपखंड (चार), (पाच) आणि (सहा) अन्वये ज्याला त्याच्या नावे निधीमध्ये जमा झालेल्या रकमेतून रक्कम काढण्याची परवानगी देण्यात आलेली असेल असा वर्गणीदार, त्याच्या ताब्यात असलेले त्याने बांधलेले अथवा घेतलेले घर किंवा त्या पैशांनी खरेदी केलेली घराची जागा यांचा ताबा विक्रीद्वारे, गहाण ठेवून, (राज्यपालांकडे गहाण ठेवण्यात येईल त्याव्यतिरिक्त) देणगी देऊन, अदला बदल करून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, मंजुरी प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगी खेरीज सोडणार नाही.

22. Previous permission when not necessary :–(1) Permission under sub-rule (*2*) of rule 21 of the sanctioning authority shall not be necessary (*a*) if the house of house site is being leased for any term not exceeding three years, or (b) if the mortgage is in favour of Housing Board, a Board established under the Maharashtra Housing and Area Development Act, 1976, the Life Insurance Corporation of India, Nationalised Banks, Housing Finance Companies or any other Corporation owned or controlled by the Central Government or the State Government which advances loans for the construction of new house or for making additions of alterations to the existing house.

(2) The subscriber shall submit a declaration not later than 31st day of December of every year as to whether the house or the house site, as the case may be continued to be in his possession or has been mortgaged otherwise transferred, or let out as aforesaid and shall, if so required, produce before the sanctioning authority on or before the date specified by that authority in that behalf, the original sale, mortgage or lease-deed and also the documents on which his title to the property is based.

(3) If at any time, before his retirement, the subscriber parts with the possession of the house or house site without obtaining the previous permission of sanctioning authority be shall forthwith repay the sum so withdrawn by him in lumpsum to the fund and in default of such payment the sanctioning authority shall, after giving in the subscriber a reasonable opportunity of making a representation in the matter, cause the said sum to be recovered from the emoluments of the subscriber either in lumpsum of in such number of instalments as may be determined by it.

(4) A subcriber may not be sanctioned an advance or final withdrawal for the same purpose together.

(5) When the final withdrawal is sanctioned from the Provident Fund for the purpose specified in clauses (*iv*), (*v*) and (*vi*) of sub-rule (B) of rule 16, the sanctioning authority must indicate in the sanction order.–

(*a*) The pay of the subscriber at the time of sanctioning the final withdrawal,

(*b*) Particulars and amount of advance drawn by him for house building purpose under House Building Advance Rules of the State Government,

(*c*) the amount of any other assistance in this regard received by him from any other Government source.

23. Withdrawal prior to Retirement :–A subscriber shall be permitted to withdraw the amount not exceeding 90 per cent of the amount standing to his credit in the fund, within 12 months before the date of subscriber's retirement on superannuation without mentioning any purpose.

24. Conversion of an advance into a Final withdrawal :–(1) A subscriber who has already drawn an advance under Rule 13 for any purposes specified in rule 16 may convert, at his discretion by a written request addressed to the Accounts Officer through the sanctioning authority, balance outstanding against it into a final withdrawal.

(2) The sanctioning authority shall consider the request of a subscriber for conversion of an advance into final withdrawal after satisfying the conditions laid down in rule 16.

Note 1.–The sanctioning authority may ask the Drawing and Disbursing Authority to stop recoveries from the pay bill when the application for such conversion is accepted and forwarded to the Account Officer.

25. Final withdrawal of Accoumulation in the Fund :–(1) When a subscriber quits from the service, the amount standing to his credit in the fund should become payable to him :

२२. पूर्वपरवानगी केव्हा आवश्यक नाही :

(१) नियम २१, पोट-नियम (२) अन्वये मंजुरी प्राधिका-यांच्या परवानगीची पुढील प्रकरणी आवश्यकता राहणार नाही.

(अ) तीन वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता घर किंवा घराची जागा भाडेपट्ट्याने देण्यात येईल तर, किंवा

(ब) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ अन्वये स्थापन केलेले मंडळ असणारे गृहनिर्माण मंडळ, नवीन घराच्या बांधकामासाठी किंवा विद्यमान घरात भर घालणारी अथवा फेरफार करणारी बांधकामे करण्यासाठी कर्ज देणारे, केंद्र किंवा राज्य सरकारच्या मालकीचे अथवा त्यांच्याकडून नियमित आयुर्विमा महामंडळ, राष्ट्रीयकृत बँका, गृहनिर्माण वित्त कंपन्या किंवा इतर कोणतेही महामंडळ यांच्याकडे, घर अथवा घराची जागा गहाण ठेवण्यात आलेली असेल तर, त्याकरिता.

(२) वर्गणीदार, घर अथवा प्रकरणपरत्वे घराची जागा त्याच्या ताब्यात अजूनही आहे की नाही अथवा ते घर अथवा जागा उपरोक्तप्रमाणे गहाण ठेवण्यात आली आहे अथवा हस्तांतरीत करण्यात आली आहे किंवा भाड्याने देण्यात आली आहे किंवा कसे, यांसंबंधीचे प्रतिज्ञापन प्रत्येक वर्षी, ३१ डिसेंबर पेक्षा उशिरा नसेल अशा वेळी सादर करील आणि त्याबाबतीत तो प्राधिकारी विनिर्दिष्ट करील अशा तारखेस किंवा त्यापूर्वी, त्या मालमत्तेवरील त्याचा हक्क ज्यावर आधारित असेल असे मूळ विक्रीचे कागदपत्र, गहाणखत किंवा भाडेपट्ट्यासंबंधीचे कागदपत्र सादर करण्यास त्या प्राधिका-याने सांगितले तर वर्गणीदार ते सादर करील.

(३) वर्गणीदाराने त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी कोणत्याही वेळी मंजुरी प्राधिका-यांची पूर्वपरवानगी न घेता घराचा किंवा घराच्या जागेचा कब्जा सोडला तर, त्याने अशा प्रकारे काढलेली रक्कम तो ताबडतोब निधीमध्ये एकरकमी भरील आणि अशी रक्कम भरण्यात त्याने कसूर केली तर मंजुरी प्राधिकारी त्या बाबीसंबंधी त्याला अभिवेदन करण्याची वाजवी संधी देऊन उक्त रक्कम वर्गणीदाच्या वित्तलब्धीमधून एकरकमी अथवा मंजुरी प्राधिकारी निर्धारीत करील इतक्या मासिक हप्त्यांत वसूल करील.

(४) वर्गणीदाराला, एकाच प्रयोजनाकरिता, अग्रिम किंवा अंतिमरित्या पैसे काढणे एकाच वेळी मंजूर करण्यात येणार नाही.

(५) नियम १६, पोट-नियम (ब), खंड (चार), (पाच) आणि (सहा) मध्ये विनिर्दिष्ट प्रयोजनाकरिता, भविष्य निर्वाह निधीतून अंतिमरित्या पैसे काढण्यास मंजुरी दिली असेल तेव्हा, मंजुरी प्राधिकारी मंजुरी आदेशामध्ये पुढील गोष्टी दर्शविल :—

(अ) अंतिमरित्या पैसे काढण्यास मंजुरी प्रदान करण्याच्या वेळी वर्गणीदाराचे वेतन,

(ब) राज्य शासनाच्या घर बांधणी अग्रिम नियमान्वये घर बांधण्याकरिता त्याने घेतलेल्या अग्रिमाचा तपशील व अग्रिमाची रक्कम,

(क) कोणत्याही अन्य शासकीय मार्गाने यांसंबंधात त्याने प्राप्त केलेले इतर सहाय्य.

२३. निवृत्तीपूर्वी रक्कम काढणे.— वर्गणीदाराला, निधीमध्ये त्याच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेच्या ९० % पेक्षा अधिक असणार नाही एवढी रक्कम, वर्गणीदाराच्या नियत सेवानिवृत्तीच्या तारेखपूर्वी १२ महिन्यामध्ये, कोणतेही कारण नमूद न करता काढण्यास परवानगी देण्यात येईल.

२४. अग्रिमाचे अंतिमरित्या काढून घ्यावयाच्या रकमेत रुपांतर.— (१) नियम १६ मध्ये विनिर्दिष्ट प्रयोजनाकरिता, नियम १३ अन्वये ज्याने यापूर्वीच अग्रिम रक्कम घेतली आहे त्या वर्गणीदारास त्यांची इच्छा असल्यास, मंजुरी अधिका-यामार्फत लेखा अधिका-याला लेखी विनंती करून शिल्लक अग्रिम रकमेचे अंतिमरित्या काढावयाच्या रकमेत रुपांतर करता येईल.

(२) नियम १६ मध्ये दिलेल्या शर्ती पूर्ण केल्याची खात्री झाल्यानंतर अग्रिमाचे अंतिमरित्या काढून घ्यावयाच्या रकमेत रुपांतर करण्याची वर्गणीदाराची विनंती मंजुरी प्राधिकारी, विचारात घेईल.

टीप.– असे रुपांतर करण्यासाठी अर्ज स्वीकारला आणि तो लेखा अधिका-यांकडे पाठवला की मंजुरी प्राधिकारी, आहरण व संवितरण अधिका-याला, वेतन बिलातून करण्यात येणारी वसुली बंद करण्यास सांगतील.

२५. निधीतील जमा अंतिमरित्या काढून घेणे.— (१) जेव्हा वर्गणीदार नोकरी सोडून जाईल तेव्हा त्याच्या खाती निधीमध्ये जमा असलेली रक्कम त्याला देय होईल :

Provided that a subscriber who has been dismissed from the service and is subsequently reinstated in the service shall, if required to do so by Government repay any amount paid to him from the fund in pursuance of this rule, with interest thereon at the rates provided in rule 12 in the manner provided in rule 26. The amount so repaid shall be credited to his account in the fund.

Explanation I.—A Subscriber, other than the one who is appointed on contract or who has retired from service and is subsequently re-employed, with or without break in service shall not be deemed to quit service, when he is transferred under another State Government or Central Government in another Department of the State Government (in which he is governed by another set of provident fund Rules) and without retaining any connection with his former post. In such a case, his subscription with interest thereon shall be transferred.—

(*a*) to his account in other Provident Fund in accordance with the rules of that Provident Fund, if the new post is in another Department of the State Government, or

(*b*) to a new account under the other State Government or the Central Government, if the new post is in another State Government or Central Government consents by general or special order, to such transfer of subscriptions and interest.

Explanation II.—A subscriber holding a temporary post may either withdraw the amount on the termination of his appointment or leave it in the fund to be withdrawn at the time he finally quits the service.

Explanation III.—Transfer shall include cases of resignation of service in order to take up appointment in another Department of the State Government or under the Central Government without any break and with proper permission of the proper authority. In cases where there has been a break in service it shall be limited to the joining time allowed on transfer to different stations. The same shall hold good in cases of retrenchment followed by immediate employment whether under same or different Department of the State Government.

(2) When a subscriber, other than one who is appointed on contract or one who has retired from service and is subsequently re-employed, is transferred without any break, to the service under a body corporate owned or controlled by Government or an autonomous organisation registered under the Societies Registration Act, 1860, the amount of subscription together with an interest thereon shall not be paid to him but shall be transferred with the consent of the body to his new Provident Fund Account under that body. Transfer shall include cases of resignation from service in order to take up appointment under a body, corporate owned or controlled by Government or an autonomous organisation registered under the Societies Registration Act, 1860, without any break and with the proper permission of the Competent Authority. The time taken to join the new post shall not be treated as a break in service, for these rules, if it does not exceed the joining time admissible to Government servant on transfer, from one post to another :

Provided that the amount of subscription together with interest thereon of subscriber opting for service under a public enterprise may, if he so desires, be transferred to his new Provident Fund Account under the Enterprise if the concerned enterprise also agrees to such a transfer.

If, however, a subscriber does not desire the transfer of the concerned entreprise does not operate a Provident Fund, the amount aforesaid shall be refunded to a subscriber.

Note 1.—Recovery of Government dues and final payment of General Provident Fund should not be mixed up.

Note 2.—Immunity provided by sub-section (*1*) of section 3 of Provident Fund Act, 1925, against deduction from accumulations in a Provident Fund is not applicable to liabilities incurred by nominees.

Note 3.—Amount misappropriated by a Government servant should not be adjusted from his General Provident Fund money.

परंतु, सेवेतून बडतर्फ करण्यात आलेल्या वर्गणीदाराला पुन्हा सेवेत घेण्यात आले तर, शासनाने तसे करायला फर्मावल्यास वर्गणीदाराला या नियमाच्या तरतुदीनुसार निधीमधून देण्यात आलेली रक्कम, तो नियम २६ मध्ये नमूद केलेल्या दराने त्यावरील व्याजासहित परत करेल. अशी परत करण्यात आलेली रक्कम निधीमध्ये त्याच्या खात्यात जमा करण्यात येईल.

स्पष्टीकरण एक.— करारावर नियुक्त करण्यात आलेला किंवा सेवेतून मुक्त होऊन नंतर सेवेत खंड धरुन किंवा न धरता पुन्हा नियुक्त करण्यात आलेला वर्गणीदार खेरीज करून इतर वर्गणीदार जेव्हा आधीच्या पदाशी काहीही संबंध न ठेवता इतर राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या दुस-या विभागातील नवीन पदावर (जे पद भविष्य निर्वाह निधीच्या वेगळ्या नियमांव्दारे नियंत्रित केले जाते) त्याची बदली करण्यात आली तर तो सेवा सोडून गेला असे मानण्यात येणार नाही. अशा प्रकरणात त्यांची वर्गणी त्यावरील व्याजासह पुढीलप्रमाणे हस्तांतरीत करण्यात येईल.—

(अ) जर नवीन पद राज्य शासनाच्या अन्य विभागात असेल तर, तेथील भविष्य निर्वाह निधीच्या नियमांनुसार त्या निधीतील त्या त्या खात्यावर, किंवा

(ब) जर नवीन पद दुस-या राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या अधिकारात असेल तर संबंधित राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या अधिकारातील नवीन खात्यात असे राज्य शासन किंवा केंद्र शासन सर्वसामान्य किंवा विशेष आदेशाव्दारे संमती देईल त्याप्रमाणे.

स्पष्टीकरण दोन.— तात्पुरते पद धारण करणा-या वर्गणीदारास त्यांच्या सेवासमाप्तीनंतर निधीतील त्याच्या खाती असलेली रक्कम एकतर काढून घेता येईल किंवा तो अंतिमरित्या नोकरी सोडून जाईपर्यंत आपल्या खात्यात ठेवता येईल.

स्पष्टीकरण तीन.— बदली या संज्ञेत, राज्य शासनाच्या इतर विभागात किंवा केंद्र शासनाकडे नियुक्ती स्वीकारण्याकरिता, सेवेत कोणताही खंड न पडता आणि यथोचितरित्या अधिका-यांच्या पूर्वपरवानगीने दिलेल्या राजीनामाच्या प्रकरणाचाही समावेश केला जाईल. सेवेत खंड असणा-या प्रकरणांत, असा खंड दुस-या गावी बदली झाल्यावर मिळणा-या पदग्रहण अवधी इतकाच मर्यादित असला पाहिजे. नोकर कपातीच्या प्रकरणात सुध्दा जर त्यापाठोपाठ त्याच किंवा इतर राज्य शासनाखाली तात्काळ नोकरी मिळाली असेल तर हाच नियम लागू होईल.

(२) करारावर नियुक्त केलेल्या किंवा निवृत्त झाल्यानंतर पुन्हा कामावर घेतलेल्या वर्गणीदाराखेरीज इतर वर्गणीदार जेव्हा सेवेत खंड न पाडता शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या महामंडळामध्ये किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदणी केलेल्या स्वायत्त संघटनामध्ये नोकरीकरिता सेवेत खंड न पडता वर्गणीदाराची बदली होईल तेव्हा वर्गणीची रक्कम व तिच्यावरील व्याज त्याला देण्यात येणार नाही, ते त्या संस्थेच्या संमतीने त्या संस्थेच्या नियंत्रणाखालील नवीन भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात हस्तांतरित केले जाईल. " बदली " या संज्ञेत शासनाची संस्था किंवा शासनाच्या मालकीची अथवा शासन नियंत्रित कंपनी किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदलेली स्वायत्त संघटना यांच्याकडील नियुक्ती, कोणताही खंड पडू न देता आणि सक्षम प्राधिका-यांच्या रीतसर परवानगीने ते स्वीकारण्यासाठी सेवेचा राजीनामा देण्याची प्रकरणे समाविष्ट होतील. एका पदावरुन दुस-या पदांवर स्थानांतरण स्वीकारताना लागणारा कालावधी हा शासकीय कर्मचा-यांना एक पद सोडून दुसरे पद स्वीकारताना लागणा-या पदग्रहण अवधीपेक्षा अधिक नसेल तर तो सेवेतील खंड असल्याचे मानले जाणार नाही :

परंतु एखाद्या सार्वजनिक उपक्रमाची सेवा स्वीकारण्याची निवड वर्गणीदाराने आपल्या विकल्पानुसार केली असेल तर वर्गणीची व्याजासह असलेली रक्कम त्या उपक्रमातील त्याच्या नवीन भविष्य निर्वाह निधी लेख्यामध्ये बदली करण्याची त्यांची इच्छा असेल आणि त्या संबंधित उपक्रमानेही अशा बदलास संमती दिली तर, त्या नवीन भविष्य निर्वाह निधी लेख्यामध्ये ती बदली करण्यात येईल. तथापि वर्गणीदाराची अशा प्रकारच्या हस्तांतरणाची इच्छा नसेल किंवा संबंधित उपक्रमामध्ये भविष्य निर्वाह निधी कार्यान्वित नसेल तर, उपरोक्त रक्कम वर्गणीदारास परत करण्यात येईल.

टीप.–(१) शासनाला देय रकमांची वसुली आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान यांची सरमिसळ करू नये.

टीप.–(२) भविष्य निर्वाह निधीच्या जमा रकमातून वजा करण्याबाबत भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ च्या कलम ३, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेली सूट नामनिर्देशित व्यक्तीने ओढवून घेतलेल्या दायित्वाच्या संबंधात लागू होणार नाही.

टीप.–(३) शासकीय कर्मचा-याने अफरातफर केलेली रक्कम त्यांच्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतून वळती करण्यात येऊ नये.

Note 4.—Transfers should be held to include cases of resignations from service in order to take up appointment under the Central Government or another State Government or in another Department of the State Government (in which the subscriber is governed by another set of Provident Fund Rules) without any break and with proper permission of the State Government. In cases where there has been nominal break, it should strictly be limited to the joining time allowed on transfer to a different station. The same shall held good in cases of retrenchment followed by immediae re-employment whether under the same Government or different Government.

26. Retirement of a subscriber.—When a subscriber—

(*a*) has proceeded on leave preparatory to retirement or he is employed in a Vacation Department, on leave preparatory to retirement combined with vacation, or

(*b*) While on leave, has been permitted to retire or has been declared by a competent Medical Authority to be unfit for further service, the amount standing to his credit in the Fund shall upon application made by him in that behalf to the Accounts Officer, become payable to the subscriber.

Provided that the subscriber, if he returns to duty, shall, except where Government decides otherwise, repay to the fund for credit to his account, the amount paid to him from the fund in pursuance of this rule with interest thereon at the rate provided in rule 12 in cash or securities or partly in cash and partly in securities by instalment or otherwise by recovery from his emoluments or otherwise, as may be directed by the authority competent to sanction an advance for the grant of which, special reasons are required under sub-rule (*2*) of rule 13.

Note 1.—Producation of No Demand Certificate is not necessary for making final payment of the Provident Fund balance, except in following cases :—

(1) The Provident Fund balance vests in a dependents who are liable to attachment for debts incurred by the dependents after the subscriber's death and where such debts are due to the Government by whom the balance are payable, they could be set off against the balances under the general law relating to the setting off claims and counter-claims between the two parties.

(2) Person who become entitled to the Provident Fund money but are not dependents.

(3) Dependents other than widow or children of a subscriber, where the payment of Provident Fund money is subject to any assignment or charge made prior to the commencement of the Provident Fund Act, 1925.

27. Procedure on Death of a subscriber :—On the death of a subscriber before the amount standing to his credit has become payable, or where the amount has become payable, before payment has been made ;

When the subscriber leaves a family—

(*i*) If a nomination made by the subscriber in accordance with the provisions of Rule 5 in favour of member or members of his family subsist, the amount standing to his credit in the fund or the part thereof to which the nomination relates, shall become payable to his nominee or nominees in the proportion specified in the nomination ;

(*ii*) if no such nomination is in favour of member or members of the family, of the subscriber subsists, or if such nomination relates only to a part of the amount standing to his credit in the Fund, the whole amount or part thereof to which the nomination does not relate as the case may be, shall, notwithstanding that any nomination purporting to be in favour of any person or persons other than a member or members of his family, become payable to the members of his family in equal shares :

Provided that no share shall be payable to.—

(1) sons who have attained majority ;

(2) son of deceased sons who have attained majority ;

(3) married daughters whose husbands are alive ;

(4) married daughters of deceased son whose husbands are alive ;

टीप.–(४) बदली या संज्ञेत, राज्य शासनाच्या रीतसर परवानगीने केंद्र सरकार किंवा इतर राज्य शासनाच्या सेवेत किंवा त्याच राज्य शासनाच्या इतर विभागात (जेथे वर्गणीदारास भविष्य निर्वाह निधीचे इतर नियम लागू असतील) असणारी नियुक्ती सेवेत खंड न पडता स्वीकारण्यासाठी, दिलेल्या राजीनाम्याच्या प्रकरणांचाही समावेश होतो, असे मानले जावे. सेवेत नाममात्र खंड असणा-या प्रकरणांत असा खंड दुस-या गावी बदली झाल्यावर मिळणा-या पदग्रहण अवधीइतकाच काटेकोरपणे मर्यादित असला पाहिजे. नोकर कपातीच्या प्रकरणात सुध्दा, पाठोपाठ तात्काळ पुन्हा नोकरी मिळाली असेल तर हाच नियम लागू होईल, मग ती नोकरी त्याच शासनाची असो किंवा वेगळ्या शासनाची असो.

२६. वर्गणीदाराची सेवानिवृत्ती.— जेव्हा वर्गणीदार (अ) निवृत्तीपूर्व रजेवर गेला असेल किंवा दिर्घ कालावधीची सुट्टी मिळणा-या विभागामध्ये नोकरीस असेल आणि त्याने निवृत्तीपूर्व रजा आणि सुट्टी एकत्रित घेतली असेल तेव्हा, किंवा

(ब) रजेवर असताना त्याला निवृत्त होण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा सक्षम वैद्यकीय प्राधिका-याने त्यास आणखी सेवेसाठी अयोग्य ठरवले असेल तेव्हा, निधीमध्ये त्याच्या खात्यात जमा असलेली रक्कम त्याबाबतीत वर्गणीदाराने लेखा अधिका-यांकडे अर्ज केल्यानंतर त्याला परत करण्यात येईल. परंतु जर वर्गणीदार पुनःसेवेत रूजू झाला तर शासनाने अन्यथा निर्णय घेतला असेल ते खेरीज करून, या नियमानुसार निधीतून त्याला देण्यात आलेली रक्कम, नियम १२ मध्ये तरतूद केल्यानुसार त्यावरील व्याजासह, रोख रकमेत किंवा रोख्यांमध्ये किंवा अंशतः रोख आणि अंशतः रोख्यांमध्ये, हप्त्याहप्त्याने किंवा इतर प्रकारे, त्याच्या वित्तलब्धीमधून किंवा अन्यथा, नियम १३, पोट-नियम (२) खाली विशेष कारणासाठी अग्रिम मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी निर्देशित करील त्याप्रमाणे, वर्गणीदाराला निधीत त्याच्या खात्यावर जमा करावी लागेल.

टीप.– (१) भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान करण्याकरिता " ना मागणी प्रमाणपत्र " सादर करणे आवश्यक आहे, परंतु पुढील प्रकरणे यातून वगळली आहेत.—

वर्गणीदाराच्या मृत्यूनंतर, भविष्य निर्वाह निधीतील जमा रक्कम अशा अवलंबिताकडे विहीत असेल की, जे अवलंबितांनी वर्गणीदाराच्या मृत्यूनंतर काढलेल्या कर्जाकरिता जप्ती होण्याकरिता पात्र आहेत आणि अशी कर्जे ज्यांच्याकडून जमा रक्कम देय आहे अशा शासनाला देय असतील तेंव्हा ते दोन पक्षातील दावे प्रतिदाव्यांच्या वजावटी संबंधीच्या सामान्य कायद्यान्वये जमा रकमेमधून वळते करता येतील.

(२) भविष्य निर्वाह निधीतील रकमेकरिता हक्कदार असलेल्या परंतु अवलंबून नसलेल्या व्यक्ती.

(३) वर्गणीदाराची विधवा पत्नी किंवा मुले यांच्या व्यतिरिक्त अवलंबित व्यक्ती, भविष्य निर्वाह निधीतील पैशाचे प्रदान, भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ च्या प्रारंभापूर्वी केलेले कोणतेही अभिहस्तांकन किंवा भार याच्या अधीन असेल त्याबाबतीत.

२७. वर्गणीदार मृत्यू पावल्यानंतरची कार्यपध्दती.— वर्गणीदाराच्या खात्यावर असलेली जमा रक्कम देय होण्यापूर्वी किंवा रक्कम देय झाल्यानंतर ती प्रदान करण्यापूर्वी वर्गणीदार मृत्यू पावल्यास, वर्गणीदारामागे त्याचे कुटुंब असेल, त्यावेळी

(१) जर वर्गणीदाराने नियम ५ च्या तरतुदींनुसार त्याच्या कुटुंबातील व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे नामनिर्देशन केले असेल तर निधीमधील त्याच्या खात्यावरील रक्कम किंवा नामनिर्देशनात नमूद केलेली अंशतः रक्कम नामनिर्देशित व्यक्तीला किंवा व्यक्तींना, नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणात दिली जाईल.

(२) वर्गणीदाराच्या वर्गणीचे असे कोणतेही नामनिर्देशन कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे करण्यात आले नसेल किंवा असे नामनिर्देशन त्याच्या निधीवरील खात्यातील रकमेच्या काही भागापुरतेच मर्यादित असेल तर, प्रकरणपरत्वे, संपूर्ण रक्कम किंवा नामनिर्देशनाशी संबंधित नसेल असा तिचा भाग, कुटुंबातील व्यक्तीशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे एखादे नामनिर्देशन केलेले असले तरीही कुटुंबातील व्यक्तीना सम प्रमाणात देय होईल :

परंतु पुढील खंड (१), (२), (३) व (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त अन्य व्यक्ती कुटुंबात असतील तर.—

(१) कायदेशीरदृष्ट्या सज्ञान झालेले मुलगे,

(२) मयत मुलांचे कायदेशीरदृष्ट्या सज्ञान झालेले मुलगे,

(३) ज्यांचे पती हयात आहेत अशा विवाहित मुली,

(४) मयत मुलाच्या ज्यांचे पती हयात आहेत अशा, विवाहित मुली,

(5) If there is any member of the family other than those specified in clauses (1), (2), (3) and (4) :

Provided that the widow or widows and the child or children of deceased son shall receive between them in equal parts only the share which that son would have received if he had survived, the subscriber had been exempted from the provisons of clause (1) of above proviso.

(2) When a subscriber has no family but if a nomination made by him in accordance with the provisions of Rule 5 in favour of any person or persons or body subsists, the amount standing to his credit in the Fund or a part thereof to which the nomination relates shall become payable to his nominee or nominees in the proportion specified in the nomination.

Note 1.—The payment of provident fund amount if the amount payable is more than ten thousand, such payment may be made to his/their natural guardians or where no natural guardians exist, to the person considered fit by the Head of office to receive the amount on behalf of the minors after the said person has executed a bond signed by two sureties agreeing to indemnify Government against the amount to be paid. The said person may also be asked to produce the affidavit that he is in-charge of the property of the minor and is looking after it or that if the minor has no property other than the Provident Fund money, the minors in his custody and care, in addition to the indemnity bond.

Note 2.—If the amount payable to the minor is less than rupees ten thousand it shall not be necessary to execute the indemnity bond in respect of such amount.

Note 3.—Hindu widow/widower are the natural guardians of the minors. The payment of Provident Fund money on behalf of her/his minor children shall be made to her/him irrespective of the amount involved without production of guardianship certificate or Indemnity Bond unless there is anything concrete to show that the interest of widow/widower are adverse to those of the minor children.

Note 4.—Step mother/step father are not natural guardians of minor step sons/step daughters.

Note 5.—When a subscriber disappears from his family, the family can be paid the amount of General Provident Fund having regard to the nomination made by him subject to the full payment on following conditions.—

(*i*) the family must produce a report of the concerned police station that the employee has not been traced after all efforts have been made by the police.

(*ii*) an indemnity Bond should be produced by the nominee/dependents of the employee that all payments will be adjusted against the payments due to the employee in case he appears on scene and makes any claim.

28. Manner of payment of amount in the Fund.—(1) When the amount standing to the credit of the subscriber in the fund becomes payable, it shall be the duty of the Account Officer to make payment on receipt of a written application in this behalf as provided in sub-rule (4).

(2) If the person to whom, under these rules, any amount is to be paid is lunatic for whose estate the manager has been appointed in this behalf under Indian Lunacy Act, 1912, the payment will be made to such manager and not to the lunatic :

Provided that, where no manager has been appointed and the person to whom the sum is payable is certified by Magistrate to be lunatic. The payment shall under the orders of Collector, be made in accordance with the provisions of sub-section (1) of Section 95 of the Indian Lunacy Act, 1912, to the person having charged of such lunatic, and the Accounts Officer shall pay only the amount which he thinks fit to the persons having charged of the lunatic, and the surplus, if any, or such part thereof, as he thinks fit, shall be paid for the maintenance of such members of the lunatic’s family as are dependent on him for maintenance.

यांना ह्यातील कोणताही हिस्सा देय होणार नाही. परंतु मृत मुलाची विधवा किंवा विधवांना आणि मूल किंवा मुले यांना, जर तो मुलगा वर्गणीदाराच्या मागे हयात राहिला असता व उपरोक्त परंतुकाच्या खंड,

(१) च्या तरतुदीमधून त्याला सूट दिली असती तर त्याला जो हिस्सा मिळाला असता त्याचे भाग त्यांना समप्रमाणात मिळतील.

(२) वर्गणीदाराचे जेव्हा कोणतेही कुटुंब नसेल तेव्हा जर त्याने नियम ५ च्या तरतुदीनुसार कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या संस्थेच्या नावे केलेले नामनिर्देशन अस्तित्वात असेल तर निधीतील त्याच्या खात्यात असलेली जमा रक्कम किंवा तिचा भाग ज्याच्याशी नामनिर्देशन संबंधित असेल ह्या नामनिर्देशित व्यक्तीला किंवा व्यक्तींना नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणात देय होईल.

टीप.–(१) भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे प्रदान, देय रक्कम रुपये दहा हजारांपेक्षा अधिक असल्यास, अशी रक्कम त्याच्या/त्यांच्या स्वाभाविक पालकाला प्रदान करण्यात येईल. स्वाभाविक पालक अस्तित्वात नसेल तर अज्ञान व्यक्तीच्या वतीने रक्कम प्राप्त करण्यास कार्यालय प्रमुखास योग्य वाटेल अशा व्यक्तीला, त्याने द्यावयाच्या रकमेचे शासनाला क्षतिपूरण करण्याचे मान्य करणा-या दोन जामीनदारांनी स्वाक्षरीत केलेले बंधपत्र केल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल.

उक्त व्यक्तीला तो अज्ञान मुलाच्या मालमत्तेचा प्रभारी असून तिची देखभाल करीत आहे किंवा जर अज्ञान मुलाची भविष्य निर्वाह निधीच्या रकमेखेरीज अन्य मालमत्ता नसेल तर, अज्ञान मूल तिच्या अभिरक्षेमध्ये आणि देखरेखीखाली आहे अशा आशयाचे सुध्दा शपथपत्र सादर करण्यास सांगता येईल.

टीप.–(२) अज्ञान मुलाला देय रक्कम रुपये दहा हजारापेक्षा कमी असेल तर अशा रकमेच्या संबंधात क्षतिपूर्ती बंधपत्र आवश्यक नसेल. भविष्य निर्वाह निधीच्या रकमेखेरीज अन्य मालमत्ता असेल तर, अज्ञान मूल तिच्या अभिरक्षेत आणि देखरेखीखाली आहे, असे शपथपत्र क्षतीपूर्ती बंधपत्रासह सादर करावे लागेल.

टीप.–(३) हिंदु विधवा/विधुर हे अज्ञान मुलाचे स्वाभाविक पालक आहेत. त्याच्या/तिच्या अज्ञान मुलाच्या वतीने भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे प्रदान त्याला/तिला, अंतर्भूत रक्कम कितीही असली तरी विधवा/विधुर यांचे हितसंबंध अज्ञान मुलांच्या हितसंबंधाशी प्रतिकूल आहेत असे मानण्यास निश्चित असे काही कारण नसेल तर, पालकत्व प्रमाणपत्र किंवा क्षतिपूर्ती बंधपत्र सादर न करता, करण्यात येईल.

टीप.–(४) सावत्र आई/सावत्र वडील हे अज्ञान सावत्र मुलगा/सावत्र मुलगी हिचे स्वाभाविक पालक नव्हेत.

टीप.–(५) वर्गणीदार त्याच्या कुटुंबातून जेव्हा बेपत्ता होतो तेव्हा सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची पूर्ण रक्कम, त्याने त्यासंबंधात केलेल्या नामनिर्देशानुसार, त्याच्या कुटुंबाला पुढील अटींच्या अधीन राहून प्रदान करण्यात येईल.—

(१) पोलिसांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केल्यावर देखील कर्मचा-याचा शोध लागलेला नाही अशा आशयाचा संबंधित पोलीस ठाण्याचा अहवाल, त्याच्या कुटुंबाने सादर केला पाहिजे.

(२) कर्मचा-याच्या नामनिर्देशित व्यक्तीने/अवलंबितांनी असे क्षतिपूर्ती बंधपत्र सादर केले पाहिजे की, कर्मचारी उपस्थित झाला व त्याने कोणताही दावा केला तर कर्मचा-याला देय असलेल्या सर्व रकमा प्रदानाच्या रकमामधून, समायोजित करण्यात येतील.

२८. निधीतील रक्कम प्रदान करण्याची रीत.— (१) निधीमध्ये वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम देय होईल तेव्हा पोट-नियम (४) मध्ये तरतूद केल्यानुसार, त्यासंबंधात लेखी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याचे प्रदान करणे हे लेखा अधिका-याचे कर्तव्य असेल.

(२) या नियमाखाली कोणतीही रक्कम द्यावयाची असेल ती व्यक्ती वेडी असेल आणि अशा व्यक्तीच्या इस्टेटसाठी भारतीय वेड्याबाबतचा अधिनियम, १९१२ अन्वये व्यवस्थापकाची नेमणूक केली असेल अशा बाबतीत व्यवस्थापकास अशी रक्कम प्रदान करण्यात येईल, वेड्या व्यक्तीस ती रक्कम देण्यात येणार नाही :

परंतु कोणताही व्यवस्थापक नेमण्यात आला नसेल व ज्या व्यक्तीला रक्कम देय असेल ती व्यक्ती वेडी असल्याचे दंडाधिका-याने प्रमाणित केले असेल तर, देय असलेली रक्कम भारतीय वेड्याबाबतचा अधिनियम, १९१२ याच्या कलम ९५, पोट-कलम १ च्या तरतुदीनुसार जिल्हाधिका-यांच्या आदेशान्वये अशा वेड्या व्यक्तीचा ताबा जिच्याकडे असेल त्या व्यक्तीस देण्यात येईल व लेखा अधिकारी अशा वेड्या व्यक्तीचा ताबा जिच्याकडे असेल त्या व्यक्तीस त्याला योग्य वाटेल अशी रक्कम फक्त देईल आणि जर कोणतीही रक्कम शिल्लक राहिली तर ती, किंवा तिचा कोणताही भाग, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे वेड्या व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्तीपैकी निर्वाहासाठी त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या निर्वाहासाठी देईल.

(3) Payment of the amount withdrawn shall be made in India only. The person to whom the amounts are payable shall make their own arrangements to receive the payment in India.

(4) To enable the Accounts Officer to make payment to the subscriber as per sub-rule (1), the following procedure shall be adopted for claiming payment by a subscriber, namely—

(*a*) to enable a subscriber to submit an application for withdrawal of the amount in the Fund, the Head of Office shall send to every subscriber necessary forms either one year in advance of the date on which the subscriber attains the age of superannuation, or before the date of his anticipated retirement, if earlier with instructions that they should be returned to him duly completed within a period of one month from the date of receipt of the forms by the subscriber. The subscriber shall submit the application to the Accounts Officer through the Head of Office Department for payment of the amount in the Fund. The application shall be made.

(*i*) for the amount standing to his credit in the Fund as indicated in the accounts statements for the year ending one year prior to the date of his superannuation, or his anticipated date of retirement, or

(*ii*) for amount indicated in his ledger account in case the accounts statement has not been received by the subscriber.

(*b*) the Head of Office/Department shall forward the application to the Accounts Officer, within a period of fortnight from the receipt of the same in his office, indicating the recoveries effected against the advances which are still current and the number of instalments yet to be recovered. The withdrawal, if any, taken by the subscriber after the period covered by the statement of the subscriber's accounts send by the Accounts Officer should invariably also be indicated to the Accounts Officer.

(*c*) The Accounts Officer shall, after verification with the ledger account, issue an authority for the amount found admissible at least a month before the date of superannuation but payable on the date of superannuation.

(d) the authority mentioned in clause (*c*) shall determine the first instalment of payment. A second authority for payment will be issued as soon as possible after superannuation. This will relate to the contribution made by the subscriber subsequent to the amount mentioned in the application submitted under clause (a) plus refund instalments against advance which was current at the time of the first payment.

(*e*) after forwarding the application for final payment to the Accounts Officer adavance/withdrawal should be sanctioned but the amount of advance/withdrawal shall be drawn on an authorisation from the Accounts Officer who shall arrange this as soon as the formal sanction of sanctioning authority is received by him.

Note 1.–(*1*) When the amount standing to the credit of a subscriber has become payable under rules 25, 26 and 27 the Accounts Officer shall authorise prompt payment of the amount in the manner indicated in sub-rule (*4*), (*2*) to obviate and reduce delays in making payment, the Head of office/Department should take following steps :–

(*a*) intimation about the death of the subscriber while in service should be sent to the Accounts officer promptly to enable him to initiate action for completion of the Provident Fund Account. The Accounts Officer may also be informed the details of the nomination, etc. made by the deceased subscriber.

(*b*) action should be taken to get the application for final payment of Provident Fund money from the nominee/family members of the subscriber for submission to the Accounts Officer without waiting for legal heirs to initiate action.

(३) काढलेल्या रकमेचे प्रदान केवळ भारतातच करण्यात येईल. रकमा ज्या व्यक्तींना देय असतील त्या व्यक्ती, भारतात रकमा स्वीकारण्याची व्यवस्था स्वतःच करतील.

(४) पोट नियम (१) अन्वये वर्गणीदाराला रक्कम प्रदान करणे लेखा अधिका-यास शक्य व्हावे याकरिता वर्गणीदार रकमेची मागणी करतांना पुढील पद्धती अनुसरील.—

(अ) वर्गणीदारास निधीची रक्कम काढण्याकरिता अर्ज सादर करणे शक्य व्हावे म्हणून, कार्यालय प्रमुख प्रत्येक वर्गणीदारास त्याचे नियत वयमान होण्याच्या तारखेपूर्वी एक वर्ष अगोदर किंवा त्याची अपेक्षित सेवानिवृत्ती अगोदरची असेल तर त्यापूर्वी, आवश्यक ते नमुने, " वर्गणीदारास प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत यथोचितरित्या भरून त्याच्याकडे परत पाठवावेत " अशा अर्थाच्या सूचना देऊन पाठवील. वर्गणीदार तो अर्ज निधीची रक्कम काढण्याकरिता कार्यालय प्रमुखामार्फत अथवा विभाग प्रमुखामार्फत लेखा अधिका-यांकडे सादर करील असा अर्ज.

(एक) वर्गणीदाराच्या नियत वयोमानाच्या तारखेच्या अथवा त्याच्या अपेक्षित सेवानिवृत्तीच्या तारखेच्या एक वर्ष अगोदर संपणा-या वर्षाच्या लेखा विवरणामध्ये त्याच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेसाठी, किंवा

(दोन) लेखा विवरण वर्गणीदारास मिळालेले नसेल तर खातेवहीत त्याच्या खात्यामध्ये विनिर्दिष्ट रकमेसाठी करण्यात येईल.

(ब) कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख हा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसाच्या मुदतीत, अग्रिमाच्या अजूनही वसूल करण्याचे चालू असलेल्या रकमा आणि राहिलेल्या हप्त्यांची संख्या याचा निर्देश करून लेखा अधिका-याकडे पाठवील. लेखा अधिका-याकडून पाठविण्यात आलेल्या वर्गणीदाराच्या लेखाच्या अंतिम विवरणपत्रातील कालावधीनंतर वर्गणीदाराने कोणत्याही रकमा काढून घेतल्या असल्यास, त्या काढून घेतलेल्या रकमांचाही न चुकता, लेखा अधिका-यास निर्देश करील.

(क) लेखा अधिकारी, खातेवहीची पडताळणी केल्यानंतर, प्रदान करणे अनुज्ञेय असल्याचे दिसून आलेल्या रकमेकरिता, नियत सेवावधीच्या कमीत कमी एक महिना अगोदर परंतु नियत सेवावधीच्या दिनांकास त्यास रक्कम मिळेल अशा बेताने प्राधिकारपत्र काढील.

(ड) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट प्राधिकारपत्र प्रदान करावयाच्या रकमेचा पहिला हप्ता निश्चित करील. प्रदानाकरिता दुसरे प्राधिकारपत्र नियत सेवावधीच्या नंतर शक्य तितक्या लवकर काढले जाईल. दुसरे प्राधिकारपत्र वर्गणीदाराने खंड (अ) अन्वये सादर केलेल्या अर्जात उल्लेखिलेल्या रकमेनंतर दिलेली वर्गणी, अधिक पहिल्या अर्जाच्या वेळेस अग्रिमाचे जे हप्ते चालू होते त्यांच्या परताव्याशी संबंधीत असेल.

(इ) लेखा अधिका-यांकडे अंतिम रक्कम मिळण्यासाठी अर्ज अग्रेषित केल्यानंतर आगाऊ रक्कम/काढावयाची रक्कम मंजूर करता येईल, परंतु आगाऊ रक्कम/काढावयाची रक्कम, संबंधीत लेखा अधिका-याने प्राधिकृत केल्यानंतर काढण्यात येईल. लेखा अधिकारी अशी व्यवस्था, मंजुरी प्राधिका-याची रीतसर मंजुरी मिळाल्यानंतर ताबडतोब करील.

टीप.—(१) जेव्हा वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम नियम २५, २६ आणि २७ अन्वये देय होईल तेव्हा, पोट-नियम (४), (२) मध्ये विनिर्दिष्ट पद्धतीनुसार लेखा अधिकारी ताबडतोब प्रदान होण्यासाठी प्राधिकारपत्र काढील.

(२) प्रदानातील विलंब दूर किंवा कमी करण्यासाठी कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखाने पुढील उपाययोजना कराव्यात.—

(अ) वर्गणीदाराचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास, वर्गणीदाराच्या मृत्यूबाबतची सूचना, भविष्य निर्वाह निधीचा हिशेब पूर्ण करण्याच्या दृष्टीने कृती करणे शक्य व्हावे म्हणून लेखा अधिका-याला त्वरीत देण्यात यावी. मयत वर्गणीदाराच्या नामनिर्देशन इत्यादीचा तपशील सुद्धा लेखा अधिका-यास कळवण्यात येईल.

(ब) भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे अंतिम प्रदान करण्याकरिता नामनिर्देशित व्यक्तीकडून/वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्तीकडून लेखा अधिका-याला द्यावयाचा अर्ज घेण्याची कार्यवाही देखील सुरू करावी, कायदेशीर वारस त्यासाठी काही करील याची वाट पाहू नये.

29. Procedure for Authorising the payment of Provident Fund Amount.–(*1*) The following procedure shall be followed for authorising the payment of General provident fund accumulations of a Government servant retiring on superannuation immediately on the date following the date of his retirement.–

(*i*) subscriber retiring on superannuation should be asked to apply one year in advance before the date of his retirement as per rule 28(*4*).

(*ii*) the subscriber shall make another application immediately after the last fund deduction has been made and the exemption for the subscription to the fund has begun to operate for the payment of subscriptions made by him and the refund of instalments against advance, if any, during the period not covered by the first application referred to at (*i*) above.

(*iii*) The Accounts Officer on receipt of the first application for final payment of the amount made by the subscriber one year in advance from the date on which the subscriber attains the age of superannuation shall verify the ledger account upto that period and after receiving the second application verify the ledger account for the remaining nine months and authorise the payments at least a month before the date on his superannuation. The amount, shall however, be payble on the date following the date of retirement of a subscriber.

(2) On receipt of the first application, the Accounts Officer will complete action in all respects including tracing and adjustments of missing credits, if any, to ensure that the Provident Fund account is complete and upto-date in all respects.

[1](3) The application for authorizing the final payment of General Provident Fund shall be submitted in Form "B" given in the First Schedule.

Note 1.–Subscriber due to retire on superannuation shall be exempted from making any subscription to the Fund during the last three months of his service. The discontinuance of subscription is compulsory.

Note 2.–Notwithstanding anything contained in (*1*) above, the subscriber will continue to be treated as subscriber till his retirement for the purpose of deposit linked insurance scheme even though recovery of subscription has been discontinued for the last three months of his service.

30. Deposit Linked Insurance Scheme.–On the death of a subscriber, the person entitled to receive the amount standing to the credit of the subscriber shall be authorised by the Account Officer, an additional amount equal to the average balance in the account during the three years immediately preceding the death of such subscriber subject to the following conditions that.–

[2](*a*) the balance to the credit of such subscriber shall not at any time during the three years preceding the month of death have fallen below the limits of :–

(*i*) Rs. 25,000 in case of subscriber holding a post in the Pay Band-2 (Rs. 9,300-34,800) or above and drawing a Grade-pay of Rs. 4,800 or more as per the Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 2009 ;

(*ii*) Rs. 15,000 in the case of a subscriber holding a post in the Pay Band-2 (Rs. 9,300-34,800) and drawing a Grade pay of Rs. 4,200 or more but less than Rs. 4,800 as per the Maharashtra Civil Services (Revised pay) Rules, 2009 ;

(*iii*) Rs. 10,000 in the case of a subscriber holding a post in the Pay Band-2, Pay Band-1 or Pay Band-1S (Rs. 4,440-7,440) and drawing a Grade-pay of Rs. 1,400 or more but less than Rs. 4,200 as per the Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 2009 ;

---

1. Sub-rule (3) was inserted by G.N. GAD, dated 19-12-2015, Rule 8.
2. Clauses (a) and (b) were substituted by G.N. GAD, dated 19-12-2015, Rule 9(I).

२९. भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे प्रदान प्राधिकृत करण्याकरिता कार्यपद्धती.— (१) नियत सेवावधीच्या दिनांकानंतर लगेचच येणा-या दिनांकास, सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-याच्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतील जमा रकमेचे प्रदान करण्याकरिता प्राधिकार देण्यासाठी पुढील कार्यपद्धतीचा अवलंब केला जाईल.

(एक) नियत सेवावधीनंतर सेवानिवृत्त होणा-या वर्गणीदाराला नियम २८ (४) नुसार, त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी एक वर्ष अगोदर अर्ज करण्यास सांगण्यात यावे.

(दोन) वर्गणीदार, निधीची अंतिम वजात केल्यानंतर आणि निधीमध्ये वर्गणी देण्यापासून सूट अंमलात आल्यानंतर लगेचच, दुसरा अर्ज त्याने दिलेल्या वर्गणीचे आणि वरील (एक) मध्ये उल्लेख केलेल्या अर्जात समाविष्ट नसलेल्या मुदतीत त्याने अग्रिमापोटी काही हप्ते भरले असतील तर त्या हप्त्यांच्या परताव्याचे प्रदान मिळावे यासाठी करील.

(तीन) लेखा अधिकारी, वर्गणीदाराचे नियत वयमान पूर्ण होईल त्या दिनांकापासून एक वर्ष आधी वर्गणीदाराने केलेल्या रकमेच्या अंतिम प्रदानाचा पहिला अर्ज मिळाल्यानंतर खातेवहीची त्या दिवसापर्यन्तची पडताळणी करील आणि दुसरा अर्ज प्राप्त झाल्यानंतर खातेवहीतील उरलेल्या नऊ महिन्यांच्या हिशोबाची पडताळणी करील आणि त्याच्या नियत सेवावधीच्या तारखेच्या कमीत कमी एक महिना अगोदर प्रदान प्राधिकृत करील. तथापि, वर्गणीदाराच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतरच्या दिनांकास रक्कम देय होईल.

(२) पहिला अर्ज प्राप्त झाल्यानंतर, लेखा अधिकारी, कोणत्याही रकमा गहाळ असल्यास, त्या शोधून काढणे आणि समायोजन करणे, यासह भविष्य निर्वाह निधी लेखा पूर्ण आणि सर्व बाबतीत अद्ययावत आहे याची खात्री करून घेण्याकरिता सर्व कार्यवाही पूर्ण करील.

[१](३) भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे अंतिम प्रदान मंजूर करण्यासाठीचा अर्ज हा पहिल्या अनुसूचीमध्ये दिलेल्या "नमुना ब" मध्ये सादर करण्यात येईल.

टीप.–(१) वर्गणीदार नियत सेवावधीनंतर सेवानिवृत्त होताना त्याच्या सेवेच्या अंतिम तीन महिन्यांच्या कालावधीत निधीमध्ये कोणतीही वर्गणी देण्यापासून त्याला सूट देण्यात येईल. त्याची वर्गणी बंद करणे अनिवार्य आहे.

टीप.–(२) उपरोक्त (१) मध्ये काहीही नमूद केलेले असले तरीही, ठेव संलग्न विमा योजनेच्या प्रयोजनाकरिता, त्याच्या सेवेच्या अंतिम तीन महिन्यांत वर्गणीची वसुली बंद झाली असली तरी वर्गणीदारास त्याच्या सेवानिवृत्तीपर्यन्त वर्गणीदार म्हणूनच मानण्यात येईल.

३०. ठेव संलग्न विमा योजना.– वर्गणीदाराच्या मृत्यूनंतर, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीस, लेखा अधिकारी, पुढील शर्तीस अधीन राहून, अशा वर्गणीदाराच्या मृत्यूच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षामध्ये त्याच्या खाती शिल्लक असलेल्या सरासरी वर्गणीच्या रकमेएवढी अतिरिक्त रक्कम मिळण्यास प्राधिकृत करील. त्या शर्ती अशा.—

[२](अ) अशा वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली वर्गणीची रक्कम, त्याच्या मृत्यूच्या निकटपूर्वीच्या तीन वर्षांमध्ये कोणत्याही वेळी पुढील मर्यादेपेक्षा कमी असता कामा नये, त्या मर्यादा अशा :—

(एक) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ अन्वये वेतनश्रेणी-२ (रुपये ९,३००-३४,८००) मधील किंवा त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणी असलेले पद धारण करणा-या आणि प्रति महिना रुपये ४,८०० किंवा त्यापेक्षा अधिक श्रेणीवेतन आहरित करणा-या वर्गणीदारांच्या बाबतीत रुपये २५,०००;

(दोन) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ अन्वये, वेतनश्रेणी-२ (रुपये ९,३००-३४,८००) मधील पद धारण करणा-या आणि प्रति महिना रुपये ४२०० किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु रुपये ४,८०० पेक्षा कमी श्रेणीवेतन आहरित करणा-या वर्गणीदारांच्या बाबतीत रुपये १५,०००;

(तीन) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ अन्वये, वेतनश्रेणी-२, वेतनश्रेणी-१, वेतनश्रेणी १ एस (रुपये ४,४४०-७४४०) मधील पद धारण करणा-या आणि प्रति महिना रुपये १४०० किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु रुपये ४,२०० पेक्षा कमी श्रेणीवेतन आहरित करणा-या वर्गणीदारांच्या बाबतीत रुपये १०,०००;

---

१. शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ८ अन्वये, उपनियम (३) समाविष्ट करण्यात आला.

२. शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ९(१) अन्वये मूळ खंड (अ) आणि (ब) ऐवजी खंड (अ) आणि (ब) दाखल करण्यात आले.

(*iv*) Rs. 6,000 in the case of a subscriber holding a post in the Pay Band-1S (Rs. 4,440-7,440) and drawing a Grade pay of Rs. 1,300 or more but less than Rs. 1,400 as per the Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 2009.

(*b*) the additional amount payable under this rule shall not exceed Rs. 60,000.

(*c*) The subscriber has put in at least five years service at the time of death.

(*2*) The Head of Office, under whom the Government servant was serving at the time of his death, shall make payments of the amount admissible under sub-rule (*1*) after ascertaining the admissibility of the amount from the Accounts Officer (Head of office in case of class IV employees) and the Head of Department in respect of budget grants.

(*3*) Where a subscriber has held the post in different scales during the 36 months immediately preceding the month of his death, the appropriate minimum qualifying balance in respect of such scale, a deceased subscriber shall be the one relating to the scale in which he held the post for the greater part of the last three years.

[1](*4*) The application to be filled in by the person nominated by the subscriber any other person who is not nominated by the subscriber for receipt of final balance standing to the credit of the subscriber in the Provident Fund Account and the Deposit Linked Insurance Scheme shall be submitted in Form "C" given in the First Schedule.

Note 1.–The average balance shall be worked out on the basis of the balance at the credit of the subscriber at the end of such of the 36 months preceding the month in which death occurs. For this purpose, as also for checking the minimum balance prescribed above.–

(*a*) the balance at the end of March, shall include the annual interest, credited in terms of rule 12, and

(*b*) If the last of the aforesaid 36 months is not March, the balance at the end of the said last month shall include interest in respect of the period from the beginning of the financial year in which death occurs to the end of the said last month.

Note 2.–Payment under this scheme shall be in whole rupees. If an amount due includes a fraction of a rupee, it should be rounded to the nearest rupee (50 paise counting as the next higher rupee).

Note 3.–Any sum payable under this scheme is in the nature of insurance money and, thererfore the statutory protection given by section 3 of the Provident Fund and Miscellaneous Provisions Act, 1925 (XIX of 1925), does not apply to sum payable under this Scheme.

Note 4.–This Scheme also applies to these subscribers to the Fund who are transferred to an autonomous organisation consequent upon conversion of a Government Department into such a body and who, on such transfer, opt in terms of option given to them to subscribe to the Fund in accordance with these rules.

Note 5.–In case of Government servant who has been admitted to the benefit of the Fund under rule 32 or rule 33 but dies before completion of three years service or as the case may be, five years service from the date of his admission to the fund, the period of his service under the previous employer in respect whereof the amount of his subscription and employer's contribution, if any, together with interest have been recovered, shall count for purpose of clauses (*a*) and (*c*).

Note 6.–In case of persons appointed on tenure basis and in the case of re-employed pensioners, service rendered from the date of such appointment, re-employment, as the case may be, only shall count for the purpose of this rule. This scheme shall not apply to persons appointed on contract basis.

Note 7.–The budget estimates of expenditure in respect of this scheme shall be prepared by the respective Heads of Departments having regard to the trend of expenditure.

---

1. Sub-rule (4) was inserted by G.N. GAD, dated 19-12-2015, Rule 9(II).

(चार) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ अन्वये, वेतनश्रेणी-१ एस मधील (रुपये ४,४४०-७,४४०) पद धारण करणा-या आणि प्रति महिना रुपये १३०० किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु रुपये १,४०० पेक्षा कमी श्रेणीवेतन आहरित करणा-या वर्गणीदारांच्या बाबतीत रुपये ६,०००;

(ब) या नियमामध्ये देय असलेली अतिरिक्त रक्कम ही रुपये ६०,००० पेक्षा अधिक असणार नाही.

(क) वर्गणीदाराने मृत्यूच्या वेळेपर्यन्त किमान पाच वर्षाची सेवा केलेली असली पाहिजे.

(२) शासकीय कर्मचारी, त्याच्या मृत्यूच्या वेळी, ज्याच्या अधिपत्याखाली नोकरी करीत होता त्या कार्यालयाचा प्रमुख, लेखा अधिका-याकडून (वर्ग चारच्या प्रकरणात कार्यालय प्रमुखाकडून आणि अर्थसंकल्पीय अनुदानाच्या संबंधात, विभाग प्रमुखाकडून) रकमेच्या अनुज्ञयतेची खात्री करून घेतल्यानंतर, पोट-कलम (१) अन्वये देय रकमेचे प्रदान करील.

(३) वर्गणीदाराने त्याच्या मृत्यूच्या लगतपूर्वीच्या ३६ महिन्यांच्या कालावधीत निरनिराळ्या वेतनश्रेणीची पदे धारण केली असतील तर मयत वर्गणीदाराने शेवटच्या तीन वर्षात जास्तीत जास्त काळ जे पद धारण केले असेल त्या वेतनश्रेणीशी संबंधित किमान जमा रक्कम हीच याबाबतीत समुचित किमान अर्हताकारी जमा रक्कम होय.

[1](४) वर्गणीदाराच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेली अंतिम शिल्लक आणि ठेव संलग्न विमा योजनेची अनुज्ञेय रक्कम मिळण्यासाठी वर्गणीदाराने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने किवा वर्गणीदाराने नामनिर्देशित न केलेल्या अन्य मागणीदार व्यक्तीने, सादर करावयाचा अर्ज अनुसूची-एक मध्ये दिलेल्या नमुना "क" मध्ये भरून सादर करण्यात येईल.

टीप.–(१) ज्या महिन्यात मृत्यू झाला असेल त्या महिन्याच्या लगतपूर्व ३६ महिन्यांच्या शेवटी वर्गणीदाराच्या खात्यावर शिल्लक रकमेच्या आधारावर सरासरी शिल्लक काढण्यात येईल. या प्रयोजनाकरिता तसेच उपरोक्त विहित किमान शिल्लक यांच्या तपासणीखाली.—

(अ) मार्च अखेरच्या शिल्लक रकमेत, नियम १२ नुसार, जमा केलेले वार्षिक व्याज समाविष्ट असेल आणि

(ब) उपरोक्त ३६ महिन्यातील शेवटचा महिना मार्च नसेल तर, अशा अंतिम महिन्याच्या शेवटी असलेल्या शिल्लक रकमेत, ज्या वित्तीय वर्षात मृत्यू झाला असेल त्याच्या प्रारंभापासून उक्त अंतिम महिन्याच्या शेवटपर्यंतच्या मुदतीचे व्याज समाविष्ट करण्यात येईल.

टीप.–(२) या योजनेखाली घ्यावयाची रक्कम पूर्ण रुपयात असेल. देय रकमेमध्ये अपूर्ण रुपया असेल तर त्याचे नजिकच्या आकड्यापर्यन्त पूर्ण रूपांतर करण्यात यावे (५० पैसे लगत पुढील रुपया इतके मानण्यात यावेत).

टीप.–(३) या योजनेखाली देय असलेली कोणतीही रक्कम विम्याच्या पैश्याच्या स्वरूपात असते आणि म्हणून भविष्य निर्वाह निधी आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९२५ (१९२५ चा १९) याच्या कलम ३ द्वारे देण्यात आलेले सांविधिक संरक्षण अशा रकमेस लागू होणार नाही.

टीप.–(४) एखाद्या शासकीय विभागाचे एखाद्या स्वायत्त संस्थेमध्ये रुपांतर झाल्यानंतर ज्या वर्गणीदारांची अशा स्वायत्त संघटनेकडे बदली झाली असेल आणि अशी बदली झाल्यानंतर त्यांना देण्यात आलेल्या पर्यायानुसार ज्यांनी या नियमानुसार या निधीमध्ये वर्गणी देण्याचा पर्याय स्वीकारला असेल, अशा वर्गणीदारांना सुद्धा ही योजना लागू होईल.

टीप.–(५) नियम ३२ किंवा ३३ अन्वये ज्याला या निधीचे लाभ मिळणार असतील परंतु निधीमध्ये दाखल करून घेतल्याच्या तारखेपासून प्रकरणपरत्वे तीन वर्षाची किंवा पाच वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी जो मरण पावला असेल अशा शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत, त्यांने पूर्वीच्या मालकाकडे केलेल्या ज्या सेवेच्या संबंधातील त्यांच्या वर्गणीची रक्कम आणि मालकाचे अंशदान, कोणतेही असल्यास, व्याजासह जमा केले असेल त्या सेवेचा असा कालावधी खंड (अ) आणि (क) यांच्या प्रयोजनांकरिता हिशोबात घेण्यात येईल.

टीप.–(६) पदावधीच्या (Tenure) तत्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींच्या बाबतीत आणि पुन्हा नोकरीत ठेवलेल्या निवृत्तीवेतनधारींच्या बाबतीत, अशा नियुक्तीच्या किंवा प्रकरणपरत्वे पुनर्नियुक्तीच्या तारखेपासून केलेली सेवाच फक्त, या नियमाच्या प्रयोजनासाठी हिशेबात घेण्यात येईल. ही योजना करार तत्वावर नेमलेल्या व्यक्तींना लागू होणार नाही.

टीप.–(७) या योजनेच्या संबंधातील खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज खर्चाचा कल लक्षात घेऊन संबंधित विभाग प्रमुखांकडून तयार करण्यात येतील.

---

१. शा. अधि. साप्रवि, दि. १९-१२-२०१५ मधील नियम क्र. ९(२) अन्वये उपनियम (४) समाविष्ट करण्यात आला.

31. Transfer of Accumulation in the fund.–Procedure on transfer of a Government servant from a local body or autonomous body under Central or State Government or Vice-versa.—

(*1*) If a Government servant who is subscriber to any other noncontributory Provident Fund, is permanently transferred to pensionable service under the Government of Maharashtra in which he is governed by these rules, the amount of subscriptions together with the interest thereon, standing to his credit in such other Fund on date of transfer shall, with the consent of that Government be transferred to his credit in the Fund.

(*2*) Provided that where a subscriber was subscribing to a noncontributory Provident Fund of a local body or an autonomous body the consent of that local body of autonomous body shall be obtained.

(*3*) If a Government servant who is a subscriber to any Contributory Provident Fund is permanently transferred to pensionable service under the Government of Maharashtra in which he is governed by these rules and unless such a subscriber elects to continue to be governed by the rules of such Fund, when such option is given.–

(*a*) the amount of subscription with interest thereon, standing to his credit in such Contributory Provident Fund on the date of transfer shall with the consent of other Government or local/autonomous body, if any, be transferred to his credit, in the Fund ;

(*b*) the amount of contribution of Government/local/autonomous body, with interest thereon standing to his credit in such Contributory Provident Fund shall, with the consent of other Government, local/ autonomous body, if any, be repaid to Government or local/autonomous body and credited to State revenues, and

(c) he shall thereupon be entitled to count towards pension, the period of service rendered prior to the date of permanent transfer to the exent permissible under the pension rules which are applicable to him.

Note 1.–Provisions of this rule do not apply to a subscriber who has retired from service and is subsequently re-employed with or without break in service, or the subscriber who was holding formal appointment on contract.

Note 2.–Provisions of this rule shall, however, apply to persons who are appointed without break, whether temporarily or permanently, to a post carrying the benefits of these rules after resignation/retrenchment from service, under Central Government or another State Government or any other Department of State Government.

32. Transfer of balance.–If a Government servant admitted to the benefits of the Fund, was previously a subscriber of any Provident Fund of a Corporation owned and controlled by Government or of any autonomous organisation registered under the Societies Registration Act, 1860. The amount credited in such Fund shall be transferred to his credit in the Fund with the consent of that Corporation or organisation as the case may be.

33. Transfer of balance to Maharashtra Contributory Provident Fund :–If a subscriber to the fund is subsequently admitted to the benefit of Maharashtra Contributory Fund, the amount of his subscription together with interest thereon, shall be transferred to the credit of his account in the Maharashtra Contributory Provident Fund.

Note.–The provisions of this rule do not apply to a subscriber who is appointed on contract or who has retired from service and subsequently re-employed with or without break in service in another post carrying Contributory Provident Fund, benefits.

३१. निधीतील जमा रकमेचे हस्तांतरण.— शासकीय कर्मचा-यांची केंद्र किंवा राज्य सरकारच्या अधिपत्याखालील स्थानिक संस्था किंवा स्वायत्त संस्था अशी किंवा याऊलट बदली झाली असता कार्यपद्धती.—

(१) शासकीय कर्मचा-यांची कोणत्याही बिगर अंशदायी भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार असताना महाराष्ट्र शासनाखालील निवृत्तीवेतनायोग्य सेवेत कायम बदली झाली व अशा सेवेत त्याला हे नियम लागू होत असतील तर त्याच्या नावे जमा असलेली अशा अन्य निधीतील वर्गणीची रक्कम, त्यावरील व्याजासह, त्या शासनाच्या संमतीने त्यांच्या नावे या निधीत हस्तांतरीत करण्यात येईल.

(२) परंतु ज्या बाबतीत एखादा वर्गणीदार स्थानिक संस्था किंवा स्वायत्त मंडळाच्या बिगर अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणी भरत असेल त्याबाबतीत त्या स्थानिक संस्थेची किंवा स्वायत्त मंडळाची संमती घेण्यात येईल.

(३) शासकीय कर्मचा-यांची, कोणत्याही अंशदायी भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार असताना महाराष्ट्र शासनाखालील निवृत्तीवेतन योग्य सेवेत कायम बदली झाली व अशा सेवेत त्याला हे नियम लागू होत असतील तर, अशा निधीकरिता हे नियम पुढेही लागू व्हावेत अशी वर्गणीदाराने निवड केलेली नसेल तर.—

(अ) त्याच्या बदलीच्या दिनांकाला अशा अंशदायी भविष्य निर्वाह निधीतील त्यांच्या नावे जमा असलेली वर्गणीची रक्कम त्यावरील व्याजासह अन्य शासनाच्या, किंवा स्थानिक संस्था/स्वायत्त मंडळाच्या (कोणतेही असल्यास) संमतीने त्यांच्या खात्यावर निधीत हस्तांतरीत करण्यात येईल.

(ब) अशा अंशदायी भविष्य निर्वाह निधीत त्याच्या नावे असलेली शासनाच्या स्थानिक/स्वायत्त मंडळाच्या अंशदानाची रक्कम तिच्यावरील व्याजासह, अन्य शासनाला, स्थानिक/स्वायत्त संस्थेला कोणतेही असल्यास, परत करण्यात येईल व राज्याच्या महसुलात जमा करण्यात येईल.

(क) त्यास लागू असलेल्या निवृत्तीवेतन नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या मर्यादेपर्यंत कायम बदलीच्या तारखेपूर्वी त्याने व्यतीत केलेला सेवावधी, निवृत्तीवेतनासाठी जमेस धरण्याचा त्यानंतर त्याला हक्क राहील.

टीप.–(१) या नियमाच्या तरतुदी, जो वर्गणीदार सेवानिवृत्त झाला असेल व सेवेत खंड पडून किंवा न पडून ज्यास पुन्हा नोकरीत ठेवले असेल किंवा ज्या वर्गणीदाराची आधीची नियुक्ती करारावर केलेली असेल, त्याच्या बाबतीत लागू असणार नाहीत.

टीप.–(२) तथापि, या नियमाच्या तरतूदी केंद्र शासनाच्या किंवा दुस-या राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या दुस-या विभागातील सेवेतून राजीनामा दिल्यानंतर/कपात केल्यानंतर ज्या व्यक्तींची नियुक्ती सेवेत खंड न पडता या नियमांचा लाभ मिळणा-या पदावर करण्यात आली असेल मग ती तात्पुरती असो किवा कायम स्वरुपाची असो त्या व्यक्तींना लागू होतील.

३२. शिल्लक रकमेचे हस्तांतरण,—भविष्य निर्वाह निधीचे लाभ मिळत असलेला एखादा शासकीय कर्मचारी जर यापूर्वी शासनाचा मालकीच्या आणि नियंत्रणाखाली असलेल्या निगमाच्या किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही स्वायत्त संघटनेच्या भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार असेल तर, अशा भविष्य निर्वाह निधीतील त्याच्या नावे जमा रकमा त्या निगमाच्या किंवा यथास्थिती, संघटनेच्या संमतीने निधीत त्याच्या नावे हस्तांतरित करण्यात येतील.

३३. महाराष्ट्र अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये शिल्लक रकमेचे हस्तांतरण—निधीच्या वर्गणीदारास नंतर महाराष्ट्र अंशदायी भविष्य निर्वाह निधीचे लाभ घेण्याची परवानगी दिली तर त्याच्या वर्गणीची रक्कम, त्यावरील व्याजासह, त्यांच्या महाराष्ट्र अंशदायी भविष्य निर्वाह निधीतील खात्यावर हस्तांतरित करण्यात येईल.

टीप.– या नियमाच्या तरतुदी, ज्या वर्गणीदाराची नियुक्ती करारावर केली असेल किंवा जो सेवानिवृत्त झाला असून ज्याची नंतर अंशदायी भविष्य निर्वाह निधीचे लाभ मिळणा-या अन्य पदावर, त्याच्या सेवेत खंड पडून किंवा खंड न पडता पुन्हा नियुक्ती झाली असेल अशा कर्मचा-यांच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

RELAXATION OF RULES

34. Relaxation of the rules in individual cases :–Where Government is satisfied that the operation of any of these rules causes or is likely to cause undue hardship to a subscriber, it may, notwithstanding anything contained in these rules, deal with the case of such subscriber in such manner as may appear to it to be just and equitable.

Note.–Relaxation under this rule is not permissible in case of final payment before proceeding on leave preparatory to retirement or on actual retirement, as it is contrary to section 2(A) of the Provident Fund and Miscellaneous Provisions Act, 1925.

PROCEDURE RULES

35. Number of accounts to be quoted at the time of payment of subscription :–When paying a subscription in India, either by deduction from emoluments or in cash a Drawing and Disbursing Officer or a subscriber, as the case may be, shall quote number of subscriber's account in the Fund, communicated by the Accounts Officer. Any change in the number shall similarly be communicated to the subscriber by the Accounts Officer.

36. Statement of Account to Subscriber :–The statements of accounts to be supplied to a subscriber.–

